GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

Mar

Class No. 891·462

Book No. ~~P273~~ P.856

N. L. 38.

MGIPC—S8—6 LNL/56—25-7-56—50,000.

परचुरे, पुराणिक आणि मंडळी
बुकसेलर्स माधवबाग, मुंबई नं. ४

संगीत

संभाजी नाटक.

आत्माराम मोरेश्वर पाठारे

यांनीं तयार केलें,

तें

बी. डी. कीर्तिकर आणि कंपनी यांजकडून
तिसऱ्या आवृत्तीचा हक्क
विकत घेऊन

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण पाठक

यांनीं

मुंबईत,
" विजय प्रिंटिंग प्रेस " मध्यें छापिलें.

शके १८२५, सन १९०३.
आवृत्ति तिसरी. २००० प्रती.

किंमत १२ आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून याप्रमाणें नाटकप्रयोग करण्याची परवानगी देण्याचा, पुन्हां छापण्याचा व इतर सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

NATIONAL LIBRARY
NO. 2877
DATE 20.9.57
CALCUTTA

प्रस्तावना.

अलीकडे लोकांना संगीत नाटकाची अभिरुचि बरीच लागलेली आहे. तेव्हां लोकरंजनाचा हा एक नवीन प्रचारांत आलेला प्रकार घेऊन त्याच्याद्वारें अल्पशी सेवा आपणही कांहीं करावी असें मनांत येऊन, हा पुढील एक प्रयत्न रसिक वाचकांना सादर करण्यांत आला आहे. हा प्रयोगरूपानें तर आधींच लोकप्रिय होऊन गेला आहे; तसाच तो आतां या पुस्तकरूपानेंही जाणत्या लोकांच्या आदरपूर्वक संग्रहास पात्र होईल अशी आशा आहे.

यांतील कथानक ऐतिहासिक आहे. परंतु नाट्यप्रयोगभूषणार्थ मनोरम दिसतील असे कल्पित फेरफार मुद्दाम करून हें शोकपर्यवसायी होईल अशाप्रकारें सजविलें आहे. यांतील कथानायक **श्रीछत्रपति संभाजी** याच्या गुणावगुणांसंबंधानें येथें कांहीं विशेष मुद्दाम लिहिण्यास नको आहे. त्या सर्वांचें यथामति यथार्थ चित्र पुढील कृतींत काढलेलें आहेच, तरी प्राणांतीही स्वधर्म व स्वाभिमान यांचा त्याग न करण्याच्या त्याच्या अद्वितीय गुणानें व

लोकोत्तर शौर्यानें त्याच्या असंख्य अवगुणांवर झांकण पडून, त्या अवगुणांनें त्याला यथायोग्य शासन मिळालेलें दाखवीत दाखवीतच खरें, तरी पण ते दोन गुण उत्कर्षानें बाहेर पडत पडत हें कथानक सजविलें गेलें असल्यामुळें या पुस्तकाचें वाचन किंवा, याच्या प्रयोगाचें प्रेक्षण अनुक्रमें वाचकांस किंवा प्रेक्षकांस, सदर्हु दोन गुणांचें महत्व खचीत पटवून देईल; यांत आम्हास शंका वाटत नाहीं. संभाजीची बायको **येसूबाई** व विश्वासू चाकर **जोत्याजी केसकर** हीं देखील आपापल्या अनुक्रमें पतिनिष्ठेची आणि स्वामिनिष्ठेची खरी किंमत लोकांच्या मनावर खचीत बिंबविल्यावांचून राहणार नाहींत, समर्थ **श्रीरामदास** आणि **महाराज शिवछत्रपति** या पुण्यशीलांचें एकच प्रवेशांतलें अल्प दर्शनही अंतःकरणावर धन्यतेचा चिरकाल ठसा खचीत उमटवील. सारांश, हा प्रयत्न प्रयोगशोभनार्थ केलेल्या फेरफारानें जरी ऐतिहासिक महत्वाचा नसला तरी वरती दाखविलेल्या गुणासंबंधानें फार उपयुक्त व बोधपर होईल अशी उमेद आहे.

या कृतींत दोष पुष्कळ असतील, परंतु त्यांच्याकडे तितकी वांकडी नजर न ठेवितां जो कांहीं गुणांश आढळेल तेवढा आदरणीय मानून हीस लोकाश्रय मिळेल

आणि मला उत्तरोउत्तर अधिकाधिक प्रोत्साहन येईल अशी आशा करून ही प्रस्तावना जास्त वाढवीत नाहीं.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत आपला बहुमोल वेळ खर्च करून माझे मित्र रा० नारायण हरि भागवत यांनीं काळजीपूर्वक पाहून कांहीं ठिकाणीं योग्य फेरफार करण्यास सांगितले व रा० अनंत वामन बरवे यांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या; यासाठीं उभय मित्रांचा मी फार फार आभारी आहें.

आत्माराम मोरेश्वर पाठारे.



तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

नजर चुकीनें दुसऱ्या आवृत्तींत राहिलेला एखादा हस्तेदोष काढून टाकण्यापलिकडे या आवृत्तींत विशेष फेरफार केले नाहींत. रा. रा. पाठारे यांची कृति दिवसें-दिवस अधिक लोकप्रिय होत असल्याची साक्ष ही तृतीयावृत्ति होय. पुस्तक ग्राहकांच्या व नाटक-प्रेक्षणेच्छूंच्या सोईसाठीं ह्मणून सर्दहू पुस्तकाची बांधणी खिशांत मावण्या जोगी पाकेट साईज धरून आंतील पद्यांचा व भाषणांचा टाईप किंचित् मोठा घातला आहे. प्रथम व द्वितीयावृत्तीप्रमाणें याही आवृत्तीस लोकाश्रय मिळून आमच्या श्रमाचें कांहीं चीज झाल्यानें अशींच दुसरीं आणखीं नांवाजलेलीं पुस्तकें छापून प्रसिद्ध करण्याचा सुप्रसंग आमच्या वांट्यास येईल; ही उत्कट आशा तो जगदीश पूर्ण करो.

मुंबई तारीख १ माहे आक्टोबर सन १९०३ — प्रकाशक.

ग्राहकांनीं दरेक पुस्तकावर आमची हातची सही पाहून घेणें. सही शिवाय पुस्तक घेऊं नये.

बी. डी. कीर्तीकर आ. कं.

मालक.

पुस्तकार्पण.

कै० तीर्थरूप मोरेश्वर विठोबा

ऊर्फ बाबासाहेब

यांच्या स्मरणार्थ

पितृभक्तिपुरःसर, ही अल्प सेवा

त्यांच्या चरणीं

अत्यादरपूर्वक

अर्पण केली असे.

पुस्तककर्ता.

B. N. Rly.
INDIAN INSTITUTE.
KHARGPUR.
No.........

संगीत

श्रीछत्रपति संभाजी नाटक.

अंक १ ला.

No. 490

नान्दी.

पद—(सांबसुराभरणा) या चालीवर.

पुष्पांजलि हा मी ॥ प्रेमें ॥ अर्पि हरी-चरणां ॥ प्रे० ॥ या मत्कार्यारंभीं हृदयीं स्मरुनी त्या मूषकपतिवहना ॥ध्रु०॥ कमला-मुख-कमला ॥ पाहुनि ॥ नित्य असे रमला ॥ तो हरि ॥ स्वकरिं कवन-सुमना ॥ धरुनी ॥ शिव आह्मां दीनां ॥ देवो ॥ तद्ध्यानीं जे लीन सदोदित तोविं पदीं त्या नेवो सुजनां ॥ १ ॥

पद—काफी—दीपचंदी.

अंबाऽधर-मधु-पानि रमे ती ॥ रक्षो तुह्मां शिवमूर्ति ॥ध्रु०॥ नित्य विभूती-लेपन जीतें ॥ प्रिय तैसे ते भुजग कटीतें ॥ सुरवर, किन्नर, नर ते ॥ गाति सदा जिस विमला भक्तीं ॥ १ ॥ त्या नगदुहिता गिरिजानाथा ॥ काय शके ही वाणी गातां ॥ दुर्घट कार्यी आतां ॥ देवो आह्मां सकलां स्फूर्ति ॥ २ ॥

(सूत्रधार प्रवेश करितो)

सूत्रधार—परमेश्वरा !

श्लोक—राग—कानडा.

मी अज्ञ सर्व मतिहीन ह्मणोनि पात्रें ॥
जैशीं शिथील असतां मन दुःखि गात्रें ॥
होईल यांस प्रिय ही कृति काय माझी ॥
चिंताग्नि हा विझवुनी यश देइं आजी ॥ १ ॥

(इकडे तिकडे फिरून व पाहून) इकडे येण्याविषयीं मी प्रियेला निरोप पाठविला तो कशा करतां, याच गोष्टीचा विचार करीत ती इकडे येत आहे असा तिच्या मुद्रेवरून भास होतो. (नटी येते.)

नटी—(आपल्याशीं विचार करीत)

पद—(दीनोद्धरणा उद्धरिं दीना.) या चालीवर.

"थाट अभिनव करुनी सखये ॥ शीघ्र नटूनी रंगस्थलिं ये" ॥ केलि अशी आज्ञा पतिरायें ॥ ध्रु० ॥ काय असावें मज हें न कळे ॥ तेविं सुजन कां ये. स्थलिं जमले ॥ दीप. तरू जणुं .पंक्तीं बसले ॥ पावुनि भ्रांती शंकित मन हें ॥ १ ॥

सूत्रधार—(तिच्याजवळ जाऊन)

साकी.

सांशंकित तव मन कां झालें सखये आज असें हें ॥ नवनाटकदर्शनास धरुनी हा जन बसला आहे ॥ वाटे नवल मनीं ॥ तुजला शंकित पाहोनी ॥ ध्रु० ॥

नटी—(आश्चर्यानें) काय ह्मटलं ? नाटक ? (विचार करून)

पद—(सुट्ला पितृदिशेचा वारा.) या चालीवर.

निंदिल हा जन कीं निशिदिनीं ॥
होइल छी, थु आपुली जनीं ॥
जनमनें कशीं आपणां ॥ ठाउकीं असुनी ॥
हे विचार आले कसे आपुल्या ध्यानीं ॥ १ ॥
ह्मणतिल आप्त, बंधु काय या ॥
तैसा मित्रवृंद तो प्रिया ॥
रात्रिचा दिवस करुनियां ॥ शिणवितां काया ॥
विनंति ही माझि समयिं या नाद हा वायां ॥२॥

सूत्रधार—(रागानें) काय ?

नटी—(विचार करून निरुपायामुळें) कांहीं नाहीं. ही मी आपल्या सेवेंत तत्पर आहें. पण कथाभाग पौराणिक लावायचा कीं ऐतिहासिक ?

सूत्रधार—(शांत होऊन) प्रिये, पौराणिक कथा

भाग आजपर्यंत हे रसिकजन पहात आलेच आहेत.

नटी—तर मग आपल्या मनांतून अलिकडील ऐतिहासिक एखादा भाग करून दाखविण्याचा रंग दिसतो !

सूत्रधार—(हंसून) तूं तर माझ्या मनांतलंच ताडलंस!

नटी—पण कोणता, तें मात्र नाहीं.

सूत्रधार—तो मी सांगतों आतां. गोब्राह्मणप्रतिपाल करण्याची ज्यांची प्रतिज्ञा, असे जे—साक्षात् शंकराचा अवतार—आपले—

नटी—(मध्येंच) शिवछत्रपति महाराज कीं काय ?

सूत्रधार—होय. तेच. त्यांचे वडीलचिरंजीव युवराज संभाजी, यांच्या चरित्राचा भाग करून दाखवावा, असं माझ्या मनांत आहे.

नटी—पण त्यांच्या चारित्रभागांत विशेष घेण्यासारखा भाग कोणता आहे बरं प्राणनाथ ?

सूत्रधार—प्राणांतींही धर्मत्याग न करणारा अद्वितीय गुण, हा आहे.

नटी—(आश्चर्यचकित होऊन) प्राणनाथ, त्यांचे ते सर्व दुर्गुण झांकायचे ह्मणजे त्यांच्या गुणांचं निरर्थक वर्णन केल्यासारखं होणार आहे बरं!

सूत्रधार—काय ह्मणतेस ? दुर्गुण ?

नटी—होय–त्याच्या दुर्गुणांनीं शिवाजी महाराजांचे अलौकिक गुण कसे लोपून टाकले, त्याची साक्ष आजचा हा समयच देत आहे.

(मागील पदाची चाल.)

नभ हें आच्छादित मेघांनीं ॥
चमंकति सौदामिनि या मधुनी ॥
दिनमणि-प्रभा या क्षणीं ॥ राहिली लपुनी ॥
वर्षताति हे अनिवार मेघ कडकडुनी ॥ ३ ॥

सूत्रधार—(भय पावून)

साकी.

नाहिं कशी तुज भीति बोलसी भलभलतें हें आजी ॥
हा आला बघ शिवरायाचा जेष्ठ तनय संभाजी ॥
ह्मणुनी जाउं चला ॥ लागूं अपुल्या कार्याला ॥ ध्रु० ॥

(जातात. ही पुढील कथेची प्रस्तावना झाली.)

[नंतर शिकारीचा पोषाख केलेले संभाजी व एसाजी येतात.]

पद.—भूप—धमार.

करुनि धडधड नाद नभिं हे ॥
गर्जती बहु वर्षती अति । जलद पाहे ॥ ध्रु० ॥
भूमिभागीं वृक्ष कडकड ॥
पडति झंझावात वाहे ॥

किलकिल स्वन करुनि खगगण । उडत आहे !

संभाजी—

पद.—(आईरे बदरीया) या चालीवर.

मधुनि मधुनि ही चंचल चपला ॥
चमके परि मज भासे कुटिला ॥ ध्रु० ॥
दावुनि क्षणभरि देह आपुला ॥
नष्ट परी क्षणिं होत कशाला ॥
दृश्य पुन्हां दिपवी नयनांला ॥ १ ॥

एसाजी—महाराज, हें पाहिलंत का ?

पद—सोहोनी—त्रिवट.

मेघबिंदु हे टपटप गळती ॥
गारांसम जलधारा वर्षति ॥ ध्रु० ॥
पक्षि भराऱ्या मारित वृक्षीं ॥
लपुनि राहिले भक्ष्य न भक्षी ॥
उरग-व्रज निर्भय पथ लक्षी ॥
करुण स्वन हे नच ऐकवती ॥ १ ॥

संभाजी—एसाजी, अरे, अशा प्रसंगींही ज्याचा आनंद परमावधीस येऊन पोहोंचला आहे, असा एक प्राणी अजून तुझ्या लक्षांत आला नाहीं ?

दिंडी.

सैल करुनीयां आपुला पिसारा ॥
गाळितो कीं आनंद-अश्रु-धारा ॥
करुनि टाहो बाहि जो स्वप्रियेतें ॥
असा केकी बघ नाचतसे तेथें ॥ १ ॥

एसाजी—परंतु सरकार, या वेळचीं हीं
कांहीं ठीक दिसत नाहींत ! मधून मधून
डाट, विजांचे कडकडाट, जलधारांची
त्यांत या वनपशूंच्या भयंकर गर्जना—
येत आहेत ! (घाबरून मेघाकडे

पद.—(दूर मी झालें

निर्दय मेघा वर्ष
कडकडुनीयां
योग्य
अ

सं
यांचे
समं

साकी.

ाल जलद बहु वर्षति चमके अंतरिक्षिं ही चपला ॥
नि सहज हरि, व्याघ्रांदिक पशु-निकर दृश्य जहा-
असतां हें ऐसें ॥ निंदिशि व्यर्थ तयां कैसें ॥ धृ० ॥

ाजी—महाराज, आपण कांहीं ह्मणा, पण हें
सारखं वाढतच चाललं आहे! या वाऱ्याच्या
ोठमोठाले जुनाट वृक्षदेखील बुंधासकट खाली
घड पडत आहेत! त्यांच्या घर्षणानं
अग्नि एका क्षणांत सर्वांची आहुती
वाटतं!!

व: ! एसाजी, अरे, तूं शिकार
मग असा भितोस कां?
गाळायचं असेल तर तूं

ाला सोडून
सारख्या
फार

आंगीं

एसाजी—(हात जोडून) महाराज, जिवावरचा प्रसंग येण्यासारखा हा समय आहे, असं सुचविण्यांत दासाच्या हातून एखादा प्रमाद घडत असल्यास महाराजांनीं क्षमा करावी.

संभाजी—एसाजी, तुझ्या हातून कितीही प्रमाद घडले तथापि, मला ते मान्यच आहेत. कारण—

पद.—(काय बेव्या हरिणाचि.) या चालीवर.

ज्या दिवशीं सुंदरी तुळशिच्या कीं मत्प्रेमाची ॥ स० ॥
गांठ बांधिली गेली तेव्हांपासोनी साची ॥ सख्यारे ॥
ह्मणून समजुनी तुजला तीची बहु विश्वासाची ॥ स० ॥
करुनी ताइत या कंठांतिल धरिला तेथेंची ॥ स० १ ॥

पण कायरे एसाजी, 'घरीं जाऊन स्वस्थ बैस' असं मी मघां ह्मटलं, त्याचा तुला, मला वाटतं, किंचित तरीं राग आला असेल ?

एसाजी—(हात जोडून) असं होईल कसं सरकार ! आह्मीं किती केलं तरी शेंदाडशिपाई. 'घरीं जाऊन स्वस्थ बैस' असं जें आपण मला ह्मटलं, तेंच खरं. (वाघाची गर्जना होते.) कारण ही वाघाची गर्जना ऐकून तो या ठिकाणीं येऊन आपणांला खाऊन टाकील.

कीं काय, असं मला वाटूं लागलं आहे ! ह्मणून ह्मणतों—
(पुन्हां गर्जना होते.)

संभाजी--(ऐकून) हो खरंच. तुझ्या जिवालाही आह्मांला जपायचं आहे, ह्मणून एखाद्या निर्भय जागीं जाऊं; मग तर झालंना तुझ्या मनाप्रमाणं ? (थोडें चालून) पण गड्या, आतां निर्भय जागीं जाण्याचं कारणच उरलं नाहीं. कारण,

पद—(सुवर्ण केतकिपरि जो.) या चालीवर.

श्रमले बहु ते मेघ वर्षुनी स्तब्ध बैसले त्याचपरी ॥
कडकडाट अति करुनी आतां सौदामिनि ती मौन धरी।
महावात तो शब्द करी नच न कळे भिउनी शांति वरी॥
पसरुनि जलधर चोहिंकडे नभ स्वच्छ दीसतें किती तरी
सलिलबिंदु तुज एक दिसे का पडतां तरि ह्या भूमिवरी।
लेश तिमीर न, पहा दिसत त्या नमस्कार दिनकरा करी,

या स्थितींत आतां जिवावरचा प्रसंग यायची मुळींच धास्ती नाहीं.

एसाजी—तरी पण धनीसाहेबांनीं विशेष सावधपणा राखावा. कारण, येणारा प्रसंग तो अजून पुढंच आहे. भयंकर गर्जनां हीं त्या प्रसंगाचीं पूर्वचिन्हं.

संभाजी—तर तुझ्या ह्मणण्याप्रमाणं आह्मांला आतां विशेष सावधपणा राखिला पाहिजे! ठीक आहे. यापुढं तुझ्याच इच्छेनुरूपं वर्तनक्रम ठेवूं. (इतक्यांत वाघाची गर्जना होते.)

एसाजी—(एकीकडे) हरामखोरा, तसाच आमच्या तावडींत सांपडला आहेस; तेव्हां माझ्या इच्छेनुरूप वर्तनक्रम न ठेवून करशील काय? अरे, ह्या एसाजीचे आंतले दांत अद्यापि कुंठ पाहिले आहेस तूं? (उघड) धनी साहेबांच्या या भाषणा मुळं मी आपणास धन्य मानतों. (दूर अंतरावरून वाघास येतानां पाहून घाबरून) वाघ—वाघ—वाघ! महाराज, तो पाहिलात मोठ्या ऐटीनं डुलत डुलत, आळस टाकीत, शेंपटी हालवीत आपणांकडे कोणी येत आहे! मी मघाशीं सांगितलेला जिवावरचा प्रसंग तो–ही वाघोबांची स्वारी–संभाळा आतां–

संभाजी—(वाघास येतांना पाहून) गड्या, बेतशी खरी. त्या वीराला दोन हात दाखविल्याशिवाय इथून आपली सुटका होणं नाहीं; तर मी आतां सांगतों असं कर. तें पहा, डाव्या आंगाला एक वडाचं झाड दिसत आहे. पाहिलंस? त्यावर तूं लौकर जाऊन बैस. तें

मात्र अशा थाटानें, कीं धनुष्य सज्ज करून ठेविलेलं. माझा इशारा झाला, कीं बाणांचा वर्षाव एकसारखा झाला पाहिजे. हं, त्वरा कर आतां. स्वारी बसली आहे तों सहज तूं त्या झाडापाशीं जाऊन पोहोंचशील. हा मी एकटाच त्याच्या आंगावर चालून जातों. (जातो)

एसाजी— जा—आयताच काळाच्या दाढेंत सांपड-शील. आपणही आतां इथं काय मजा होते, ती कांहीं वेळ पाहून संधी साधून घरचा रस्ता सुधारावा. (निघून जातो.)

(वेषांतर केलेला जोत्याजी केसकर येतो.)

जोत्याजी—माझे धनीसाहेब खचीत मजवर रागावले असतील. पण मीं तरी काय करावं? त्या कृत्याचा पुरा सुगावा लागल्याशिवाय तर मला परत येतां येत नव्हतं? (विचार करून) चिंता नाहीं. महाराजांची क्षमा मागून, त्यांचा राग कसाही शांत करतां येईल; परंतु ज्या कृत्याचा स्वप्नांतही मागमूस लागणं कठीण, तें आज मला कसं पूर्ण समजून चुकलं आहे. हा, एक महाराजांच्या जिवावरचा प्रसंगच टळला ह्मणायचा. माझी व त्यांची असल्या प्रसंगीं आज तुटातूट पडली हें एकपरी ठीक झालं; नाहींपेक्षां, तो दौलतराव शिरका महारा-

जाच्या पाळतीवर असल्याबद्दलची बातमी मळी न लागतां आंज मोठा घात होता! असो. आतां त्यांचा शोध लवकर करून त्यांना ही बातमी द्यायची. (कांहीं चालून चोहोंकडे पाहून) अरे पण हें काय? ह्या गाई, तशींच हीं हरिणांचीं पोरं सैरावैरा पळत सुटलीं आहेत, याचं कारण काय? (थांबतो. तों आपल्या गाई, आवरण्यासाठीं त्यांच्यां मागें धांवत असलेला एक गुराख्याचा पोर येतो.)

गुराख्याचा पोर—

लावणी—(तरनिजान तूं बिजलीवानी.) या चालीवर.

ऐन दुपारीं माझ्या गाई ॥ हुसकवल्या कोंणी ॥ कुणाला
भिऊन पळति रानीं ॥१॥ धांवतों मी त्यांच्या मागं लइ॥
अवराया त्यांसनी ॥ आटोक्यांत न्हाइ येत अजुनी ॥२॥
करूं आतां मी तरि गत कायी ॥ पुसातिल माझे धनी ॥
काय सांगुं तयांलागुनी ॥ ३ ॥

(दुरून जोत्याजीला पाहून) त्यो योक मानुस त्या झाडीच्या पल्याड चाललेला दिसतुय, तेला जाऊन इचाराव. (जोत्याजीजवळ जाऊन) रामराम धनीसाब. भर दोनप्रारच्या येळीं आमच्या गाई चौपायी पळत्यात, हेच कारन तुमाल्ली ठाव हाय का सरकार?

जोत्याजी—(रागावून) चल, नीघ इथून. तुझ्या गाई कां पळतात, हें मला काय माहीत.

गु० पोर—न्हाई आपला संज–कारन, तुमच्या हातामंदी तीरकमटा हाये, अन अक्शी तरवार बी–

जोत्याजी—(आपल्या तरवारीस हात घालून) कां, फार गमजा लावल्या आहेस ? पाहिजे कां कांहीं बक्षीस ? कीं होतोस मुकाट्यानं चालता–

(पोर निघून जातो, इतक्यांत दुसरा येतो.)

लावणी–(कंगनिदार भर्जरी पिळाची.) या चालीवर.

अकडबाज हरिणांचि छबकडी लइ गोजिरवाणीं ॥ धापा टाकित पळत सुटलीं आज कुणा भिऊनी॥माझ्या चौफेर धांवती गाई या रानीं ॥ जंगलामधिं या येउन धांदल केली ही कोणी ॥ १ ॥

(जोत्याजीला पाहून) हँ, आल ध्येनांत. ह्योच त्यो हेच्या हातामंदी धनुकडी हाये; तवां हेनच आमच्या गाई हुसकवल्या न काय! ह्यो पारधी हाये पारधी. (जोत्याजीस)

लावणी—(नग पळून जाऊं) या चालीवर.

कुनिकड सांगा राव जाता ॥
तुह्मी राज अकडबाज दिसता ॥ घृ० ॥
हातिं धेऊन तीरकमठा ॥

या रानांत कुणाला बघतां ॥ १ ॥
तुह्मा भिऊन गाई पळती ॥
हित शिकार कशापायिं करता ॥ २ ॥

जोत्याजी—(हंसून) काय मजा आहे पहा ! ही गुराख्यांचीं पोरं, पण केवढा कावेबाजपणा लढवून माझ्याशीं बोलत आहेत ! पाहिला, ' माझ्या गाई पळूं कां लागल्या '.ह्मणून विचारतो, तों हें दुसरं कार्टं येऊन, जशा कांहीं याच्या गाई मीच हुसकावून लावल्या, अशा थाटानं—मी कोण, कुठं जातो व या रानांत शिकार कां करतों—ह्मणून मला प्रश्न करीत आहे ! पण यांना असं कळत नाहीं कीं, यांच्या गाई विनाकारण पळवून मला काय कर्तव्य आहे ! (इतक्यांत वाघाची भयंकर गर्जना होते, ती ऐकून गुराख्याच्या पोरास ह्मणतो) हूँ, ही ऐकलीस वघाची गर्जना ? तुझ्या गाई आणि हीं दुसरीं जनावरं पळण्याचं कारण हें. (पुन्हां गर्जना होते.) ही ऐक पुन्हां. मी त्यांना पळविल्या नाहींत बरं ! जा आतां (तो जाऊं लागतो त्यास हाक मारतो.) अरे, पण इकडे पहा—मी असं विचारतों, या रानांतून कांहीं लोक जातांना तुला आढळले कां ! माझ्या सारखींच त्यांच्यापाशीं असलीं हीं हत्यारं आहेत—

गु० पो०--व्हयं धनीसाब. ते आज सकाळच्यापारीं याच वाटेन गेल. अन त्या ह्योरच्या डोंगरावर चढतांना म्या आपल्या डोळ्यान बगितल सरकार. तेंच्या संगाती घोड बी व्हई हायती.

जोत्याजी—ठीक आहे. जा तूं. (पोर० निघून जातो.) या जंगलांतील जनावरांच्या एकंदर गडबडीवरून कुणी तरी शिकार खेळण्याकरतां रान उठविलं असावं, हा माझा तर्क अगदीं खरा ठरतो; आणि तें सुद्धां आमच्या धाकट्या महाराजांनींच—कारण आतांच त्या दुसऱ्या गुराख्याच्या पोरानं माझ्या शंकेचं समाधान होण्याजोग्या कांहीं खाणाखुणा सांगितल्या त्यामुळं संशयाला जागा ह्मणून बिलकूल राहिली नाहीं. आतां होईल तितकी त्वरा करून त्या पोरानं सांगितलेलं तें ठिकाण आधीं गाठायचं. (जातो.)

(नंतर वाघाबरोबर संभाजीची झटापट चाललेली दृष्टीस पडते.)

संभाजी—(वाघास जमीनीवर पाडून मोठ्यानें) धांवरे धांव एसाजी—(जोत्याजी येतो व जमिनीवर पडलेल्या वाघास तरवारीनें. ठार करून दूर उभा राहतो. संभाजी, हा आपला एसाजी नाहीं असें पाहून ह्मणतो.) वः शाबास! भले बहाद्दर! छान शिकार साधलीस!

पद—(कोण तुजसम सांग मज.) या चालीवर.

कोण कथिं मज नांव तव तूं असशी ॥ आतां बा मजशीं ॥
राहुनी पढलासी विद्या ऐशी ॥ ही कोणापाशीं ॥ १ ॥
गुंतुनी नच असु-आशा-पाशीं ॥ साहस केलेंसी ॥
नाहिं सीमा या तव धैर्यासी ॥ प्रियसखा गमसी ॥ २ ॥

जोत्याजी—(हात जोडून) महाराजांनीं मला ओळखलं नाहीं ! आजपर्यंत आपलंच अन्न खाऊन लहानाचा मोठा झालेला व एका घटकेच्याच चुकामुकीमुळं कृतघ्नपणाचा डाग लावून घेतलेला, या चरणाचा दासानुदास हा जोत्याजी, पुढील जिवावरच्या प्रसंगाची सूचना देण्याकरतां महाराजांसमोर हात जोडून उभा आहे.

संभाजी—(आश्चर्यानें) काय ह्मणतोस ? जिवावरचा प्रसंग ? आणि त्या प्रसंगाची सूचना देण्यासाठींच हें वेषांतर केलं आहेस कीं काय ?

जोत्याजी—नाहीं सरकार. स्वारी अमक्याच वेळीं शिकारीस जायची हें मला बरोबर ठाऊक नसल्यामुळं सरकारस्वारी बहुधा आपल्या खासगी महालांत असेल, अशा धोरणावर मी तिथं जायला निघालों; तों वाटेंत एका मनुष्यानं येऊन मला अशी बातमी दिली कीं, “ तुळशीबाई व एसाजी फर्जंद (चोंहोंकडे न्याहाळून

पाहतो) या दोघांच्या, संभाजी महाराजांचा घात कर- ण्याविषयीं—शिव, शिव ! नको, ते अमंगल शब्द उ- च्चारणं देखील नको !—कांहीं गुप्त मसलती चालल्या आहेत. ” ह्मणून मी लागलीच हें वेषांतर करून नि- घालों, आणि त्यांच्या घराच्या आसपास राहून या दुष्ट बातमीचा बारकाईनं पुष्कळ तपास केला, परंतु कांहीं एक सुगावा न लागतां ही बातमी तूर्त निव्वळ बनावट आहे, असं समजलं. तेव्हां मग त्याच पावलीं निघून खासगी महालाकडे गेलों, आणि विचारपूस करतों तों ‘ सरकारस्वारी शिकारीस जाऊन एक घटका होऊन गेली ’ अशी बातमी लागली. त्यासरशी या वेषांतराचं भान न राहून धांवत जंगलाची वाट धरली. माझं कांहींसं सुदैव, ह्मणूनच हे चरण लवकर दृष्टीस पडले !

संभाजी—मग जिवावरचा प्रसंग ह्मणतोस तो कोणता ?

जोत्याजी—तो घातकी दौलतराव शिरका आज महाराजांच्या पाळतीवर आहे !

संभाजी—बरं, तुळशीच्या व एसाजीच्या माझ्या नाशाविषयीं गुप्त मसलती चालल्या आहेत, हें तुला कुणी येऊन सांगितलं ?

जोत्याजी—तो मनुष्य मला बरोबर ओळखतां आला नाहीं. परंतु या वेळीं माझी पुरी खात्री होऊन, चुकली आहे, कीं आजचा हा शिकारीचा बेत, महाराजांस एकांतांत गांठून त्या शिरक्याचा दुष्ट हेतु साधावा ह्मणून त्यांनीं मुद्दाम जुळवून आणलेला; आणि सरकारस्वारी शिकारीस जायच्या आधीं एक घटका, आपल्या गुप्त मसलतीची एका इसमा कडून खोटी बातमी देववून त्यांनीं महाराजांपासून मला दूर केलं, तें तरी त्याच हेतूनं. ह्मणून ह्मणतों, धनीसाहेबांनीं या वेळीं सावध रहावं; आणि यापुढं तरी त्या दोघां बहीणभावंडांच्या त्या वरकांती मानभावीपणास भुलूं नये. कारण, ती तुळशी मोठी साहसी बायको आहे. तसाच तो एशा—मोठा दगलबाज मनुष्य आहे त्या दोघांचं तें महाराजांवरचं प्रेम खरं नसून वरकांती आहे. त्यांच्या तोंडांत मध पण पोटांत वीष असून त्यांचा बाप हिरोजी फर्जंद याला आपण कुस्तींत मारल्या दिवसापासून आपला घात करण्याविषयींचे त्यांचे गुप्त बेत जारीनं सुरू आहेत! हें म्यां पुन्हां काय सांगावं!

संभाजी—जोत्याजी, काय ह्मणावं तुला आतां? हें

M&W 891.462 P856

कुणी तरी पाजी मनुष्यानं निव्वळ खोटे वहीम तुझ्या मनांत भरवून दिले आहेत. अरे,

पद—(दैवयोग दुर्विपाकं.) या चालीवर.

प्राणाहुनि बहु मानुनि त्यांनिं कीं मला ॥
मजवरती जाण पूर्ण लोभ ठेविला ॥ ध्रु० ॥
निष्कपटें वागे मशिं तिजशिं मी जसा ॥
एसाजीवर माझा फार भरंवसा ॥
दिसत वरी स्वच्छ परी अंतरीं तसा ॥
निंदिशि त्यां वाटे चळ लागला तुला ॥ १ ॥

National Library, Calcutta-27.

(रागावून) खबरदार पुन्हां अशी गोष्ट माझ्या कानीं आणशील तर—

जोत्याजी—(लवून नम्रतेनें) जशी आज्ञा. पण महाराजांचा इतका भरंवसा बसण्यासारखी त्यांच्या हातून अशी कोणती मोठी कामगिरी बजावली गेली आहे, हें कांहीं कळत नाहीं.

संभाजी—आणि तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास बसावा, असं तुझ्या हातूनही कोणतं महत्कृत्य घडलं आहे, याचं मला सुद्धां मोठं गूढ पडलं आहे.

जोत्याजी—(मुजरा करून) धनीसाहेबांबरोबर

वादविवाद करण्याची माझी ताकत नाहीं; तरी अद्यापि सांगणं ह्मणून इतकंच कीं—

संभाजी—(त्याकडे डोळे वटारून पाहतो.) बस्स—पुरे कर—

(इतक्यांत दौलतराव शिरके येतो. जोत्याजी 'दगा धनीसाहेब-तो पहा दौलतराव—संभाळा—' ह्मणून आरडतो. शिरके संभाजीवंर वार करतो. तो डोळ्यावर लागतो. संभाजी मूर्छित पडतां पडतां दौलतरावाची गर्दन उडवितो.)

जोत्याजी—(आधींच आपल्या तरवारीनें दौलतरावावर वार करून संभाजीस मूर्छित पडतांना पाहून) अरेरे ! हें काय झालं ! महाराज ! ! (मूर्च्छित होतो. पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—तुळशीचें घर.

(राजपुत्र संभाजीच्या घाताविषयीं उत्सुक अशी तुळशीबाई येते.)

तुळशी—

पद—ताल-धमार.

कंठ चरचर चिरुनि मारिन शिव-सुता त्या निश्चयें ॥
कीं वधावी खाटिकें जशि सौरभेयी निर्दयें ॥

येसुबाई धायिधायी त्याचि रडविन अंगना ॥
सत्य हें नच होय तर मम पितर भोगुत यातना ॥ १ ॥

अहाहा ! काय सांगू ! मला कुणी एखादा चांगलासा साथीदार अनुकूळ असता तर खचीत सांगतें, मीं आपलं काम हं हं ह्मणतां तेव्हांच तडीस नेलं असतं. अथवा, आमच्या दादासाहेबांचं तरी किंचित् जोराचं पाठबळ मला पाहिजे होतं; पण सर्वच प्रतिकूळ ! ! ॰

पद—(रुचती का तीर्थ यात्रा०) या चालीवर.

नच मातें स्नेहि कोणी दिसताचि या भूवरी ॥
सफलेच्छा होय कैशी मी अबला स्त्री तरी ॥
दादाची आमुच्या त्या स्थिति तैशी बावरी ॥
यायोगें होत सारी तळमळ या अंतरीं ॥ १ ॥

(विचार करून) अरे, पण अगदीं निराश होतांही कामांनये. अशानं मग आपण हातीं घेतलेलं काम तडीस जाणार कसं ? प्रयत्नांतीं आज नाहीं उद्यां या कृत्यांत यश मला आलंच पाहिजे. (एकाएकीं दचकल्यासारखं करून) अगबाई ! हें काय !

श्लोक—(शार्दूलविक्रीडित.) राग–मांढ.

एकाएकिं मदीय नेत्र न कळे कां हा लवूं लागला ॥
होई मानस कां दुभंग नसुनी भीती कुणाची मला ॥

येती मन्मानिं या कुतर्क, शकुनी दुःशब्द हर्षें करी ॥
दुश्चिन्हें अशिं हीं मला भिवविती कां आज या मंदिरीं१

यावरून पुढं माझ्यावरं कांहीं तरी संकट येणार खचीत ! एकंदरीनं मी जें कांहीं करायला तयार होतें, त्यांत मला उमेद येईल असं एकही दिसत नाहीं !

अंजनीगीत.

आश्रय कोणाचा मज नाहीं ॥ आप्त, बंधु परि स्तब्धचि तेही ॥ दुश्चिन्हें तर होति अशीं हीं ॥ काय करूं आतां१

(विचार करून) अथवा काय करायचं ! हे रिकामे व्याप न करतां स्वस्थ बसावं, झालं ! (पुन्हां विचार करून) पण मी असं कसं ह्मणतें हें ? अशा रीतीनं हातपाय गाळल्यावर मग माझ्या हातून कांहींच होणं नाहीं, आणि स्वर्गस्थ झालेल्या माझ्या बाबांची इच्छा मग कशी बरं सफल व्हावी ? त्यांच्या दहनसमयीं मी दुर्धर प्रतिज्ञा नाहीं का करून चुकलें ? मग त्या माझ्या प्रतिज्ञेचा मला यावेळीं विसर कसा पडू पाहतो ? (कांहीं वेळ स्तब्ध राहून रागानें) नाहीं, नाहीं—ज्यानं माझ्या प्रिय ताताचा कपटानं घात केला, त्या संभ्याचा सूड उगविल्याशिवाय माझ्या जिवाला विश्रांति अशी कधींच वाटायची नाहीं. तो पुर्तेपणीं माझ्या आटोक्यांत मात्र सांपडावा; कीं मी

आपली प्रतिज्ञा शेवटास नेलीच ह्मणून समजा. मी जातीनं स्त्री असलें ह्मणून काय झालं? आह्मां स्त्रियांच्या अंगांत बल अथवा त्वेष कमी-असं थोडंच आहे? हे पुरुष मात्र आह्मांला अबला ह्मणून आपल्या सबलत्वाचा झेंडा चार लोकांत बळंच मिरवूं पाहतात, पण त्या मूर्खांचे कान उपटून त्यांना असं कोणी सांगत नाहीं, कीं–

साकी.

नेत्रकटाक्षें ज्यांनिं जिंकिले सुरासुरां, मनुजातें ॥ चुंबक मणिसम शक्ति जयांच्या आंगीं अनुपम वसते ॥ गुणमंडित बाला ॥ ह्मणतां केविं तयां अबला ॥ धृ० ॥

खरोखर मी तर त्या कृतघ्नांचा आपमतलबी स्वभाव पुरता ओळखून आहें. अहो,

पद—(नृपममता रामावरती.) या चालीवर.

आति निर्दय ती नरजाती ॥ वश केवळ कामा पुरती ॥ खचितचि ॥ मधु बोलुनियां वरकांती ॥ फसविती दीन किति युवती ॥ खचितची ॥ मन ठेवुनि एकीवरती ॥ वांछिती क्षणीं ती भलती ॥ खचितची ॥ चाल ॥ अंतरीं ॥ प्रीति ती खरी ॥ नाहिं परि वरी ॥ कैशि दाखविती ॥ हृत्प्रांतीं त्वा विषभरती ॥ खचितची ॥ १ ॥

जळोत हे विचार. आपण ज्या कामाचा विडा उच-

लला आहे, त्यासंबंधी विचार आपल्याला आधीं केला पाहिजे. (जीभ चावलीसें करून) 'इडा पिडा टळो अमंगळ पळो !' अगबाई ! माझ्या मनाची एकाएकीं अशी ही चमत्कारिक स्थिति कां बरं व्हायला लागली ! हे भलतेच विचार माझ्या मनांत कां येऊं लागले ! माझ्या हृदयांत कसली ही धडकी भरून आली ! आई कुळस्वामिणी ! अंबाबाई ! माझा आधार सर्वस्वीं तुझ्यावर आहे ! आईग, भलतंसलतं ऐकायला हे माझे कान शाबूत ठेवूं नकोस बरं !

एसाजी—(अडखळत) पण ताई, ती दुष्ट बातमी तुला कळविण्यास माझी वाणी अजून कायमंच आहे.

तुळशी—(घाबरून) काय ह्मणतोस बाबा ? नीट सांग काय असेल तें ?

एसाजी—(श्वास टाकून) आतां काय सांगायचं ! तुझ्या सौभाग्य–मंदिरावर त्या दुष्ट संभाजीनं घाला घालून —(स्तब्ध होतो.)

तुळशी—(शोकानें) काय ? झाला ! आटपला का माझा संसार ! ! (गळेसर एकाएकीं गळून पडतात, त्यां कडे पाहून कपाळावर हात मारून) हा ! फुटक्या कपाळा !"

माझं सौभाग्य—प्राणेश्वरा—प्रियकरा—(मूर्च्छित पडते. एसाजी तिला सावध करतो. ती सावध होते व क्रोधावेषानें बेफाम होऊन) काय? माझ्या प्रियाचा घात? आणि त्या अधम, चांडाळ संभ्याच्या हातून ? (मोठ्यानें किंकाळी मारून)

कंठ चरचर चिरुनि मारिन शिव-सुता त्या निश्चयें ॥
कीं वधावी खाटिकें जशि सौरभेयी निर्दयें ॥
येसुबाई धायिधायी त्याचि रडविन अंगना ॥
सत्य हें नच होय तर मम पितर भोगुत यातना ॥१॥

(निघून जातात.)

पहिला अंक समाप्त.

अंक २ रा.

स्थळ—एक रस्ता.

(जोत्याजी येतो.)

जोत्याजी—थोरल्या सरकारांच्या आज्ञेवरून संभाजी महाराजांचा शोध करण्याकरतां तर सर्व शहरभर मी संचार केलाच; परंतु अद्याप पावेतों कुठंच कांहीं सुगावा लागला नाहीं. मात्र तेवढं त्या एसाजी फर्जंदाच्या घरीं शोध करणं राहिलं आहे, तितकं उरकून हें वर्तमान सरकारांच्या कानावर घालून आपण आपल्या तूर्तच्या कामगिरींतून मोकळं व्हावं. (पडद्याकडे पाहून) हा मोठ्या ऐटीनं डुलत डुलत इकडे कोण येत आहे बरं ? (पुन्हां पाहून) अरे वः हा तर माझा प्रिय मित्र हिम्मती, असो, हें एक परी ठीक झालं, कीं अशा ऐन वेळीं याची गांठ पडली; तेव्हां यापासून आपल्याला थोडा तरी उपयोग करून घेतां येईल. (हिम्मती येतो; परस्परांचे रामराम होतात; जोत्याजी त्यास विचारतो.) कां हिम्मतराव, ही अकड करून स्वारी आज कुणीकडे झुकली होती ?

हिम्मती—झुकली नव्हती, पण झुकायची आहे हें मात्र खचीत. पण तूं आज असा रिकामासा ?

जोत्याजी—छे छे, वेड्या, असं कसं ह्मणतोस? आज तर मोठ्या महत्वाच्या कामावर माझी योजना झाली आहे.

हिम्मती—तें कोणतं बरं?

जोत्याजी—इकडे जवळ ये ह्मणजे सर्व तुला सांगतों (त्याच्या कानांत सांगतो.) समजलास? ती ह्मणजे केवळ गरीब गाय बरं! पुन्हां आपणास वंद्य अशा ब्राह्मण जातीची—तिचा विनाकारण छळ झाला, ही धाकट्या महाराजांच्या हातून केवढी मोठी चूक झाली मित्रा! आतां कुठं तरी त्यांचा शोध करून, शिवाजीमहाराजांनीं त्यांस याक्षणीं बोलावलं आहे, इतकं कळवून आपण मोकळं व्हायचं. थोरल्या महाराजांची आज्ञा आणि धाकट्या सरकारांचा शोध हेंच काय तें माझं महत्वाचं काम; दुसरं काय!

हिम्मती—पण प्रत्यक्ष शिवाजीमहाराज—ह्मणजे गाईब्राह्मणांचा प्रतिपाल करण्याचं ज्याचं व्रत—त्यांच्या दृष्टीआड तरी असं धाडस त्यांच्यानं करवलं कसं?

जोत्याजी—हें अनुचित कर्म करण्याची बुद्धि त्यांनां कशी झाली, हरी जाणे! बरं, हें एक असो; परंतु शिवाय दुसरं व्यसन, त्या तुळशी चांडाळणीचं!

आणि तें तर अगदीं हाडीं खिळून. राहिलेलं तेव्हां मला तर खरोखर भय वाटतं, कीं ती तुळशी आणि तिचा भाऊ तो एशा–दोघं बहीणभावंडं महाराजांवर कोणत्या वेळीं काय संकट आणतील, याचा कांहीं नेम सांगवत नाहीं ! कारण, तिचा भावी पति तो दौलतराव शिंरका याला–कांहीं दिवसांपूर्वीं महाराज शिकारीस गेले होते–त्या ठिकाणीं त्यांनीं ठार केला, त्या दिवसापासून तिच्या वृत्तींत कांहीं विशेष चलबिचल झाल्यासारखी दिसत आहे; आणि महाराजांचा घात कसा होईल, अशाविषयीं आपल्या भावाबरोबर तिचीं खलबतं नेहमीं सुरू आहेत. परंतु आपल्या राजेसाहेबांना याविषयीं गंधवार्ता नाहीं. बरं, एखाद्यानं हिय्या करून ही गोष्ट कानीं घातलीच तर ती खरी वाटत नाहीं. बरोबरच आहे. त्यांचीं पूर्ण भरंवशाचीं माणसं काय तीं दोघं बहीणभावंडं. तुळशी ह्मणजे त्यांचा जीव कीं प्राण—तेव्हां आमच्या बोलण्याचं तिथें काय तेज पडावं ! परंतु मित्रा, मी सांगतों हें लक्षांत ठेव ! कीं त्यांच्यांवरील तो विश्वास—तोच बरं एखादे दिवशीं महाराजांच्या जिवाला अपाय कारक होणार आहे ! !

हिम्मती—अँ ! अरे अशा माकडांच्या हांतून

काय होणार तें दिसतंच आहे! तसली कल्पना सुद्धां मनांत आणायला नको.

साकी.

मुष्टिप्रहरा मारुनि ज्यानें वधिला मल्ल हिरोजी ॥
काय करिल त्या विघ्न तुळशि ती केवळ अबला स्त्री जी॥
का त्यजि मनिंची ॥ पर्वा करितो कोण तिची ॥ धृ० ॥

(आठवल्यासारखें करून) हो, बरी आठवण झाली. आज दोन एक दिवस झाले, तुला सर्व हकिगत विचारीन विचारीन ह्मणतों, परंतु सरकारवा-ड्यांत जाऊन तुझी भेट घ्यायला मला वेळ कसा तो ह्या वेळपर्यंत मुळींच सांपडला नाहीं. चला, आज सुदैवानंच ह्मणा, तो योग अनायासं जमून आला आहे. हें पहा जोत्याजी; जंजिऱ्याच्या शिद्दीबरोबर केलेल्या लढाईत धाकटे सरकार एकटे असून त्यांनीं फारच परा-क्रम केला ह्मणतात?

जोत्याजी—अरे, त्या वेळचं त्यांच्या त्या पराक्र-माचं वर्णन मी काय करूं! त्यासमयीं तिथं असणाऱ्या सर्व वीरांनीं तर महाराजांचं शौर्य पाहून माना डोलवि-ल्याच; परंतु नेहमीं जे त्यांना पाण्यांत पहाणारें व त्याचं अनिष्ट चिंतिणारे, अशांच्यानं सुद्धां ही वार्ता

ऐकून घटकाभर तोंडांत घोट घातल्यावांचून राहवलं नाहीं. अहाहा! त्या वीरपुरुषाचं वर्णन करावं तितकं थोडंच आहे!!

हिम्मती—गड्या, मुळापासून सर्व हकिगत मला सांगशील तर तुझे मजवर महदुपकार होतील.

जोत्याजी—अरे, पण ही गोष्ट लहानांपासून तों थोरांपर्यंत सर्वत्रांस समजली असून तुला ठाऊक झाली नाहीं, हें मोठंच नवल ह्मणायचं!

हिम्मती—तसं नव्हेरे. तुला ठाऊक आहे, कीं कांहीं सरकारी कामानिमित्त थोरल्यामहाराजांच्या आज्ञेवरून मी कर्नाटकांत गेलों होतों. तो इथं येऊन काय ते सारे दोन दिवस झाले. तितक्या वेळांत तत्संबंधीं इत्थंभूत वर्तमान समजावं तें कसं? आतां नाहीं ह्मणायला एवढी बातमी मात्र लागली आहे. कीं, धाकटे सरकार विजयी होऊन सुखरूप परत आले.

जोत्याजी—झालं तर. समजून घ्यायचं तेंच मुळीं ठाऊक झालं आहे तुला. मग आतां समजावयाचं तें राहिलं आहे काय आणखी?

हिम्मती—हात्तीच्या! इतक्या करतांच मग मुद्दाम

तुझी भेट घेण्याचं मनांत आणण्याची तरी मला कार्य जरूर होती? प्रण मला समजून घ्यायचं आहे निराळंच. ह्मणून तर मघां पासून तुला मी तिनतिनदां विचारतों आहें, कीं लढाईसंबंधीं सर्व हकिकत, ह्मणजे कोणत्या वीरांनीं कसा पराक्रम केला, शत्रूबरोबर आपले लोक कोणत्या रीतीनं लढले, त्यांना जेरीस कसं आणलं व कोणत्या युक्तीनं आपल्या वीरांनीं जय मिळविला, वगैरे वर्तमान सांगून उल्हासाश्चर्यानं घोंटाळलेल्या माझ्या मनास एकदांचं ताळ्यावर आणून ठेव.

जोत्याजी—हें बघ, सर्व हकिकत सांगायला लागलों तर सारा एक दिवसही पुरणार नाहीं. तर त्यांतील महत्वाची तेवढी तुला सांगतों:—प्रथम जंजिऱ्याच्या शिद्दीवर, महाराजांनीं चाल केली. त्याला शरण आणून नंतर फिरंगी लोकांवर आपला मोहरा फिरविला. जातां जातां इंग्रजबहादुरांनाही आंगीं कसलेली शिपायगिरी त्या वेळीं किंचित् दाखविली. परंतु इतक्यांत काय झालं—तो फिरंग्याचा गव्हरनेर कुठून अकस्मात् कडेकोट तयारीनिशीं येऊन, सैन्यावर एकदम छापा घालून त्यानं आमची दाणादाण उडवून दिली; सैन्य बेसुमार खोऊन गेलं; अशा वेळीं काय ह्मणतोस मित्रा, एखाद्या चिडी-

वंलेल्या सिंहाप्रमाणं महाराज खवळून जाऊन मोठ्या वीरश्रीनं ह्मणाले, " भिऊं नका, वीरहो, या वेळीं आपलं अवसान संभाळून समोर दिसत असलेल्या आपल्या शत्रू-वर एकदम जाऊन पडा. असं हें वेड्यासारखं काय करीत अहां ? आज विजयश्री तुह्मांलाच माळ घालणार." त्याबरोबर आमच्या सैन्यानं उलट घेऊन तें शत्रूशीं टक्कर देऊं लागलं. अखेर त्यांना इतकं जेरीस आणलं, कीं त्यांच्या त्या गव्हरनेराला 'दे माय धरणी ठाय' होऊन, आह्मीं कांहीं नियमित खंडणी घेऊन तह करावा, ह्मणून महाराजांस शरण आला. त्याचं तें ह्मणणं कबूल करून अशा विजयश्रीनं मंडित झालेले आपले छोटे सर-कार नगरांत येऊन दाखल होतांच काय सांगूं, जिथं तिथं आनंदीआनंदच होऊन गेला ! सर्व ठिकाणीं त्यांची वाहवा होऊन त्यांत शिवाजी महाराजांना तर त्यांच्या शौर्याचं वर्तमान ऐकून विशेष धन्यता वाटली !

हिम्मती—योग्यच आहे. आपल्या पुत्राचा अलौकिक प्रताप पाहून कोणा पित्याचं मन आनंदित होणार नाहीं ?

जोत्याजी—परंतु कालपासून त्यांच्या जिवाचा अ-गदीं संताप होऊन गेला आहे—

हिम्मती—कां बरं ?

जोत्याजी—'कां बरं' ह्मणजे ? अरे ती गुप्त गोष्ट त्यांना काल सकाळीं वाटतं समजली. तेव्हांपासून ते संभाजी महाराजांच्या शोधांत आहेत. 'तो माझ्या समोर दिसतो केव्हां आणि त्याला दोन तडाके मी दाखवितों केव्हां,' असं त्यांना होऊन गेलं आहे. आमचे थोरले महाराज ह्मणजे केवळ सांबाचाच अवतार बरं पुन्हां धर्मराजाप्रमाणं क्षमाशील व दयावंत–असं आहे, तरी पण —खरा अपराधी–मग तो पोटचा गोळा कां असेना— त्याला साक्षात् काळासमान आहेत.

हिम्मती—अरे त्या सत्कुलोत्पन्न नरवराची गणना साधारण नृपांत होणं नाहीं.

साकी.

काय अहा तें भूपति-वैभव विमल कीर्ति या लोकीं ॥
सन्मार्गीतें सेवुनियां तो राज्य कसें हें हांकी ॥
नीति-स्थल पाहे ॥ त्यासम भूप कोण आहे ॥ धृ० ॥

बरं मित्रा संभाजी महाराजांनीं पकडून आणलेली ती तरुण स्त्री कोणाची कोण,. वगैरे वर्तमान तुला ठाऊक आहे काय ?

जोत्याजी—राजरहस्य तें. तें समजून घेऊन तुला व मला काय कर्तव्य आहे? आपलं काम आधीं आपण सुधरावं, हा उत्तम पक्ष.

हिम्मती—बरं मलाही आतां सरकारवाड्यांतच जायचं आहे, तिथं गेल्यावर थोडाबहुत तरी जास्त सुगावा लागेलच.

जोत्याजी—चल. तुझ्याबरोबर बोलत उभा राहिल्यानं मलाही पण बराच उशीर झाला. जाऊंदे आतां. (दोघे राम राम करून निघून जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—तुळशीचें घर.

(क्रोधावेशानें बेफाम झाली आहे अशी तुळशी येते.)

तुळशी—

पद—(रामकरीं जारि नृपपद गेलें.) या चालीवर.

सर्वांगाची होउनि लाही ॥ मी तर बनलें शुद्ध अशी ही ॥ उपायँही मज न सुचे कांहीं ॥ काय करूं आतां ॥ १ ॥ वाटत होतें कीं घोर वनीं ॥ गेला खातिल पशु त्या स्थानीं ॥ परि उलटी मत्प्रियपति-हानी ॥ काय

करूं आतां ॥ २ ॥ आस खरोखर ही मज भारी ॥ कोणि तरी त्या मारिल समरीं ॥ अरि जिंकुनि परि आला नगरीं ॥ काय करूं आतां ॥ ३ ॥

या शहरांतील लोक तरी किती अविचारी आहेत! आज तीन दिवस झाले, मेल्यांना जसा कांहीं ऊतच आला आहे! राजपुत्र विजयी होऊन सुखरूप परत आला, ह्मणून सर्व नगरांत गुढ्या, तोरणं उभारून त्याच्या पराक्रमाचे पवाडे गात रस्तोरस्तीं भटकत कींहो फिरत आहेत! पण त्या मूर्खांनां हें अजून कळत नाहीं, कीं अरे, तुमचे हे सुखसोहाळे, तुमचा हा आनंद कुठपर्यंत तो सांबाचा अवतार शिवाजी जिवंत आहे तोंपर्यंतच—तसंच, त्या सरदार लोकांना ह्मणावं—

पद—(उद्यां बघ जातें.) या चालीवर.

असूं द्या ध्यानीं ॥ मम स्पष्टचि कीं ही वाणी ॥ धृ० ॥ येतां राज्य तयाचे हातीं ॥ घालिल सर्वांमुखि तो माती॥ बसाल रडत कि मग दोहातीं ॥ साह्य न कोणी ॥ स्थिति होइल केविलवाणी ॥ १ ॥

खरोखर या प्रसंगीं जर का मला एखादा माझ्या शत्रूचं अनिष्ट चिंतणारा साथीदार अनुकूल झाला तर काय सांगूं! मी केलेली प्रतिज्ञा उघडपणें बोलायला

कुणाला देखील भिणार नाहीं. पण माझी सर्व काळजी त्या एक अंबाबाईला! (हात जोडून) जगदंबे आई कुळस्वामिणी!

श्लोक—(कामदावृत्त) चालीवर.

मारिले जयें मत्पिता, पती ॥
तद्वधास मी सिद्ध संप्रती ॥
साह्य कीं मला येथ जो करी ॥
धाड कुणि असा वीर सत्वरीं ॥ १ ॥

(विचार करून) पण व्यर्थ ही आशा! माझंच नशीब धड असल्यावर असं हें विपरीत कशाला घडून येतं!!

पद—(उभि जवळ खरी ती.) या चालीवर.

वेष्टिला असुनि त्या रानीं ॥ रिपु माझा हिंस्र पशूंनीं ॥
त्यांतुनही पार पडोनी ॥ सुखरुप कां येता सदनीं॥चाल॥
यश-लाभ तसा कां मिळता ॥ संगरिं जातां ॥ चाल ॥
असें ये ध्यानीं ॥ सुख, यश न नशीबीं दोनी ॥ १ ॥

(एसाजी येतो.)

एसाजी—असं कां बरं ह्मणतेस ताई? अग हें नशीब बोलून चालून पंगु आहे. त्याला प्रयत्नाचे पाय लाव त्याशिवाय तें चालूं लागणार कसं? सुख आणि यश हीं

तर त्याचा पाठलाग करीत आहेतच. तेव्हां आज नाहीं उद्यां, केव्हां तरी तसा सुदीन खास येणार. आणखी आपले अनिष्ट दिवस सरण्याचीं वेळही आतां अगदीं जवळ येऊन ठेपली आहे. मग तूं अशी व्यर्थ निराश कां होतेस?

तुळशी—(रागानें) समजलें. दम धरा—कांहीं दिवस जाऊं द्या, कीं बघा—तुमचाच शत्रु तुमच्या छातीवर बसून तुमचं काळीज काढून घेईल; तेव्हां मग तुह्मीं चांगले शुद्धीवर याल.

एसाजी—हं, असा उतावीळपणा करून मग कांहींच होणं नाहीं. तूं चांगली समंजस आहेस. विचार कर—

पद—(अर्जुन तर संन्यासी.) या चालीवर.

भग्न होइ का एक्या घायीं उपल भयंकर तो ॥
परि एखादी युक्ति योजितां कार्य-भाग होतो ॥ धृ० ॥
मत्त जहाला एकाएकीं हस्ति कसा वळतो ॥
परि एखादी युक्ति योजितां कार्य-भाग होतो ॥
अवचित तैसा शत्रु आपुल्या हातिं कसा येतो ॥
परि एखादी युक्ति योजितां कार्य-भाग होतो ॥

तुळशी—

(चाल-सुंदर.)

चाल ॥ तव युक्ति अशी कोणती सांग ती मला ॥

बघ शत्रु आपुला प्रबळ होत चालला ॥
नांदतो सुखानें उपायरे खुंटला ॥ चाल ॥
निशिदिनिं देहीं कोपाग्नीं या लाहि अती करितो ॥
केलि प्रतिज्ञा तुला तिचाहि विसरचि ना पडतो ॥ १ ॥

एसाजी—असं नव्हे ग ताई. तूं केलेल्या प्रतिज्ञेचा मला विसर कसा पडेल बरं? तूं आणि मी कांहीं निराळे का आहोंत? जो कोपाग्नि रात्रंदिवस तुझ्या शरीराचा दाह करतो आहे, तोच कोपानल या एसाजीच्या सर्वांगांत भडकल्यामुळें त्याला क्षणभर देखील चैन पडूं देत नाहीं. तुला जो रोग जडला आहे, त्याच चिंतारोगानं माझ्यावरही आपला पगडा पूर्णपणें बसावला आहे. मग गडे, असं कसं ह्मणतेस हें?

तुळशी—असंही नको ह्मणूं?

एसाजी—हें बघ ताई, या वेळीं मला एक चांगला उपाय सुचला आहे. तुला राग न येईल तर—

तुळशी—सांग.

एसाजी—(एकीकडे) आतां मनाचा धीरच केला पाहिजे. (उघड)

पद—(सुकुमार, असुनि तूं फार.) या चालीवर.

तुजवरी, आपुला अरी, करी अति प्रीति ॥ करी अति

प्रीति ॥ विषयांध बनुन गेला न अतां गुळिं भीति ॥ अ० ॥ तत्प्राण, खचित हे जाण, ठायिं तव पूर्ण गुंतले असति ॥ गुंतले असति ॥ वारुणी-पानिं तो धुंद सदा खल नृपाति ॥ सदा० ॥ हा नेम, तया निःसीम, लावबी प्रेम दाविं वरकांति ॥ दाविं वरकांति ॥ "हातमें पोथी बगलमें छुरी" या रीति ॥ छु० ॥

इतकं करूनही तशीच वेळ येऊन बेतली, तर 'वांकडं पाऊल कसं टाकूं, ' ही भीति तुला सोडली पाहिजे.

तुळशी—(संतापानें लाल होऊन त्याच्या आंगावर धांवून) आग लागोरे मेल्या असे शब्द उच्चारणाऱ्या तुझ्या त्या वाणीला! चांडाळा,

पद—(नाहीं कोणीही हुंगीलें.) या चालीवर.

प्यावें अधरामृत तें ज्यांनीं ॥ अति उल्हासें अनुदीनीं ॥ ऐसा अधर हा शील त्यजूनी ॥ शत्रु मुखिं त्या काय मी ठेवूं ॥ १ ॥ तोष ज्यां चुंबन-रस-पानीं ॥ कर कंठीं मम ठेवोनीं ॥ गाल ऐसा कर हे दोनी ॥ शत्रुपुढतीं काय मी नेऊं ॥ २ ॥ आलिंगावी काया ज्यांनीं ॥ बहु प्रेमें ही अनुदीनीं ॥ तिजला कीं शील त्यजूनी ॥ शत्रुस्वाधीन काय मी देऊं ॥ ३ ॥

अरे मूर्खा तुला हें कसं कळत नाहीं ?

पद—(काय मला भूल) या चालीवर.

मजसम ज्या असति युवति संप्रति क्षितीं ॥
दुरितभीरु असुनि पहा निग्रही अती ॥
सत्य जाण गेले जरि पंचप्राण ते ॥
अन्य पुरुषिं प्रीति तरी कधिं न ठेविती ॥ १ ॥

(रागानें फणफणत दूर जाऊन उभी राहते.)

एसाजी—(एकीकडे) अलीकडे आमच्या ताईचा स्वभाव कांहीं चमत्कारिक बनून राहिला ! तिनं केलेल्या त्या दुर्धर प्रतिज्ञेशिवाय तिच्या तोंडून अन्य शब्दच ऐकूं येत नाहींत. बरं मोठ्या प्रेमानं आपण एखादी गोष्ट तिला सांगायला जावं, आणि तिला ती नापसंत झाली पाहिजे मात्र, कीं बेधडक एखाद्या वेडावलेल्या मनुष्या-प्रमाणं आंगावर धांवून येते. असा हा प्रकार दररदिवस चालला आहे. तेव्हां आतां करावं कसं ? (विचार करून) नाहीं, पण एकपक्षीं तिचं हें करणं अगदीं योग्य आहे, असंच कबूल करणं भाग पडतं. कारण,

साकी. मोठी

प्रियतातें, कीं तदीय नाथें दिधलें तिज सोडोनी ॥
व्रीद राखि जें तयावरीही सोडावें कां पाणी ॥
कैशी सहन करिल ती सुमंती॥माझ्या निंद्य अशी उक्ति ॥
रागहि चिरसीं ॥ यावा कां न अती ॥ ध्रु० ॥

आणि. त्यांत दौलतराव शिरक्यांचा घात झाल्या दिवसापासून तर तिची तब्यत फारच कडक झाली . आहे. तिचा तो चमत्कारिक वर्तनक्रम पाहून, मला वाटतं, तिच्या बुद्धीला खचीत भ्रम झाला असावा. त्यामुळं तिच्या समोर जायलाही मला आतां भय वाटूं लागलं आहे. तेव्हां आतां कोणता उपाय योजावा ? (विचार करतो.) छे, आतां असंच केलं पाहिजे. आणखी थोडावेळ हिची समजूत करून पहावी, वळली तर ठीकच झालं; नाहींपेक्षां काल ठरलेल्या संकेताप्रमाणं तकरीबखानाला निरोप पाठवून तिची व त्याची यावेळीं ओळख पटवून द्यावी, म्हणजे त्याच्या दोन गोष्टींनीं ती आपोआप ताळ्यावर येईल. हो, असंच. असं केल्याशिवाय आपली कार्यसिद्धि होणं नाहीं. (उघड) ताई, असं पहा,

पद—(जो जो, जो जो रे.) या चालीवर.

निष्कारण कपटें ॥ मारियला ॥ तात जयानें अपुला ॥ध्रु०॥
गांठुनि एकांतीं ॥ तव पतिला ॥ घोर काननीं वधिला ॥
त्या शत्रूचा या ॥ समयाला ॥ नाश पाहिजे झाला ॥
त्याविषयीं न गुळीं ॥ दुःख तुला ॥ नवल वाटतें मजला ॥ १ ॥

तुळशी—आणि माझ्या अब्रूची नासाडी होऊन चार लोकांत माझ्या नांवालौकिकाचा डंका वाजावा नि माझी

छी, थु व्हावी, ही गोष्ट मात्र तुला मान्य आहे, नव्हे की ? (जरा शांत होऊन) दादा, तूंच पहा,

पद—(धेनुमुखीं हा व्याघ्र) या चालीवर.

कंठदेशिं मिठि घालिल स्वकरीं अरि तो चुंबन घ्याया ॥
होउनि केवळ कामांधचि ही आलिंगिल मम काया ॥
ऐशी दुष्कृति ही तुळशी ॥ सांगे सहन करील कशी ॥ धृ०

एसाजी—सहन न करून चालतं कसं ? आपली प्रतिज्ञा शेवटास गेली पाहिजे ना ?

तुळशी—तर मग तुझं काय ह्मणणं आहे.

एसाजी—एकवार बोलून चुकली आहेस. आतां केलेल्या प्रतिज्ञेचा भंग करून अधःपाताची इच्छा मात्र धरूं नकोस.

तुळशी—आणि प्राणनाथांना दिलेल्या वचनाचा भंग करून आपल्या पूर्वजांना नरकाची वाट दाखविण्यास मी बेधडक तयार होऊं, असंच ना ?

एसाजी—पण ताई, वचन आणि प्रतिज्ञा यांत महदंतर आहे—

तुळशी—(मध्येंच) नको, नको—तुझ्या मुखांतून आतां एक अक्षरही ऐकायला नको—

पद—(सफलेच्छा ती करिन) या चालीवर.

करिशिल तूं नच साह्य मला कीं ॥ पर्वा नाहीं त्यांची इतुकी ॥ निंदितील अति मजला लोकीं ॥ तरि मम हा-

तोनी ॥ न घडे ॥ दुष्कर्मचिं हें जरि झाली या प्राणाची हानी ॥ न घडे ॥ १ ॥ योजुनि अन्या युक्ती कांहीं ॥ घात रिपूचा करिनच पाहीं ॥ दुर्दैवें नच घडलें हेंही ॥ तरि मम हातोनी ॥ न घडे ॥ २ ॥

(पडद्यांत 'आलख आलख' असा शब्द ऐकूं येतो.)

एसाजी—(ऐकून व पाहून आपल्याशीं) व: ! अशा ऐन प्रसंगीं वेषांतर करून खानांची स्वारी येऊन थडकली, हें फार चांगलं झालं. (उघड) बरं तर ताई, तसंच कांहीं तरी करूं. जातों मी. (जातो.)

तुळशी—(बसून दु:खानें श्वास टाकून) अहाहा ! त्या परमेश्वरानं काय हें बंधुरत्न मला दिलं आहे पण ! ज्याच्याकडून मला चांगलं शिक्षण मिळायचं, तोच पापाचरण करण्याविषयीं मला उपदेश करीत आहे ! दुर्दैव माझं ! ! मला आशा ह्मणून आतां कुणाचीच राहिली नाहीं !

पद—(दु:खित तरुवर झाले.) या चालीवर.

आश्रयहीन मि पाहीं ॥ मज साह्य कुणीही नाहीं ॥ धृ० ॥
आप्त बांधव ते या परिचे ॥ अनुकूल न दैवहि साचें ॥
प्रतिकूल न कुणि साह्या येवो ॥ आतां तो मज दर्शन देवो ॥

(पडद्यांत)

दोहरा.

"दिल् किसीकू देना नहीं । दिल्से देना दिल् ॥
नही मिला तो नही मिला । कम् दिल्से मत् मिल् ॥१॥"

तुळशा—(ऐकून चोहोंकडे पाहून) मलाच उद्देशून हें कुणी बोलत आहे का ? (तकरीबखानास येतांना पाहून) अथवा, संशय कशाला !

पद—(दिल् चमनूमें बीचू) या चालीवर.

सर्वांगिं आपुल्या भस्म पहा लावोनी ॥
रुद्राक्ष टाकिले कंठिं, करीं बांधोनी ॥
मस्तकीं दीधला जटाभार ठेवोनी ॥
त्या खालिं लाविला तिलक भाळिं रेखोनी॥चाल॥
किति भव्य मूर्ति ही दिसते ॥ मंजप्रती ॥
अति गुंग पाहुनी यातें ॥ मन्मती ॥
बहु तरंग हृदयांतरिं ते ॥ ऊठती ॥ चाल ॥
हा देवदूत कीं कींव माझि जाणोनी ॥
मज साह्य कराया येत असे या स्थानीं ॥ १ ॥

(तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें पेहराव केला आहे असा तकरीबखान मागील दोहरा ह्मणत येतो.)

तकरींबखान—(आपल्याशीं) अहाहा ! देहलीको हमूने इस् इरादेपर छोडाथा; के हमारा सख्त् दुश्मन् सेवाजीकेही दुसरे दुष्मिनोको सांथ मिलाकर किसीना-

किसी तर्‍हेसें उस्के खानदानको तबा करके उस् दख्खनके शेरको उस्के बेटे संभाजीके समेत अपने बादशाहा अवरंगजेबके पास खडा करूंगा; और जो के बन् नही पडताथा, लेकिन् उसीकी बादशहातमें हम् आन पहूंचे ! (तुळशीच्या घरापाशीं जाऊन ' आलख् ' ह्मणून ओरडतो.)

तुळशी—(त्यास पाहून आनंदानें टाळी वाजवून) हा आला वाटतं मला संकटांतून मुक्त करणारा माझ्या शत्रूचा काळ ! !

तकरीब—(आपल्याशीं) क्या ! तकलीफसे छुडानेवाला ! और दुष्मनका दुष्मन् ? ठीक बोली !

तुळशी—(त्याच्या जवळ जाऊन नम्रतेनें) दयानिधे !

साकी.

ब्रह्मा, विष्णू, महेश तीन्हीं रूपें एकवटोनी ॥
अवतरलां कीं आपण माझी ऐकुनि दीना वाणी ॥
काय असे न कळे ॥ माझें मन शांकित झालें ॥ धृ० ॥

तकरीब०—माई, ऐसे शकमें क्युं हो ? मुझकुं नही पछाना ? जिस् खुदानें कुल् खल्कतको पैदा किया, जिस्नें तमाम कुदरत् बनाई, और जो सबकुं परवरीष करता है, उस् हाजर नाजरकी मेहरबानीसें हम्

जो कुच् चाहें कर सकते. माई, अब् ये समुजो, के तुमारी सब् तकूलीफ दूर हो गई. मुजे तकूलीफका सबब बताव ?

तुळशी—ऐकावं भगवन्.

पद—(व्यर्थ मी जन्मलें.) या चालीवर.

राज्य करि येथ शिवाजीराज ॥ पुत्र तयाचा रिपु मज असज ॥ धृ० ॥

तकरीब०—(आश्चर्यानें) क्या ? संभाजी तुह्मारा दुष्मन् ? कैसे ?

तुळशी—(डोळ्यांस पदर लावून)

(चाल सदर.)

वधिला त्यानें तात, पती मम ॥ ऐका सदय ऋषिराज़ ॥ १ ॥

तकरीब०—(क्रोधावेशामुळें आपल्या वेषांतराचें भान न राहून) कैसा खराब बादशाहा है ! अज्-तकूफरलः ! !

तुळशी—(दचकून) अगबाई ! घात ! घात ! ! हा गोसावी नसून कुणी तरी मुसलमान हेर आहे ! धांवा हो धांवा—कुणी तरी धरा याला—

तकरीब०—(घाबरून परंतु धीरानें) माई, सबूर, सबूर. हम् तुमारे राजाके दुष्मनोंका जासूद नही. मुजको

एक तुम्को पेगॉम देना हैं. इसीवास्ते मैं यहां आया. हम् फकीरोंके वास्ते राम और रहीम एकसान है. पेगीम जो हम्ने तुम्को देना है, तुमारे फायदेका है. सुनना है तो सुनो, नही तो हम् जाता है.

तुळशी—(रागानें) तुझ्या पासून कसलारे मला निरोप ऐकायचा आहे ?

तकरीब०—तेरी मर्जीका.

तुळशी—नको, नको—माझं हित आतां एकाच गोष्टींत उरलं आहे—

तकरीब०—वो मनषा क्या है ? बोलो.

तुळशी—ही माझी प्रतिज्ञा—

कंठ चरचर चिरुनि मारिन शिव-सुता त्या निश्चयें ॥
कीं वधावी खाटिकें जशि सौरभेयी निर्दयें ॥
येसुबाई धायिधायी त्यांचि रडविन अंगना ॥
सत्य हें नच होय तर मम पितर भोगुत यातना ॥ १ ॥

(इतक्यांत एसाजी येऊन त्याच्या सांकेतिक खुणेवरून तकरीबखान जातो व तोही जातो. मागून तुळशी निघून जाते.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—एक रस्ता.

(तुळशीविषयीं चिंतन करीत असलेला संभाजी तिच्या महालाकडे जात आहे.)

संभाजी—

पद—(आम्ही काशीचे ब्राह्मण) या चालीवर.

मनिं भरलि तुळशि सुंदरा ॥ सुचेना जरा ॥ प्रीति मजवरी ॥ किति करी मदनमंजरी ॥ धृ० ॥ तन्नयनबाण मज भान ॥ देहिं या त्राण ॥ तेविं नुरवीती ॥ व्याकूल प्राण हे करिती ॥ १ ॥ अति शक्ति असुनिया देहिं ॥ निर्बलचि पाहिं ॥ बनुन हा जाई ॥ मुळिं सौख्य कसें तें नाहीं ॥२॥

पद—राग-कानडा. ताल-त्रिवट.

शैवलविरहित पुष्कर जैसें ॥ दृष्टिस गमतें नच सुंदरसें ॥ धृ० ॥ जलावांचुनी सुंदर वापी ॥ असतीं त्या बहु त्याज्य तथापि ॥ सखिच्या गाढालिंगनरूपीं ॥ वल्लिविण वपु-तरु हा भासे ॥ १ ॥

पद—(झाली ज्याची.) या चालीवर.

द्विजराजमुखी पंकजनयना ॥ सुकोमलांगी, वामलोचना ॥ ॥ धृ० ॥ ती कुलयुवती दिसल्यावांचुनि ॥ नाहिं कधींही शांति या मना ॥ १ ॥ तळमळ सारी या मम शरिरीं ॥ सत्वरिं भेटो मज या दीना ॥ २ ॥

अथवा; अशा या आतुर झालेल्या मनाला शांति देण्याकरतां आपणच तिच्या मंदिरांत जावं. (जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ—तुळशीचें घर.

तुळशी—(आनंदित मुद्रेनें.)

पद—(व्यर्थ अह्मी अबला.) या चालीवर.

भय नाहीं उरलें ॥ खचित आतां ॥ धृ० ॥
दैव मला तें अनुकुल होतां ॥ सर्व कसें जुळलें ॥ १ ॥
मद्रिपु-अरि तो वश मज झाला ॥ धैर्य मला चढलें ॥२॥
करपंजरिं नृप, तदानुयायी ॥ समजा सांपडले ॥ ३ ॥

माझी प्रतिज्ञा सिद्धीस जायाचा योग तरी पहा कसा नामी जुळून आला !

पद—(असतें तें जरि अन्य रत्न.) या चालीवर.

शिवछत्रपती भूपतिवरती त्या दिल्लिपतीनें ॥
धाडावा तकरीबखान तो भलत्या वेषानें ॥ धृ० ॥
कांहिं दिवस तोंवरी करावा वास इथें त्यानें ॥
ऐन प्रसंगीं साह्य मला बहु व्हावें प्रेमानें ॥ १ ॥

त्या मुसलमानाच्या सहवासानं मी आपल्या स्त्रीधर्माला बाजूस झुगारून सांप्रत राक्षसरूप धारण केलं आहे, तेव्हां

आतां कपटानेंच माझ्या शत्रूचा मी नाश करीन. माझ्या आंगांत अशा प्रकारचं अवसान आल्यानं मी केलेल्या प्रतिज्ञेचं पारायणच करावं, असं मला वाटतं!

कंठ चरचर चिरुनि मारिन शिव-सुता त्या निश्चयें ।।
कीं वधाची खाटिकें जाशि सौरभेयी निर्दयें ॥
येसुबाई धायिधायी त्याचि रडविन अंगना ॥
सत्य हें नच होय तर मम पितर भोगुत यातना ॥ १ ॥

(इतक्यांत संभाजी येतो. तुळशी दचकून दूर उभी राहते.)

संभाजी—

पद—(साध्य नसे मुनिकन्या.) या चालीवर.

राग कुणावर करिशी ॥ सखये जणुं क्रोधाची मूर्तिच दिसशी ॥ धृ० ॥ क्रोधावेशें नयन तुझे हे ॥ रक्तासम तनु कांपत आहे ॥ भोगविण्या बहु दुःखा ॥ पितर कुणाचे नरकीं धाडिशि ॥ १ ॥

तुळशी—(आपल्याशीं) या मेल्यानं माझी प्रतिज्ञा ऐकली कीं काय?

संभाजी—

(चाल-सदर.)

विसरुनि अथवा, तव सेवेला ॥ सांग सखे का जन हा मुकला ॥ किंवा, दासिजनांनीं अपमानीलें तुजला तुळशी ॥ २ ॥

(तिच्याकडे पाहून हंसून) स्त्रियांच्या खऱ्या प्रेमाचं लक्षणच राग. तो जितका जितका अधिक, तितकं तितकं प्रेम अधिक ! हेंच पहा या प्रेमाचं तेज कसं चोहोंकडे पसरूं लागलं आहे ! ! सखे,

पद—(नच सुंदरि करूं) या चालीवर.

विधु येतां उदया तो॥ तम विलयातें नेतो ॥
तारागण निस्तेज किं तेजोमय करितो ॥ धृ० ॥
पाडुनि भूवरि दीप्ति ॥ सकलां दे सुख शांती ॥
आणितसे नव युवती— ॥ मानसिं बहुत स्फूर्ति ॥
उत्सुक करि पुरुषा अति ॥ रमवाया लीलावति ॥
तैशि स्थिति तव मुखेंदु झालि पहातां तों ॥ १ ॥

(तिच्याजवळ जातो.)

तुळशी—(आपल्याशीं) मला जी शंका आली होती ती व्यर्थ एकूण ! याच्या या वर्तनावरून हा माझ्या प्रेमपाशांत अधिकच सांपडत चालला आहे !

संभाजी—एवढावेळ आह्मीं जें आपलं वर्णन केलं, तो अपराध आहे अशी आपली समजूत असेल, आणि—

साकी

योग्य तुला जरि वाटे मजला शिक्षा करिं या समयीं ॥
ठेवीतों बघ उत्तमांग हें सुंदरि मी तव पायीं— ॥

(तिच्या पायां पडावयास जातो.)

तुळशी—(दूर सरून वरील साकी पुरी करते.)

पुरे पुरे आतां ॥ दिसली आज खरी ममता ॥ धृ० ॥

संभाजी—(आश्चर्यानें) वा: ! दैव आमचं ह्मणायचं! कारण,

पद—(नोहे नारी ही.) या चालीवर.

निष्कपटाचें मम वर्तन तुजशीं ॥ असतां कीं वदसी ॥ “आज नृपाला प्रीति खरी तव पूर्णपणें ती कळली मजशीं ॥ धृ० ॥ आजवरीचा तो प्रेमा अपुला ॥ निष्फल का झाला ॥ जन हा ओळखण्या तव प्रेमाला ॥ मूढचि का बनला ॥ कपटाचरणाचा मंत्रचि तुजला ॥ सांग कुणीं कथिला ॥ कुतर्क मानसिं आणुनि मजते व्यर्थ मला कां दूषिसि तुळशी ॥ १ ॥

तुळशी—(संतापानें लाल होऊन).

पद—(लग्नाला जातों मी.) या चालीवर.

हेंच असें मजवरिचें प्रेम काय तें ॥
लटकें वच कां वदसी सर्व जाणतें ॥ धृ० ॥
तव सेवकजनप्रभृति ॥ मानिति जिस नीच अती ॥
मजला अवमानीती ॥ तरिही तव धुंद मति ॥
हें पाहुनि केविं तुला स्वस्थ बसवतें ॥ १ ॥

संभाजी—काय ही वेडी समजूत ! !

पद—(श्रीहरिच्या वेणुनादें.) या चालीवर.

भलभलत्या कल्पना कां व्यर्थ मनीं अनिशी ॥
मम अवमानील कैसा परिजन तो तूजशीं ॥
खद्योत-प्रभा भानु-द्युतिपुढतीं किति तरी ॥
ऐकुनियां नवल वाटे वच तुझें सुंदरि ॥ १ ॥

तुळशी—बरोबरच आहे ! नवल न वाटावं तर काय! (डोळ्यांत आंसवें आणून) देवा ! व्यर्थरे व्यर्थ आमचा हा स्त्रीजन्म ! !

पद—(मज बहुतचि ही) या चालीवर.

हा जन्म नको नको स्त्रियांचा देवा ॥
ज्याचि न या पुरुषां परवा ॥ ध्रु० ॥
हे करिति अती सतत आम्हुचा हेवा ॥
मुळिं आम्हां मान न ठावा ॥ चाल ॥
अति नीच मानिती आम्हांतें ॥
कर जोडुनि तुज मी प्रार्थीतें ॥ चाल ॥
नच वाटतसे जन्म खरोखर बरवा ॥
त्वां जन हा पदरीं घ्यावा ॥ १ ॥

संभाजी—छे, भलतंच नाहीं तर ! तुम्हां अबलांना पदरीं घ्यायला आम्हांसारखे सबल पुरुष तयार असतां त्या परमेश्वरावर उगाच संकट कां ? आपणच दूरवर विचार करून पहा; कीं—

पद—(निजमख रक्षाया.) या चालीवर.

सोडुनियां आशां ॥ आवडते ते ॥ त्यागुनि माता, पिता॥ रक्षणिं तुमच्या दक्ष किती तरि असतों आह्मि कठीण समय येतां ॥ ध्रु० ॥ इच्छित तुमचें तरी ॥ पूर्ण कराया॥ झटतों कवणपरीं ॥ कष्टवुनी वपु आनंदानें काळ कंठुनी निर्धनहीं होतां ॥ १ ॥ बनता स्वामीणी ॥ नरदेहाच्या ॥ मग सत्ताव्यसनीं ॥ होवोनी अति धुंद तयातें वाटेल तसें कीं वळवीता ॥ २ ॥

तुळशी—(डोळ्यांस पदर लावून) तर अती नीच अशा आपल्या सेवकजनांकडून झालेला अपमान मुकाट्यानं सहन करावा, झालं ! !

संभाजी—(तिच्या खांद्यावर हात ठेवून) लाडके, मला सांग बरं, कुणीं तुझा असा अपमान केला ?

तुळशी—आपल्याच प्रीतींतले बरं, आपले ते अती विश्वासु नोकर—

संभाजी—(आश्चर्यानें) कोण ? माझा जोत्याजी ? काय जोत्याजी ? (विचार करतो व आपल्याशीं) अथवा ही ह्मणते असं झालंही असेल कदाचित् ! कारण,

पद—(कंथबिन रही अकेलि.) या चालीवर.

करीं मी प्रीति तुळशिवर फार॥ प्रेमं तिचें अनिवार॥ध्रु०॥
सहनं न हें त्या होत मुळीं ह्मणुनि मदीय सखीस ॥
निंदुनि, व्यर्थचि तो मजला त्रासवि वारंवार ॥ १ ॥

(तिच्यां हनुवंटीस हात लावून उघड) लाडके, अग त्या मूढ सेवकजनांचं ज्ञान तें किती ? आणि त्यांच्याकडून चुकून गेलेल्या एखाद्या शब्दाची आठवण धरून त्यांच्यावर असा हा कोप करणं, ह्मणजे आपल्या धनीपणाची व शहाणपणाची तारीफ ती काय मग ? (इतक्यांत मंगलवाद्यांचा कडकडाट ऐकूं येतो.) अँ ! अशावेळीं हा मंगलवाद्यांचा कडकडाट कां बरं ? (विचार करून) हं समजलों. तुळशी, तुझ्याइथून निरुपायामुळं आज मला लवकर गेलं पाहिजे. कारण तुला ठाऊक आहे, कीं जंजिऱ्याच्या शिद्दीवर केलेल्या स्वारींत ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून आपलं शौर्य गाजवून तरवारा मारल्या, त्या सरदार लोकांना मोठ्या समारंभानें आणून त्यांस योग्य बक्षिसं द्यायचीं, ह्मणून आज जंगी दरबार भरणार आहे. तर निदान त्यावेळीं तरी मला तिथं असलंच पाहिजे. (हें ऐकतांच तुळशी बळंच दुःखाचा सुस्कारा टाकून सचिंत उभी राहते, तिच्या खांद्यावर हात ठेवून) सखे मी गेल्यावर मात्र तूं अशी सचिंत उभी न राहतां—

पद—मालकंस–त्रिवट.

पाहिं पाहिं या मार्गीं ॥ पुरजन–दाटी ही दोंभागीं ॥ धृ०॥
अति उल्हासें मिरवित जाती ॥ बघुनि गवाक्षीं युवति

पहाती ॥ तूंहि शीघ्र जा सौधावरती ॥ कांग अशी खंती॥

(तिच्याकडे पहात पहात निघून जातो.)

तुळशी—(तो गेला किंवा नाहीं हें पाहून येऊन हंसून) या स्वारीचं पाणी जिंकलं मीं! हा पुरुष रणामध्यें शूर खरा, परंतु माझ्या कपटी प्रेमानं विषयांध होऊन हा आतां शुद्ध वेडा बनून राहिला आहे. याच्या खऱ्या प्रीतीला आणि स्वरूपाला भुलून माझं प्रेम याच्या प्रीतिपाशांत न गुंतो ह्मणजे झालं—प्रेमा, गुंतशील कारे?

(पडद्यांत शब्द होतो.)

"हा दुष्टे, कसले हे प्रेमाचे विचार करीत बसली आहेस?" (तुळशी हें ऐकून दचकते.) अगबाई! आमच्या दादाचा हा शब्द वाटतं? (विचार करून) अथवा, कुणाचाही असो. यानं मला शुद्धीवर आणलं? माझ्या या प्रतिज्ञेचा मला यावेळीं विसर कसा पडत होता?

कंठ चरचर चिरुनि मारिन शिव-सुता त्या निश्चयें ॥
कीं वधावी खाटिकें जशि सौरभेयी निर्दयें ॥
प्रेमुबाई धायिधायी त्याचि रडविन अंगना ॥
सत्य हें नचं होय तर मम पितर भोगुत यातना ॥ १ ॥

(निघून जाते.)

दुसरा अंक समाप्त.

अंक ३ रा.

स्थळ—एक रस्ता.

(तुळशीच्या स्थितीविषयीं विचार करीत असलेला संभाजी येतो.)

संभाजी—(हळू हळू चालत) —

पद—(ठाऊक मजला असे.) या चालीवर.

तुळशि सती सुंदरी विपत्तीं कैशी सांपडली ॥
दुर्दैवाची तिजवरती ही कीं पाळी आली ॥ धृ० ॥
कोणालाही उभे करीना ती आपुल्याजवळीं ॥
बावरल्यासम वृत्ती न कळे तैशी कां झाली ॥
न सुचे कांहीं, पसार्जीनें मज सांगितलेली ॥
गोष्ट तिज्वा तरि प्रत्यय घ्यावा जाउनि येवेळीं ॥ १ ॥

(कांहीं चालून) हेंच तें त्या कलुशाकबजी साधुपुरुषाचं घर. आतां आंत प्रवेश करावा. (जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—कलुशाकबजी नामें कनोजा ब्राह्मणाचें घर.

(होमहवनादि क्रिया आटपून देवीउपासक बनलेला कलुशा ध्यानस्थ बसला आहे; आजूबाजूस मद्यानें भरलेले

कलश ठेवलेले आहेत, एसाजी फर्जंद जवळ हांत जोडून उभा आहे ; असे दिसतात.)

एसाजी—(हंसून) कबजी साहेब, आपण सोंग तर खुप थाटाचं सजीवलं आहे; पण बतावणी आतां त्याच मासल्याची व्हायला पाहिजे. नाहीं तर—

कलुशा—(डोळे उघडून) अँ! त्याजबद्दल तुह्मी अगदीं बेफिकीर असा. अहो, असलीं हीं कामं ह्मणजे आमच्या अगदीं आंगवळणांतलीं! या कलुशानं आजपर्यंत कित्येक सावकारपुत्रांना नादीं लावून पार देशोधडीस मिळवून टाकलेले, तो का या संभाजीला दाद देणार आहे!

एसाजी—पण आपण ह्मणतां त्या सावकारपुत्रांपैकीं हा नव्हे. हा राजपुत्र आहे—

कलुशा—असेना का! पुढं येऊं द्या, कीं मग पहा आमची मात्रा कशी लागू पडते ती!

एसाजी—(संभाजीस दुरून येतांना पाहून) हॅं, आली आपली शिकार—नीट खबरदारीनं बसा आतां. (कलुशा ध्यानस्थ बसतो.) अहाहा!

पद—(अष्टमूर्ति परमेश.) या चालीवर.

भव्य आणि किति शांत दिसे मज स्वामींची मूर्ति ॥
विलोकितां ती नेत्र दिपोनी हे माझे जाती ॥ धृ० ॥
थाटमाट किति करुनी बसले असती झोंकानें ॥
सभोंवती ते कलश ठेविले भरुनी मद्यानें ॥
तोषविण्या जगदंबा असती चाललींच हवनें ॥
वर्णाया महिमा गुरुजींचा न चले माझि माति ॥ १ ॥

कलुशा—हें लटकं वर्णन आतां पुरे. आपली शिकार—शिकार कुठं आहे तें सांगा आधीं.

एसाजी—ही आली—(हात जोडून उभा राहतो; संभाजी येतो; एसाजी त्यास मुजरा करून) महाराजांचा विजय.असो. सरकार, मी सांगितलेलं ध्यान तें हेंच बरं. सोनं पारखून घ्यायची ही वेळ आहे, पाहिजेल तर कसोटीला लावून पहावं आतां.

संभाजी—(हंसून) व: ! एसाजीराव, आपण मवांशी तर ब्रह्मानंदांत तल्लीन होऊन राहिलेल्या एखाद्या महंताप्रमाणं आत्मस्वरूपीं अगदीं गुंग होऊन गेलां होतां !

एसाजी—महाराज, या मूर्तीचं तेजच तसं कांहीं विलक्षण आहे ! फार काय, पण इच्यापुढं उभं राहण्याचंही धाडस कुणाच्यानं होत नाहीं. मात्र एक खरा भाव

असला पाहिजे; तरच स्वामींची पूर्ण कृपा होते: नाहींपेक्षां, कुत्सितभाव धरून गेलेल्या मनुष्याला अंतरज्ञानानं ओळखून ते तेव्हांच ' इथून चालता हो ' ह्मणून निक्षून सांगतात !

संभाजी—खरोखर तूं ह्मणतोस तशा प्रकारचंच या साधुपुरुषाचं तेज प्रज्वलित दिसतं ! गड्या,

पद—(वसंती बघुनि मेनकेला.) या चालीवर.

यतीची मूर्ति पाहुनीयां ॥ मन दुःखी परि पूर्ण प्रमोदें गेलें भरुनीयां ॥ धृ० ॥ मनांतिल दुष्ट हेतु विलया ॥ गेले जैसें तम तें जातें रवि येतां उदया ॥ १ ॥ तुला मी काय सांगुं सखया ॥ दवडुं नये बघतां मुनिकाया एक पळहि वायां ॥ २ ॥

(कलुशा ध्यान विसर्जन करतो.)

एसाजी—हँ, महाराज, स्वामींनीं डोळे उघडले वाटतं. आतां काय मागायचं असेल तें घ्या मागून. असे पुढं व्हा.

संभाजी—(पुढें होऊन) साधुमहाराज, हा संभाजी आपणांस प्रणिपात करतो. (त्याच्या पायांवर पडतो.)

कलुशा—(त्यास लोटून रागानें चरफडून हातांतील माळ आपटून मोठ्यानें)

श्लोक. (स्रग्धरा).

नाहीं मी साधु तो जो रिपुवर स्वबळें जिंकितो ते स-हाही ॥ रुद्राक्षा बांधि कंठीं, करिं, शिरिं, कटिं तो जाण संन्यासि नाहीं ॥ लावोनी भस्म आंगा भटकत फिरतो तोहि मी नाहिं भोंदू ॥ मी आहें कोण मूर्खा न्रमज्ञुनि मजला बोलसी काय साधू ॥ १ ॥

संभाजी—(हात जोडून) स्वामीराज, मी अज्ञानी आहें. बोलण्यांत एखादा प्रमाद घडला असल्यास दासाला क्षमा असावी. महाराज क्षमासिंधु आहेत !

एसाजी—(हळूच) सरकार, यावेळीं जाऊन स्वामींचे पाय घट्ट धरा. कारण, 'साधु' असं ह्मटल्यामुळं त्यांचा आपणांवर फारच कोप झाला आहेसं दिसतं. उगाच कुणीं केलेली स्तुति स्वामींना मुळींच सहन होत नाहीं. काल माझ्यावरही असाच कोप झाला होता, पण कांहीं सुदैवानंच ह्मणा—पूर्ण अनुग्रह होऊन त्यांनीं मला आपलंसं ह्मटलं !

संभाजी—(कलुशास साष्टांग नमस्कार घालून) महाराज—स्वामीराज —आपण दयावंत —क्षमासागर —मी महदपराधी —आपल्या चरणीं लीन—

कलुशा—(त्यास उठवून) राजा, अरे मला तूं

ओळखलं नाहींस! घोर जंगलांत वास करणारा मी साधु नव्हे, तर ब्रह्मदेवानं उत्पन्न केलेला—त्या शृंगारादि नवरसांचा पूर्ण उपभोक्ता—मी एक शौकी मानव प्राणी आहें. या होमहवनादि क्रिया करून त्या जगदंबेला वश करून घेतल्यामुळं सांप्रत माझ्या आंगीं इतकं सामर्थ्य आहे कीं नुसत्या मंत्रोच्चारानं मी आज पाहिजे तें वश करूं शकतों. याचा अनुभव तुला घ्यायचा असेल तर—(संभाजीकडे डोळे वटारून पाहतो.)

एसाजी—(संभाजीस डोळ्यानें खुणावतो.)

संभाजी—(नम्रतेनें) स्वामींच्या हातून होणार नाहीं अशी कोणती गोष्ट आहे! तथापि, माझी प्रार्थना ह्मणून इतकीच, कीं मी जो हेतु मनांत धरून या चरणांपाशीं आलों आहें, त्याबद्दल स्वामींचा मजवर अनुग्रह व्हावा.

कलुशा—काय तुझं ह्मणणं आहे, बोल.

संभाजी—ऐकावं स्वामिराज—

दिंडी.

जात कोमेजुनि रसभरीत ताजें ॥
कुसुम तुळशी हें दुःखवन्हितेजें ॥
सौख्य व्हावें तत्क्लेश लोपुनीयां ॥
करा मजवर ही दया स्वामिराया ॥ १ ॥

कलुशा--(कांहींवेळ विचार करून) राजा, तुझ्या हातून आजपर्यंत अशीं कांहीं अनन्वित कृत्यं घडलीं आहेत, कीं या ठिकाणीं तुला उभं करण्याची सुद्धां योग्यता तुझ्या आंगीं नाहीं; परंतु फक्त या एसाजीच्या विनंतीवरून तुला या ठिकाणीं मीं येऊं दिलं. नाहींपेक्षां, तुझ्यासारखीं दुष्ट व कृतघ्न मनुष्यं आमच्या इथं मुळींच खपत नाहींत (कांहीं थांबून) बरं असो हा घे प्रसाद..(सद्यानें भरून एक पेला देतो, तो संभाजी घेतो.) जा—जगदंबेच्या कृपेनं तुझे इच्छित हेतु पूर्ण होतील. हँ, आतां या ठिकाणीं पळभरही थांबूं नकोस. (एसाजी कलुशास खूण करून संभाजीस घेऊन जातो.) या एसाजीनं माझं बहुतेक काम तर निर्विघ्नपणें तडीस नेलं, आणि हा राजपुत्रही माझ्या बराच आटोक्यांत आला! आतां संधी साधून त्याच्या राजलक्ष्मीचा फन्ना उडवून टाकायचा; कीं आटपलं आपलं काम! त्या प्रसंगीं तो दीनदयाळू परमेश्वर मला सांह्य करो ह्मणजे झालं (पडदा पडतो.)

(जोत्याजी येतो.)

जोत्याजी—इथं आसपास कसला हा वास सुटला आहे? अरेरेरे यानं आपलं तर बुवा डोकं अगदीं फिरून गेल्यासारखं झालं! कोण दुर्गंधी ही! छे, छे, आपल्या-

च्यानं नाहीं उभं राहवत इथं. घटकाभरानं ओकण्याचा देखील प्रसंग यायचा. त्या सांबांच्या राज्यांत दुराचरण असं आजच माझ्या पाहण्यांत आलं ! नको, नको—या ठिकाणीं क्षणभरही थांबणं नको. तर चला असे आतां इथून. (कांहीं चालून एकसारखें पाहिल्या-सारखें करून) कोण बरं ते दोघे गृहस्थ ? गच्चीवर नि-वाते जागीं बसून त्यांच्या कांहीं गुप्त मसलती चालल्या आहेतसं वाटतं. (पुन्हां पाहून) काय ? त्यांपैकीं एक आमचे धाकटे सरकार ? (पाहून) होय. तेच. आणि दुसरा गृहस्थ तो कोण असावा ? (पाहतो.) ओळ-खला. आमच्या संभाजी महाराजांनीं गळ्यांतला ताईत बनविलेल्या एसाजी फर्जंदाची स्वारी ही. यांच्या मस-लती कशा संबंधानं चालल्या आहेत, हें आतां माझ्या लक्षांत येऊन चुकलं ! या कृतघ्न एशाच्या घातकी मसल-तींना योग्य असं—महाराजांच्या जिवाला अपाय करणारं —एखादं पात्र याला अनुकूळ झालं असेल त्याची व आमच्या भोळ्या युवराजाची त्या एकांत स्थळीं हे एसा-जीराव ओळख पटवून देत असतील; दुसरं काय ! वः एकून या दुर्दैवानं आज कमाल करून सोडली आहे ह्मणायची—कीं आमचे थोरले महाराज शिवछत्रपतिराजे

त्या निर्दय काळाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळं, आज दोन दिवस झाले, बिछाना धरून पडले आहेत; आणि त्यांचेच कुलदीपक हे आमचे धाकटे महाराज, त्यांबद्दल कांहीं खेद न मानतां—त्यांना ही बातमी निदान कळवावी तरी ह्मणून या ठिकाणीं येऊन पहातों तों—खुशाल आपले चैनीनं त्या एसाजी बरोबर खलबतं करीत बसले आहेत!! असो. ही दुःखवार्ता लवकरच त्यांच्या कानावर घालावी. आतां कालगत करतां उपयोग नाहीं. (जातो)

(मद्यपान केल्यामुळें ज्यांचे डोळे धुंद झाले आहेत, असे संभाजी व एसाजी दोघे येतात.)

एसाजी—महाराज, आपण आतां कसं करणार ?

संभाजी—खरोखर दोहींकडून मोठी पंचाईत आली गड्या! जोत्याजीही पहा कसा 'दत्त' ह्मणून याचवेळीं पुढं येऊन उभा राहिला! जावं ह्मणतों, तर असल्या मद्यपान केलेल्या स्थितींत त्यांच्या पुढं जाऊन उभं रहायला मला कांहीं धीर व्हावयाचा नाहीं. बरं यावेळीं न गेलों तर उद्यां या जगांत तोंड कादायलाही मला जागा उरणार नाहीं. कसं करूं, तें तूंच सांग आतां.

एसाजी—मी तरी आतां काय सांगणार? (विचार

करून) बरं, असं केलं तर नाहीं का चालणार ?

संभाजी—कसं करूं ह्मणतोस ?

एसाजी—मला वाटतं, आपण आतां इथून जाऊंच नये. मी असं विचारतों; आपणच तिथं गेल्यानं अधिक तें कार्य करणार ? महाराजांची शुश्रूषा ठेवायला शेंकडों माणसं त्यांच्यापाशीं हात जोडून उभीं आहेत. आपणांवांचून तिथं कांहीं खोळंबून राहिलं नाहीं.

संभाजी—(रागावून) एसाजी, तूं हें भाषण शुद्धीवर बोलतो आहेस, कीं तुझ्या बुद्धीला कांहीं भ्रम झाला ? अरे ज्यानें मोठ्या प्रेमानं माझं आजदिनपर्यंत लालनपालन केलं, त्या माझ्या प्रिय पित्याच्या अत्यावस्थेसमयींही मी जवळ नसावं, इतका निमकहराम मी होऊं कारे ? छे, असं कदापि नाहीं माझ्याकडून व्हायचं. कांहीं होवो, त्यांच्यापाशीं जाऊन मी क्षमा मागेन; ते कांहीं बोलले तरी तें मुकाट्यानं मी सहन करून घेईन; परंतु यावेळीं मी तिथं जाणार. मग तूं कांहीं ह्मण. मला त्याची मुळींच पर्वा नाहीं. हा मी निघालोंच. (जातो.)

एसाजी—जा-आणखी थोड्या दिवसांनीं तुझीही तीच वाट आहे. (सखेद) अरेरे ! एकून तो हिंदुधर्मा-

भिमानी पुरुषसिंह आज अशा स्थितीला पोंचून त्याचा अंत होणार ! ! बाई भूमिके !

दिंडीः

परम सद्गुणि शिव वीर तव कुमार ॥
देइं आलिंगन तया एकवार ॥
पुत्रवात्सल्या पूर्ण करुनि घेईं ॥
दृष्टि मुख तें पडणार आतां नाहीं ॥ १ ॥

अहाहा ! त्या वीरपुरुषाचं जगांतून नाहींसं होणं जरी आह्मांला पुष्कळ हितावह आहे, तरी त्याची ती दुःखवार्ता ऐकून असे उद्गार माझ्यानं काढल्यावांचून राहवत नाहीं ! !

पद—(बघुनि सुभद्रेला.) या चालीवर.

आज प्रती सविता ॥ खरोखर जाइल कीं अस्ता ॥ धृ० ॥
शौर्याचा जो केवल सिंधु ॥ सकल जनांतें सुखकर इंदु ॥
तदीय तरि तो दिसो मुखेंदु ॥ कोठुनि ये हातां ॥
अपुल्या हतदैवा आतां ॥

(जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—शिवाजीमहाराजांचा महाल.

(बिछान्यावर शिवाजी महाराज पडले आहेत; शेजारीं मुत्सद्दी लोक राजारामासह बसले आहेत; असे दिसतात.)

(पडद्यांत वैतालिकांचा शब्द होतो.)

पहिला वैतालिक—जयजयकार महाराज.

गद्य.

निजप्रतापें यवन संहरुनि, सकल लोकांस
पुत्रापरि सुखवूनि स्वधर्म सांवरिला ॥
अथवा, अमित तूंचि क्लेश भोगुनि, सिंहास-
नोपभोग नच बहु दिन भोगियला ॥
विमल तव राजनीतीस बघुनि, तव शौर्यादि
गुणवर्णिनि प्रजाजन तृप्त झाला ॥
सर्व सौख्योपभोगा मुकुनि, सांप्रत पडलासि
विपत्ति, होवो जीवा आराम तूझ्या ॥ १ ॥

दुसरा वैतालिक—शिव छत्रपतींचा विजय असो.

गद्य.

याचिताशय परिपूर्ण करुनि. सूरसुत कर्णासम
लोकिं या दातापद पावलासी ॥
दीनगोब्राह्मणबलहीनरक्षणव्रतसांगता करुनि
धर्मराज यमनंदन नाम वरिसी ॥

कीर्ति सुयशध्वज फडकवीसि, शक्रसुत जिष्णुवत्
दुष्ट मर्दुनि समरदेशीं ॥
सर्व सौख्योपभोगा मुकुनि, सांप्रत पडल्यासि
विपत्ति, होवो जीवा आराम तूझ्या ॥ १ ॥

शिवाजी—(सखेद)

पद—(नाहिं सुभद्रा या.) या चालीवर.

विपत्तितुनि या पार कशाचा पडतों मी आतां ॥
समजा तुमचें राज्य लागलें यवनांच्या हातां ॥ ध्रु० ॥
वडील माझा पुत्र परी तो लीन सदा व्यसनीं ॥
ज्यांच्याशीं मम हाडवैर त्या प्रीति तया यवनीं ॥
माझ्या पश्चात् या राज्याची होइल धुळधाणी ॥
काळ जिनें या गेली माता तीच गति ताता ॥ १ ॥

मोरोपंत पिंगळे—(अदबीनें) असं अनिष्ट बोलूं नये. सरकार, कोणती वेळ कशी असते, हें कांहीं सांगून येत नाहीं. आपण सांगितलेलं संभाजी महाराज ऐकणार नाहींत असं नाहीं. त्यांस इथं समक्ष बोलावून महाराजांनीं दोन बोधाच्या गोष्टी सांगून पाहाव्या. कारण, अल्पवय असल्यामुळें मन सध्यां कोंवळं आहे; तेव्हां कदाचित् तें सन्मार्गाकडेही वळण्याचा संभव आहे. इतकं करूनही कांहीं वळणार नाहींसं दिसलं, तर मग

मात्र महाराजांनीं समक्ष आपल्या राज्याची व्यवस्था लावून टाकावी; असं मला वाटतं.

शिवाजी—छे, छे, मोरोपंत, हा तुम्हांला केवळ भ्रम आहे. ' संभाजी शुद्धीवर आला ' असं आतां स्वप्नांतही ऐकायला नको. ज्याला प्रत्यक्ष आपल्या बापाची पर्वा नाहीं, त्याला राज्याची काळजी कितूपत असणार हें दिसतंच आहे. अहो, धडधडीत माझे हाडवैरी जे मोंगल, त्यांना हा कारटा जाऊन मिळून एकवेळ माझ्याशीं युद्ध करण्यास तयार झाला होताना? असे याचे एक का दोन अपराध मी आपणांस सांगूं! अहाहा! संभ्या—कुलांगारा—अरे, या शिवाजीच्या पोटीं जन्म घेऊन त्याचा शुद्ध वंश बुडविलासरे बुडविलास!!

मोरोपंत—(पाहून) धाकटे महाराज आले वाटतं? (पुन्हां पाहून) होय तेच. बरोबर जोत्याजीही आहे. (पुढें संभाजी व मागें जोत्याजी असे दोघे भीत भीत हळू हळू पाउलें टाकीत येतात. संभाजीस सर्व सरदार मंडळीचे मुजरे होतात. शिवाजीमहाराज संभाजीकडे एकसारखे टवकारून पहातात.) महाराज, असे पुढं व्हा. थोरल्या सरकारांना आपणांला कांहीं सांगायचं

आहेसं वाटतं. तर आपण त्यांच्या अगदीं जवळ जाऊन बसावं.

शिवाजी—(तिरस्कारानें) नको नको—त्या भ्रष्ट झालेल्या नरपशूचा माझ्या वस्त्रांना देखील स्पर्श नको. काय वाटेल तें दुरूनच मी त्याच्याशीं बोलतों.

संभाजी—(आपल्याशीं) दुरून तरी बोलायला कुणीं इतकं सांगितलं आहे! किती मूर्ख मनुष्य हा जोत्याजी आहे! मघांशीं घाईघाईनं येऊन मला सांगितलं, कीं, महाराज अत्यावस्थेला येऊन पोंचले आहेत. पण इथं येऊन पहातों तो दररोजच्यापेक्षां आमच्या तीर्थरूपांना बोलायला आज दुप्पट जोर आला आहे, बेवकूब कुठला—(जोत्याजीकडे रागीट मुद्रेनें पाहतो.)

शिवाजी—शंभू, असा माझ्यासमोर येऊन उभा रहा पाहूं! तूं हल्लीं कोणच्या स्थितींत माझ्यापुढं येऊन उभा राहिला आहेस, तुला कळलं? अजून तरी शुद्धीवर येऊन हा नाद सोड. नाहींपेक्षां, पुढं तुझी फार वाईट स्थिति होणार आहे. तुझ्या हातीं हें मराठ्यांचं राज्य गेल्यावर एक दिवसही तुझ्याकडून त्याचा नीट बंदोबस्त राहणार नाहीं. ते कपटी मुसलमान तुझ्यावर मोहनास्त्र टाकून तुला वेडापिसा करतील. भुलथाप देऊन तुझं

राज्य अचुक यशांत उतरतील आणि तुला राज्यभ्रष्ट करून दारोदार फिरे हिंडायला लावतील. हें माझं भविष्य कधींही खोटं व्हायचं नाहीं, कारण, त्या यवनांवर तुझा पूर्ण विश्वास; तींच काय तीं तुला तुझ्या भरंवशाचीं माणसं, मी आतां बोलून चालून परका झालों. मला तूं तिऱ्हाइतासारखं लेखतोस. मी कांहींही केलं, तरी त्याचा पूर्णपणें विचार न करतां चार लोकांत माझी तूं निंदाच करीत असतोस. परंतु लक्षांत ठेव अशी एखादी वेळ येऊन बेतेल, कीं त्यावेळीं मग माझ्या प्रत्येक शब्दाची तुला आठवण होईल. दुसरं कांहींएक सुचणार नाहीं. तूं धाय धाय रडत बसशील. तुझं समाधान करायला मग तिथं कोणीही नसेल. ते मोंगल तुला धरून नेतील आणि तुझे हालहाल करून एखादे दिवशीं या मातीला मिळवून टाकतील. झालं! ह्मणून मी काय ह्मणतों तें लक्षपूर्वक ऐकून भलभलते चाळे करायचे सोडून दे. बंदिखान्याचं सुख कसं असतं, तें एकवेळा तूं अनुभवलंच आहेस; आणि यापुढं जर असाच वर्तनक्रम सुरू ठेवलास तर पहिल्यापेक्षां कडक असा बंदिवास तुला जन्मभर भोगावा लागेल, याचा पुर्तेपणीं विचार कर. आतां तुला पोकळ घमेंड असेल, कीं माझ्यामागं ' राज्याचा मालक मीच आहें, ' परंतु हें पक्कं

लक्षांत ठेव कीं ज्यां शिवाजीनं लोककल्याणासाठीं, धर्मसंस्थापनेसाठीं व देशरक्षणासाठीं कित्येकवेळीं स्वतःच्या जिवाकडे पाहिलं नाहीं, तो, तुझ्यांसारख्या मदांध पोराच्या हातीं राज्य देऊन दोन दिवसांत त्याची विल्हेवाट लावून घेण्यापेक्षां, तें एखाद्या शहाण्या, राजकार्यदक्ष, नीतिमान् पुरुषाच्या हवालीं मोठ्या आनंदानं करील.

संभाजी—आपल्या मनांतून नसेल द्यायचं तर मलाही तें नको आहे. आज ' जा ' ह्मणून सांगितलं, तरी पाहिजेल त्या ठिकाणीं जाऊन आम्ही आमचं पोट भरूं.

शिवाजी—(कपाळावर हात मारून) अरेरे ! संभ्या अरे; आज तुला हे भिकेचे डोहाळे आठवले आहेतरे ! जातोस ? जा—जा—पाहिजेल तिकडे जा—चारी दिशा तुला मोकळ्या आहेत. चालता हो इथून—नीच. (कासावीस होतो.)

संभाजी—ठीक आहे, (जोत्याजीस घेऊन निघून जातो.)

हंबीरराव मोहिते—(गडबडीनें) पहा, पहा, मोरोपंत, महाराज असं हो काय एकाएकीं करायला लागले ? नीट जवळ जाऊन पहा बरं !

मोरोपंत—(खिन्नमुद्रेनें) सरकार, असं हें काय करीत आहां ! माझ्याकडे पहा !

शिवाजी—(त्याच्याकडे दृष्टि लावून) भिऊं नका. मी चांगला शुद्धीवर आहे. अशक्तपणामुळं असं हें झालं घाबरूं नका तुम्ही.

मोरोपंत—सरकार, आपण आतां जास्त बोलण्याचे श्रम घेऊं नयेत. घटकाभर स्वस्थ पडून रहावं. आंगांत तिळमात्र शक्ति नसल्यामुळें एखाद्या भलत्याच थरावर गोष्ट जाऊन पोहोंचावयाची !

शिवाजी—(निराशयुक्त) मोरोपंत, हंबीरराव, काय सांगूं !

साकी.

राज्य सुखाचें धाम असें मज स्वप्नि कधीं नच गमतें ॥
कारण, सायासें मिळवावें परि या चिंतनिं मन तें ॥
मागें कोण तया ॥ ठेविल कैसें रक्षुनियां ॥ ध्रु० ॥

आणि याच चिंतेनं मला आज या स्थितीला आणून पोंचिवलं आहे ! मोरोपंत, गेलं हो, हें मराठ्यांचं राज्य यवनांच्या हातीं खचीत गेलं ! आज तुम्ही सर्व निराधार झालांत ! तुमचा आमचा या लोकींचा संबंध तुटला बरं हंबीरराव ! माझी जागा निराळीच आहे,

तिथं सुखानं कालक्रमण करायला मी आतां जाणार! हा पहा, या माझ्या . प्रिय भूमीमातेला मी शेवटचा नमस्कार करतों. फार झालं तर तुमचा मी आणखी एक दिवसाचा सोबती आहें; तोंवर माझ्याशीं वाटतील ते दोन शब्द बोलून घ्या. आतां हयगय करूं नका. प्रधानश्रेष्ठहो, तुह्मी जाणते आहां. सर्वजण एकविचारान वागा नेहमी आनंदांत रहा. कधीं दुःखलेले असूं नका. नाहीं—पण तुह्मी जरी एक-विचारान वागलां, तरी त्या कसाबाच्या हातीं राज्य गेल्यावर तो तुह्मांला कसूचा सुखानं राहूं देणार आहे? तो कारटा तुमचा नाहक् छळ करील. तुमच्या योग्यतेची खरी किंमत त्याला कळणार नाहीं. एका दिवसांत तो या मराठ्यांच्या राज्याचा आणि आपला स्वतःचा विध्वंस करून घेईल. नाहीं, नाहीं—त्या व्यसनी पोराच्या हातीं हें राज्य आणि माझा प्रिय प्रजाजन मी कदापि देणार नाहीं.

मोरोपंत—(हळूच) हंबीरराव, मला आजचं हें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं! महाराज आतां बरळूं लागले!! (शिवाजीस) सरकार! आपणांला यावेळेस काय वाटतं आहे? मला आपली काय इच्छा आहे ती कळवावी!

शिवाजी—मला कशाचीही इच्छा नाहीं. माझ्या सर्व इच्छा आतां परिपूर्ण झाल्यासारख्या आहेत. मराठ्यांच्या राज्याचा विस्तार आणि गाईब्राह्मणांचा प्रतिपाल, हें जें माझं व्रत, तेंच तुह्मी सर्वजण निरंतर चालवा, दुष्ट यवनांचा नाश करून स्वधर्माचं रक्षण करा, माझ्याशीं आजपर्यंत जसे एकविचारानं वागलांत, तसेच, जो या व्रताचा खरा कैवारी तुमचा राजा होईल, त्याच्याशीं वागत चला; राज्यांत न्यायमनसुबा नीतीला धरून चालवा आणि आपल्या नवीन राजाला हरएक प्रसंगीं योग्य मसलत देण्याच्या कामीं दक्ष असा; ह्मणजे झालं. कारण, राज्याचे मुख्य खांब तुह्मी मंत्रिजन आहांत. तुमच्या सल्ल्यावांचून कोणतीही गोष्ट तडीस जाणार नाहीं. ऐकलं? (राजारामास हातीं धरून) या माझ्या राजारामाचं योग्य संगोपन करा. असं करायला चुकूं नकां बरं? मुलाचं अल्पवय आहे!

मोरोपंत—(हात जोडून) महाराजांनीं सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षांत ठेऊन तदनुसार वर्तनक्रम ठेवण्यांत आह्मांकडून कधींही दुर्लक्ष होणार नाहीं.

शिवाजी—मोरोपंत, स्वामींचं दर्शन—

(पडद्यांत.—'जयजय रघुवीर' असा शब्द होतो.)

शिवाजी—काय ? स्वामीमहाराजांचा शब्द हा ?

हंबीरराव—रघुवीर नामाचा जयघोष एकसारखा ऐकूं येत आहे, यावरून समर्थांचीच स्वारी असावी. (रामदासस्वामी येतात.)

रामदास—

पद—पिलू—धुमाळी.

श्रीरामिं मना रत होइं सदा ॥ मना रत होइं सदा रत होइं श्री० ॥ धृ० ॥ स्थितिलयकर्ता तो जगचालक ॥ सोडुं नको सिताराम कदा, आत्मारामपदां, रत होइं सदा ॥ मना रत होइं सदा रत होइं श्री० ॥ १ ॥ तोडुनियां हें दृढ भवबंधन ॥ दूर करीलचि तो विपदा, आत्मारामपदां, रत होइं सदा ॥ मना रत होइं सदा रत होइं श्री० ॥ २ ॥

रघुवीर समर्थ! (स्वामींस पाहून सर्वजण उठून नमस्कार करतात.)

रामदास—(आशिर्वादयुक्त हात करून) तुह्मां सर्वत्रांचें कल्याण होवो.

शिवाजी—स्वामिराज आले? (त्यांस नमस्कार करण्यासाठीं उठावयास लागतो.)

रामदास—नको, नको—शिवबा, उठण्याचे व्यर्थ श्रम घेऊं नकोस. तुझं आदरातिथ्य मला पोंचलं!

(शिवाजीमहाराजांकडे एकसारखे कांहीं वेळ पाहातात.) अहाहा! माझ्या शिवबानं मराठ्यांच्या गादीची स्थापना करून किती तरी लौकिक संपादिला! यवनांच्या तडाक्यांत सांपडलेल्या धर्माचा यानं जीर्णोद्धार केला! परंतु (मंत्रिजनांकडे पाहून) मंत्रीजनहो,

पद —(कांते फार तुला.) या चालीवर.

कैसें काय तुह्मांवरि आलें संकट हें न कळे ॥ काय तुह्मां त्या दुर्दैवानें दुःख हुताशनिं लोटुनि दिधलें ॥ ध्रु० ॥
होतां भूपति-अस्त खरोखर॥तेजोहीनचि व्हाल सदा कीं॥
निर्बल तैसे शक्ति असोनी, रवि जातां तीं जैशीं कमलें १

(पुन्हां शिवाजी महाराजांकडे प्रेमदृष्टि लावून)

पद—(सोडुनि मज रामराय.) या चालीवर.

निधनदुःख किमपि यास वाटतें न आजी ॥
परि चिंतनिं संतत या माझा शिवाजी ॥ ध्रु० ॥
" स्वकुला मम सर्वस्वा ज्येष्ठ तनय हानी ॥
राहिल का गोब्राह्मण—रक्षणार्थ कोणी ॥
माझा रण—यज्ञ कोण पूर्णतेस आणी "
या दुःखें पीडित हा देशभक्तगाजी ॥ १ ॥

शिवराया इहलोकीं आतां तुझी कोणती इच्छा उरली आहे ?

शिवाजी—महाराज, आपल्या कृपेनं माझ्या इच्छा पूर्ण होऊन—

दिंडी—(भैरवी.)

सौख्यि वसते सुरपुरीं जेथ कांता ॥
सकल पूर्वज माझिये मित्र, आतां ॥
लक्ष माझें लागलें सर्व तेथें ॥
नुरलि इच्छा मज कशाचीहि येथें ॥ १ ॥

रामदास—वाहवा ! पण इकडची व्यवस्था कांहीं केलीस ?

शिवाजी—स्वामीमहाराज, ती मी आपल्यासमक्ष करतों.

पद—(उरला भेद न ज्यां.) या चालीवर.

मीं हें राज्य, प्रजा, लक्ष्मी ॥ अर्पियली राजारामीं ॥ध्रु०॥
हाची योग्य असे गुरुजी॥वाहण्या राज्यभार आजी ॥
कवणीं करिल न इतराजी॥होतिल सर्व यास राजी ॥
लौकिक थोर जगामाजीं॥मिळविल हाच पहा गाजी॥
ऐसे माझ्या विचार मनिंचे हे अथवा, स्वामी ॥
सांगा काय करावें मीं ॥ १ ॥

रामदास—फार चांगलं ! राजा; तुला का कुणी सांगायला पाहिजे ! असंच कर.

राजाराम—(खिन्नमुद्रेनें) असं करून माझे महाराज कुठं जाईन ह्मणतात हो ? मला सांगा ?

रामदास—(त्यास जवळ घेऊन) बाळा. मी सांगतों तें.

पद—(जाई परतोनी.) या चालीवर.

तात तुझा तनया ॥ जातो ॥ तोडुनियां भवमायाबंधन ॥
स्वर्गसुखाचा अनुभव घ्याया. ॥ ध्रु० ॥

राजाराम—(लाडकेपणानें) मग महाराजांबरोबर मीसुद्धां जाईन. मी नाहीं रहायचा इथं.

रामदास०—छे, छे, लाडक्या, आपलं तें ठिकाण नव्हे!

(चाल सदर)

राज्यपदातें अर्पियलें तुज ॥ भार शिरीं तव ठेवुनियां ॥
मंत्रीजन हे रक्षितील तुज ॥ सिंहासनिं अभिषेचुनियां ॥
रहा परस्पर आनंदानें ॥ याविण आस न या शिवराया १

(शिवाजीस) शिवबा,

पद—(ज्याच्या तोंडीं दर्भानें.) या चालीवर.

इहलोकीं सत्कृत्यशालशाखा ॥
होउनीयां विश्रुत सर्व लोकां ॥ ध्रु० ॥
आपुल्या दलछायेस बैसवोनी ॥
तोषवीले जाणुनी श्रांत त्यांनीं ॥
स्वर्गभुवनीं परि अचल सुखासनीं ॥
ठाव आतां तुज मिळो जागि एका ॥ १ ॥

राजा, येतों बरें मी आतां! हा रघुवीराचा प्रसाद घे (प्रसाद देऊन मंत्रीजनांस) सांभाळा शिवबाला,

प्रकृति अति क्षीण झाली आहे. नीट जपा. ('श्रीरामिं मना०' हें मागील पद ह्मणत निघून जातात.)

शिवाजी—(चोहोंकडे पाहून) अशी ही व्यवस्था केल्यानं माझा सर्व चिंतारोग आज नाहींसा झाला!

साकी.

राजारामीं अर्पुनियां हें राज्य, प्रजा, लक्ष्मी मी ॥
सुटलों या दृढभवपाशांतुनि कीं पडलों सुखधामीं ॥
आतां प्राण झणीं ॥ जातिल आनंदें निघुनी ॥ ध्रु० ॥

(पडदा पडतो.)

तिसरा अंक समाप्त.



अंक ४ था.

स्थळ—रस्ता,

(दुःखानें गांजलेला एक ब्राह्मण येतो.)

ब्राह्मण—(दुःखानें) हाय! हाय! कोण अनर्थ हा! लक्ष्मीकांता, नारायणा!

पद—असावरी—त्रिवट.

स्वस्थचि बसलासी ॥ कसा तूं ॥ तुरला त्राता दीन जनांसी ॥ ध्रु० ॥ प्रथम अविंधांनीं गांजियली ॥ दीन प्रजा या येउनि देशीं ॥ होतां परि शिवराज—उदय तो ॥ सुखवासी बहु जाहली ॥ गुणराशी तो परलोकासी ॥ जातां आमुची स्थिति ही ऐसी ॥ १ ॥

असो. कर्मगति अति विचित्र आहे, असंच ह्मणून स्वस्थ बसणं भाग पडतं! नाहींपेक्षां असं हें विपरीत कशाला घडून येतं! सर्व राज्यामध्यें असा हा अंदाधुंदीचा प्रकार कां उत्पन्न होता! या मराठी राज्यांत धडधडीत मोंगलाई पुनरपि कां सुरू होती? शिवाजी महाराजांनीं केलेल्या व्यवस्थेविरुद्ध हा संभाजीराजा दंडेली करून राज्यावर कां बसता! अनेक व्यसनाधीन होऊन त्या कलुशाकबजी नांवाच्या कनोजा ब्राह्मणांस आपला मुख्य प्रधान करून त्याच्या मोहनीजालांत अचुक

जाऊन कां पडता! तो राजकार्यधुरंधर मोरोपंत पिंगळे मुख्य प्रधान, शिवाजी महाराजांचा केवळ उजवा हात— ज्याची प्रत्येक गोष्टींत सल्ला घेतल्याशिवाय महाराजांचें एक पाऊल पुढं पडत नसे—त्या नीतिमान् पुरुषाच्या नशिबीं आतां ह्यातारपणीं बंदिवास कां येता! इतकंच करून तो कामांध, व्यसनी राजा स्वस्थ बसला काय? नाहीं, नाहीं! त्या नरपशूनं आपली इच्छा पूर्ण करण्याकरतां त्या अण्णाजी दत्तोला चुन्याच्या भट्टींत टाकून जाळलं! तसंच सावत्रभाऊ राजाराम याला कैदेंत टाकून त्याची आई सोयराबाई इला भिंतींत किंहो चिणून तिचा शेवट केला! अशा एक का दोन निरपराधी प्राण्यांचे या कसाबानं जीव घेतले! याच्या हातीं राज्य येतांच शेंकडों शेलक्या शेलक्या माणसांना यानं आपल्या मानसदेवतेला बळी देऊन तिला शांत केलं व अजून करीत आहे! तेव्हां कोणावर या मानवासुराची धाड कोणत्यावेळीं येऊन पडेल याचा कांहीं नेम नाहीं! त्या दुष्ट काळानं अकस्मात् आमचं स्वातंत्र्य, आमचं वैभव आणि आमची शक्ति समूळ नष्ट करून आह्मांला निराश्रित, निस्तेज, व पंगु करून सोडलं आहे! काय तें वैभव! काय ती राजनीति! केवढी प्रजाकार्यदक्षता! कीं जी पाहूनच कित्येक वेळीं आमच्या-

शत्रूंनींही माना डोलवाव्या; ती सर्व आतां केवळ स्वप्नवत् होऊन गेली ! ! (ऐकल्यासारखें करून) याप्रमाणं मीच ह्मणतों असं नाहीं. चोहोंकडे पहा तेच उद्गार ऐकूं येत आहेत !

पद—(किती तरी पहांटची.) या चालीवर.

“ **करीतसों हीच विनंती तुजला बाई भरतभूमिके ॥ध्रु०**
गेला रणधीर वीर ॥ बलसागर दानशूर ॥
ज्ञाता तव प्रिय कुमार ॥ तुजशिं पूर्ण ठाउकें ॥ १ ॥
उरला नच कोणि अतां ॥ दीन जनांचा त्राता ॥
ह्मणुनि तुझ्या उदरिं सुतां ॥ घेइं सदय अंबिके ॥ २ ॥

राजा, नकोरे नको त्या कपटी कलुशाच्या कपटजालांत सांपडून आपल्या जिवाची, राज्याची व प्रजेची व्यर्थ हानि करून घेऊं ! आधींच विरहदुःखानं पोळलेल्या या अनाथ प्रजेला विनाकारण गांजूं नकोसरे राजा ! त्या पतिव्रता स्त्रियांकडे ढुंकूनदेखील पाहूं नकोस. गाईब्राह्मणांना प्रतिपाळ कर. स्वधर्माची आस्था धरून नीतीनें राज्य चालीव. झालं तें होऊन गेलं; आतां यापुढं तरी नीट शुद्धीवर येऊन भलतंच साहस करायला तयार होऊं नकोस. त्या अवरंगझेब बादशहाच्या कन्येला, वाटेंत तिच्या लोकांवर हल्ला करून, पन्हाळ-

गडावर आणून कैद करून ठेवली आहेस, तेथून तिची लवकर मुक्तता कर. यांत सर्वस्वीं तुझं कल्याण आहे. असं हें न करशील तर राजा, यावज्जन्म तूं दुःखंच भोगशील. सुखाचा लेशही तुला मिळणार नाहीं; या मराठ्यांच्या राज्याची धुळधाण होईल; प्रजाजन तुझं अकल्याण इच्छील; पतिव्रतांचे शाप तुला खचीत नडतील; तो कबजीच शेवटीं तुझ्या नाशाला कारण होईल; तुला तो मोंगलांच्या स्वाधीन करील; ते दुष्ट तुला धर्मभ्रष्ट करतील; तुला वेडापिसा करून सोडतील आणि तुझे शेवटीं हाल हाल करून एखादे दिवशीं पार धुळीस मिळवून टाकतील; हें माझं ब्राह्मणाचं वचन कधींही असत्य होणार नाहीं. (जाऊं लागतो तों समोरून संभाजीस येतांना पाहून) अरे! हा समोरून कोण संभाजी राजाच येत आहे वाटतं ? (पुन्हां पाहतो.) हँ! हा त्या गडावर कैद करून ठेवलेल्या रोषनारेकडे जात असावा! चला तर आपण त्याच्या दृष्टीस न पडतां दुसऱ्या वाटेनं निघून जावं. (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ.—पन्हाळगड.

(रोषनार दिवाणखान्यांत बसली आहे, तों तिचें चिंतन करीत असलेला संभाजी येतो.)

संभाजी—(हळू हळू चालत)

पद—(आकर्षुनि धनु.)या चालीवर.

सुबकनार सकुमार फार त्या रोषनार सुंदरीवरी ॥
लुब्ध जाहल्यामुळें अतां मन बहुवेगानें धांवतसे ॥
परंतु ह्याची स्थिति कां ऐशी कां झालें अस्थीर असे?

(पाहून आश्चर्यानें)

अहो, पण हा एकाएकी काय चमत्कार झाला!

पद—(वीर शिरोमणि.) या चालीवर.

नच आकाशीं तम जो नाशी असे उगवला शशी ॥
तेजोमय नक्षत्रें तशीं ॥ धृ० ॥
दीपावलिही येथं लाविली नाहिं कुणीं फारशी ॥
पडली दीप्ति कशाची अशी ॥

(शहाजादीकडे पाहून)

तरी वाटलंच, हीच ती दीप्ति! कारण,
॥ चाल ॥ हा वदनचंद्रमा पूर्ण उगवला असे ॥
जो नयनचकोरा फारचि सुखवीतसे ॥
मग क्लेशातिमीरें तेथ रहावें कसें ॥ चाल ॥

तद्दर्शन-तें होतां माझी स्थिति जाहाली कशी ॥
उदकें वेल सतेजचि जशी ॥ १ ॥

(तिच्याजवळ जाऊन)

शहाजादी, आमच्या शेजारीं येऊन बसण्याला आपण अधिकारी आहांत. अशा दूर उभ्या कां ?

शहाजादी—खॉय, हम् नजदीक आयेंगे या दूर खडे है, जो कुछ् आप बोलेंगे हम् सब् सुनेंगे.

संभाजी—बरं तर. आपली इच्छा नसेल तर मीही विशेष आग्रह करीत नाहीं. मी विचारतों तेवढ्या प्रश्नाचं नीट विचार करून उत्तर द्या ह्मणजे झालं. हें तरी आपणांकडून होईल किंवा नाहीं ?

शहाजादी—क्यौं नहीं ? पहिले ये बताव आप पूछते क्या हो. तब् हम् उसका सोच समजकर जवाब देयेंगे.

संभाजी—माझा प्रश्न मिळून एवढाच, कीं शेवटीं आपला बेत काय ठरला, तो मला कळवा.

शहाजादी—जनाब, अजूनबी अदमीके साथ खुले तौरपर बोलनेका हम्कु कबी इत्तेफाक नहीं पडा, इस्-वास्तें बोलते शरम आती है. लेकिन् वो वख्त् अब् आन पडा. लाचार हैं. जबाब देते हैं. सुनीये. के

हमारी आपकेसाथ शादी करनेकी बिलकुल खायष् नहीं. हमूसे क्या पुछते हो? आप खुदी बोलो, के देहलीके बादशहाकी लडकीके साथ मरठ्ठोंका राजा शादी करता अच्छा मालुम होता है?

संभाजी—न शोभायला काय झालं? माझ्या कुलाची तशीच माझ्या नांवालौकिकाची आपण पुरी माहिती करून घेतल्यावर छत्रपति शिवाजीमहाराजांचा पुत्र संभाजी, ज्याला आपला पिता अवरंगझेब बादशाहाही पुरा ओळखून आहे, त्याच्याशीं लग्न करणं शोभणार नाहीं, असं आपण कालत्रयीं ह्मणणार नाहीं.

शहाजादी—तो हमारे वालेद्के खिदूमतमें दरखॉस्त करनाथा! उनको छोडकर ये क्या जंगली लोगोंके राजाकेतऱ्हा काम किया?

संभाजी—छे, छे. शाहाजादी, हें आपलं ह्मणणं अगदीं चुकीचं आहे. आपण ह्मणतां तसा मी जंगली लोकांचा राजा नाहीं; तर—

पद—(शृंगा ताडोनी.) या चालीवर.

या दक्षिणप्रांतीं ॥ जयाची ॥ चोहिंकडे ख्याती ॥ असे ती ॥ नाम जयाचें ऐकुनि कांपत होते खल चित्तीं ॥ भयानें ॥ ध्रु० ॥ ज्या शिवभूपतिला ॥ जाणत ॥ होता

दिल्लिपती ॥ पिता तव ॥ पुत्र तयाचा संभाजी तो मी आपुल्यापुढतीं ॥ उभा हा ॥ १ ॥

मग आतां आपणच सांगा, आपल्या ह्मणण्याप्रमाणं मी जंगली लोकांचा राजा आहें, किंवा एक पूर्ण सत्ताधारी आहें ?

शहाजादी—ऐसे ताकत्वान् बादशाहा होकर आपकु ऐसी नावाजिब् बात नहीं करने चाहेती !

संभाजी—सांगा पाहूं, असा कोणता अनीतीचा प्रकार त्याच्या हातून घडला तो ?

शहाजादी.—जब्के बादशाहाकी लडकी अपने वालेद्कू मिलने जाती हो, और उस्कु रास्तेमें जबरदस्तीसें पकडकर केद्में डाल देना, क्या ये नावाजिब् नहीं है ? जिस्नें ये ऐसा नाषायिस्ता काम किया, वो आपही सेवाजीके लडके संभाजी हो ?

संभाजी—आपण असंच ह्मणत असाल तिथं इलाज नाहीं. परंतु मीं—

साकी.

अनीति नच आचारिली किंवा, दुष्कृति नाहीं केली ॥
भूपतिसत्ता तैशि आपणां किमपी नच दाखविली ॥
माझ्या लोकांनीं ॥ आणियलें कीं या स्थानीं ॥ ध्रु० ॥

आतां त्यांनीं कशा करतां इथं आणलं याविषयीं खरं ह्मणाल तर या वेळ पर्यंत मला अज्ञानच आहे. तर ती हकिगत आपल्यांच तोंडून एकवेळ मला कळूं द्या.

शहाजादी—सुनीये साहेब. चंद अदमी साथ लेकर पन्हागडके रास्तेसें मेसूर अपने बाप अवरंगजेबकु मिलने जातीथी. और उस् वखत आफताफ गरूब होनेका बखत था. थोडी देरबाद चांदनी होगई. इस्की चांदनीमें मेरे अदमी बहुत खुष हुये, और बहुत जल्दी और बडी खबरदारीसें चलने लगे. इतनेमें उस् रास्तेपर जहांसे के दो अदमीबी मुष्कल्सें गुजर सकतेथे, और जिस रास्तेसे हमारा सेपाल जाताथा, कुछ हतयारबंद अदमी हमारे अदमीकु मिले. और मेरे अदमीकु कहा, "बस् ठेरो. आगे मत बढो. और ये शहाजादी हमकु देकर तुम लोग अपना रस्ता पकडो. नहींतो मुफ्तमें मारे जाउगे और अपने बादशाहाकु जाकर बोलो, के उस्की लडकी रोषनार मरठोंके बाहशाहा संभाजीपास सही सलामत है. वो उस्की अच्छी तऱ्हासें खबरदारी करेगा." इतना सुनतेही मेरे आदमी बडी तेजीसें आगे बढे, और हरदो

जानवूकी आपिसमें लढाई होने लगी. मुजकु मालुम नहीं फेर क्या हुवा! क्युं के, उस् बखत्से मैं बिलकुल बेहोष थी. जब् होषमें आई तो देखा के मेरी तरफ्का कोई आदमी नहीं, मगर ये कैद्खाना या आपकु देखा जो सामने खडे हो. तबसे मैं इस् केद्की मुसीबत्में हुं!

संभाजी—नाहीं, नाहीं—शहाजादी, इथं आपण खास चुकतां. सांप्रत आपण बंदिखान्यांत नसून एका भव्य, सुंदर व रमणीय अशा राजवाड्यांत अहां. हें बंदिवासाचं दुःख नसून केवळ इंद्रभुवनाचंच सुख सध्यां आपल्या अनुभवास आहे. आतां एवढं मात्र खरं, कीं आपल्या सेवकजनांपैकीं इथं जवळपास कोणीच नाहीं; तरी पण हा आपला सेवकजन आपल्या अर्ध्या वचनांत राहून, पडेल ती कामगिरी बजावण्यास व आवडेल ती वस्तु आणून देण्यास आज तयार आहे. असं आपणांला अजूनही वाटूं नाहीं लागलं का?

शहाजादी—(आपल्याशीं) ये दिल, जरा सबर कर. अब् इस् राजाकी नीमत् दर्याफ्त कर. मैं जानती हुं, के फेर तु मेरे कबजेमें नहीं रहेगा. क्युं के ये राना तुज्पर आषक् हो गया. लेकिन् जब्तक् सब् बात जाहीर न

होये जायगी, तबूतक् तुजकुं उस्के हवाली नहीं करूंगी.

संभाजी—शहाजादी, बोला आपल्या मनांत काय आहे तें?

शहाजादी—महाराज; मैं ओर कुछ नहीं कहती. लेकिन एक शर्त है.

संभाजी—ती कोणती?

शहाजादी—अगर आपको हमूसे शादी करना है तो हमारे पैगंबरका मझहब कबूल करो.

संभाजी—हें आपण कांहीं तरी बोलावं ह्मणून बोललांत, इतकंच. बाकी आपणांसारख्या समंजस बादशहाच्या कन्येला हें कधींच मसजून चुकलं असेल कीं असं होणं अगदीं अशक्य आहे. विचार करा,

पद—(मी कुमार ती.) या चालीवर.

स्वकुलातें लज्जास्पद कीं, मम शौर्या, सत्कीर्तीतें॥धृ०॥
जें दोषास्पद या लोकीं, वा अन्य लोकिं त्या होतें॥
कैसें मि आचरावें या, अति घोर अशा कृत्यातें॥ चाल॥
'मुसलमान राजा झाला'॥ समजतांचि या वार्तेला॥
पुरजनांस माझ्या सकलां॥चढुनीयां बहु कोपातें॥चाल॥
क्षणिं एका नाहींसा या करितील जगांतुनि मातें॥ १॥

असा हा सर्व खरा प्रकार असून धडधडीत विस्तवावर पाय ठेवायला आपण मला कसं सांगतां ?

शहाजादी—तब् आपकी ये मर्जी है, के मैं अपना दीन छोडकर हिंदु बन् जाऊं ? तो मैं तयार हुं !

संभाजी—वः शहाजादी, युक्ती तर फार सुरेख काढलीत ! ह्मणजे तीही पण कधीं अमलांत येऊं नये—

शहाजादी—जो दो बातें मेरे समज्में आई, वो आपसे अरज कर दियी; लेकिन् आपको तो एकबी कबुल नहीं !

संभाजी—(विचार करतो व आठवल्यासारखें करून) हो ही मात्र एक छान तोड आहे. हें पहा, लग्नां-तच कांहीं विशेष मजा आहे, असं नाहीं. तसं न करतां आपण उभयतां एकत्र राहूं, ह्मणजे झालं. प्रेमाप्रेमाचं लग्न लावलं ह्मणजे सर्वच बाध मोडले कीं नाहीं ? दोघांनाही मग धर्मांतर करण्याची जरूर नाहीं.

शहाजादी—(रागावून) अपने अच्छी बांत सोची ! अगर आपकी और हमारी शादी नहीं होगी, तो ये तमाम उंमर अकेली काटोंगी. लेकिन् जो बात आप फर्माते, ऐसा कभी न होयगा. ऐसे बादशहाके पास

इस् तऱ्हा रहनेसे ये कंगाल मुसलमानके साथ शादी करकर रहना अच्छा है.

संभाजी—शहाजादी, उभयतांचं जर एकमेकांविषयीं निष्कपट प्रेम आहे, तर तिथं धर्माचा, लग्नाचा अथवा, अन्य कोणत्याही गोष्टीचा प्रतिबंध कां बरं असावा ? यावरून असं दिसतं, कीं आपलं मात्र मजविषयीं तसं प्रेम नाहीं.

शहाजादी—मैं आपके केद्में हुं ! जैसे आपकी मर्जी होगा ऐसे बोलो. आपकु क्या मालूम, जैसी मुजकु आपसे मोहबत है ? वो मैं जानती हूं!. ये बाताके, मेरा धरम आपसे जुदा है ? मैं कमृती हो जाऊं ! अपने खानदानकु दाग लगाकर तुमारी लवंडी होकर रहुं, ये बात ख्वाबमेंबी मत् ख्याल करना. महाराज, इस्‌वखत ये कहती हुं, के आपकी वो हमारी बिलकूल जानपछान नहीं; इसवास्ते अब् शादी बात चित् न कर. आपकी दगेकी बांते मुजकुं अच्छी नहीं मालुम होती !

संभाजी—(जवळ जाऊन तिच्या हनुवटीस हात लावून) शहाजादी, काय हें ? तुझ्या स्त्रीजांतीला आपल्या प्रियजनांवर असा कोप करणं शोभत नाहीं. मग—

पद—(स्फटिकाचे हे पदपथ.) या चालीवर.

रुससि फुगसि असि कां मजवरती ॥
चित्तिं धरीं तूं लवभर शांती ॥ ध्रु० ॥
प्रिय तुझ्याविण अन्य न कांहीं ॥
निशिं चिंता तव्र हें मन वाही ॥
शंकित तूझें मन असलें तरि ॥
आण गळ्याची घेतों सुंदरि ॥ १ ॥

लाडके, ये तर आतां. वृक्षवेलीप्रमाणं या समयीं मला तुझ्या सुकुमार हस्तद्वयांनीं घट्ट आलिंगन देऊन तुझ्या सुखाविषयीं आतुर झालेल्या या संभाजीची तृषा शांत कर!

(उभयतां एकमेकांस आलिंगितात. संभाजी स्पर्श सुख झालेंसें दाखवून ह्मणतो,)

पद—(पुष्पपराग) या चालीवर.

झालि अहा रोमांचित काया ही ॥ मज स्पर्शतांचि वपु हें सुकुमार ॥ सुदिन खरोखर आज उदेला ॥ सौख्य होत मज तें अनिवार ॥ ध्रु० ॥ कवण आस मम याविण आतां ॥ अखिल जगतिं राहियली ॥ स्वकरयुगुलिं मीं या समयीं ही ॥ आलिंगिलिं प्रिय रोषनार ॥ १ ॥

(इतक्यांत पडद्यांत ' धरो–पकडो–मारो ' असा गलबला होतो; दोघें घाबरून इकडे तिकडे पहातात.)

संभाजी—(आपल्याशीं) बाहेर हा कसला गलबला चालला आहे बरं ? आह्मांवर एखादा प्रसंग तर येऊन गुदरला नाहीं ? (विचार करतो व उघड) शहाजादी, तूं क्षणभर इथंच ऐस. मी बाहेर जाऊन गलबला कसला आहे, तें पाहून येतों. (कांहीं चालून जातो तों जोत्याजी गडबडीनें येतो.)

जोत्याजी—महाराज, चाललांत कुठं ? चारी बाजूंनीं तर शत्रूनं आपल्याला घेरलं आहे. यावेळेस इथच्याइथं आपला जीव वांचविण्याचं कांहीं साधन असल्यास पाहिलं पाहिजे.—

संभाजी—(गडबडीनें) जोत्याजी, थोडा वेळ थांब. मी आंत जाऊन येतों. (शहाजादीजवळ येऊन) शहाजादी, या वेळीं आपण मोठ्या कचाटांत सांपडलों ! तुझ्या बापाचं मला धरणं आलं आहे. त्या लोकांच्या हातीं मी सांपडलों तर ते मला बादशहाकडे घेऊन जातील; आणि तिथून मग जिवंतपणीं सुटण्याची आशा नको ! आतां माझ्यातर नशीबीं हालच आहेत; परंतु तो तुलाही सुखानं राहूं देणार नाहीं ! तूंच सांग ! (तिला पुन्हां आलिंगन देतो.)

शहाजादी—मेरा आरामसें रहेना नही हुवा तो

कुछ हरजा नहीं, लेकिन् (संभाजीकडे बोट करून) ये मेरे जानकों किसी तऱ्हेंसे धक्का ना पहोंचे! महाराज, आपनी खुद्दखुद् जान बचेगी, ऐसी तदबीर करो. आप खुषीसें रहोगे तो मेरी मुलाकत् होगी. मैं किल्ले-गाहाके तरफ् गयेबाद मेरा छोटा भाई सुलतान महंमद आखबर, उस्का दिल् मिलाकर उस्कु आपने मदत्कु भेज देऊंगी. उस्के आव्वल मेरे तरफ्के कै लोग आपके मुलाकातकु आयेंगे. महाराज, अब् यहां मत् रहो. हाल्ला नजदीक सुन्नेमें आता है.

जोत्याजी—(धांवत येऊन बोबडी वळल्यानें) सरकार, ते मोंगल पहा गडावर चढूं लागले! पळा—धांवा—प्राण वांचवा—हे अगदीं जवळ येऊन ठेपले—ती चोरवाट—(दोघेजण त्या चोरवाटेनें पळून जातात. शहाजादी इकडे तिकडे पळत सुटते तों दोन मोंगल प्रवेश करतात.)

तकेरीबखान—इसलालखान, खबरदार. अंदरका एकबी आदमी बहार न जाने पावे. इस् बखत संभाजी और शाजादी दोनों अपने कबजेमें आगये हैं. खबरदार. वो देखो शाजादी भाग चली. (शहांजादीस अडवून धरून) शाजादीसाहेब, अब् इधर उधर क्या

भागते हो ? बस्. इधर खडे रहो. कदम् मत् उठाना. इस् बखत तुम हमारे कैदी हो. बोलो, संभाजी किधर है ?

शहाजादी—अब वोई तकरीबखान हो? सुभानअल्ला ?

तकरीब०—मैं वोई हुं.

शहाजादी—तकरीबखान, तुम् होषकी बात करते हो, या बेहोष हो,? षायद् तुम् सौदायी हो गये होके तुमारी जबान तुमारे काबुमें नहीं रही ? ऐसे दिवाने मत् बनो. समजकर बात करो.

तकरीब०—शाजादीसाहेब, बेफायदा बांते करके छीपी हुई बातको मत् जाहीर करो. मैं आपके घुसेसें डरनेवाला नहीं. मुजे मालुम् है, के आप बादशाह्या अवरंगजेबकी लडकी हो; और येबी मालुम है, के जंगली राजाके घर रहकर तुने अपने बाछाई खानदानकु बटा लगा दिया. इसवास्ते मैं कहता हुं, के तुम् हमारे केदी हो.

शहाजादी—(संतापानें लाल होऊन) जिस्केसामने कोई आंख नहीं उठा सक्ता, ऐसी बादशाहाकी लडकीकों तुम् केद बोलते हो ? शरम है तुमकु ?—बेहया, मैं अपने खुषीसें मरट्ठोंके राजाकेपास नहीं रही.

तुमारी नामर्दीसें वो मुजकु पकडकर ले गया. क्या करूं! बेगानी जगामें हुं. इसूवास्ते लाचार हुं. नहीं तो शाजादीका मर्तबा तुज् कवडी तनूखाके सीपाईको अभीकेअभी दिखला देती!

तकरीब०—बस्. तुमारा रुताब मुजे मालुम् है. (इसूलालखानास) इसूलालखान, शाजादीको अपने कबूजामें कर लेव. और मैं संभाजीकी तलाष करता हुं; के वो कहां छीपकर बैठा है. (आंत जाऊन धांवत येतो.) तोबा! तोबा! जिस् संभाजीके वास्ते मैं इतुनी कोसीस कर रहा हुं, वो इस् जगासेंबी धोका देकर भाग गया! इसूलालखान मुजे अच्छी तऱ्हासें मालुम् है, के ये सब् शाजादीकी कारस्तानी है. अच्छा, इस्को अब् बादशाहाके हावाले करे, और संभाजीकी पीछे तलाष करेंगे. चलो फेर. (निघून जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—रायगड.

(कैद केलेला संभाजी दिसतो.)

संभाजी—अहाहा! कांय माझं वैभव! केवढी मा-

ड्या हातीं राज्यसत्ता ! पण एक दैवगति फिरतांच त्या सर्वांचा लय होऊन—

पद—(आले वनमाळीं रात्रीं.) या चालीवर.

सांप्रत हा दुःसह मी बंदिवास भोगितसें ॥
लेखुनियां पशुसम कीं नच मातें कोणि पुसे ॥ ध्रु० ॥
क्षणोक्षणीं अपमानिति सहन करूं हें मि कसें ॥
काय अहा जाहलि ही दीन दशा माझि असे ॥ १ ॥

ज्याच्या संमोर उभं राहण्याचीही कुणाची छाती होत नसे, त्या ह्या संभाजीपुढं नाहीं नाहीं त्या लोकांनीं येऊन हवं तें बोलून जावं आणि तें यानं मुकाट्यानं सहन करून घ्यावं, असा प्रसंग आज याच्यावर येऊन पडावा काय ? पण दैवा ! तुझी कृतीच विचित्र आहे। नाहीं तर तूं पन्हाळगडावर आलेल्या मोंगलांच्या धरण्यापासून माझी सुटका केलीस आणि कांहींवेळ जातो न जातो इतक्या अवकाशांत पुन्हां तूंच मला; गडाच्या आसपास माझ्या पाळतीवर असलेल्या शिरक्यांच्या स्वाधीन करतोस! तस्मात्—

अंजनीगीत.

तुजवरि ठेवुनि बहु विश्वासा ॥
नच राहावें कोणीं सहसा ॥
फसविशि त्यातें समुळीं ऐसा ॥
अंतिं, असें झालें ॥

(विचार करून) चिंता नाहीं. जों पर्यंत त्या माझ्या प्रिय शहाजादी सुंदरीचे ते प्रीतीचे शेवटचे शब्द मला पक्के स्मरताहेत, तों पर्यंत अशीं शेंकडों संकटं मजवर येऊन पडलीं, तरी मी किंचित्‌ही डगमगणार नाहीं. ठिक आहे. माझ्या हाडवैऱ्यांनो, मी सांगतों असं तुह्मी बेलाशक करा आतां—

पद—(प्रतिकुल होईल कैसा.) या चालीवर.

याहुनीहि दारुण मजसीं बंदिमाजि टाका ॥
शृंखला सुखानें माझ्या हस्ति, पायिं ठोका ॥ ध्रु० ॥
अन्नलेश मज द्या नच कीं वस्त्र पांघराया ॥
व्हा तयार संतत माझी हेलना कराया ॥
साह्यकारि माझा आहे कुणि तरी स्थलीं या ॥
सोडवील मज तो माझ्या भेटवील लोकां ॥

(पडद्यांतून एका मनुष्याचें बोलणें ऐकूं येतें)

" बताव, मुजको अंदर जाने देगा या नहीं ? नहीं तो अभी तेऱ्हेको मजा चखा दुंगा. मुज्को पछानता है ? मैं कौन हुं ? जो के बादशाहासे फकीर और फकीरसे बादशाहा कर सकते, उस् पैगंबरका मैं कासद् हुं. उसीनें मुज्को तेरे हावालातिकेसात मुलाकत् करनेका हुकम् दिया है. मुजकु अंदर जाने दे. मुजे सीर्फ उसे

मिल्ना है. और कुच् काम नहीं. येही उस् रसूलका हुकम् है. आछी तऱ्होसें दिल्में सोच. उस्की मर्जीके बरखिलाफ अगर तुं करेगा, तो तेरा कबी अच्छा नहीं होयगा. उसीका हुकम् होतेही मैं तुझे अभीकेअभी इधरकाउधर करुंगा; ये तुं अच्छी तऱ्होंसे ख्याल कर ले.

संभाजी—(साशंकित) हा अवलियाफकीर माझी भेट घ्यायची ह्मणतो, हें काय? माझा व त्याचा अर्थाअर्थीं कांहींचं संबंध नसून एवढ्या रात्रीं या बंदिखान्यांत येऊन माझी मुद्दाम भेट घ्यायची त्याला काय जरूर पडली असावी? याविषयीं कांहींच तर्क चालत नाहीं! ह्या फकीराला इथून माझी मुक्तता करावी ह्मणून तर कुणीं मुद्दाम पाठविलं नसेल ना? (विचार करून) समजलों. माझ्या कुणीं तरी हितचिंतकानें त्याला इथं पाठविलं आहे—आणि तेंही माझ्या प्रिय शहाजादीनंच! कारण, 'त्यापूर्वी माझ्या पक्षाचे कांहीं लोक आपणांला येऊन भेटतीलच' हें तिचं त्यावेळचं विश्वसनीय भाषण व आज या फकीराचं या ठिकाणीं येणं, या दोन गोष्टींचा कांहींअंशीं बराच मेळ जमतो. (पाहून) हें पहा, खोलीचं दार उघडून शिपाई व तो अवलियाफकीर दोघे आंत आले. (दोघे

आंत येतात. फकीर संभाजीपुढें जाऊन कांहीं वेळ पहात स्तब्ध उभा राहतो, व मानेला हिंसडा दिल्या-सारखें करून शिपायास समजूं न देतां तोंडातून एक अंगठी राजापुढें टाकून मुकाट्यानें निघून जातो. नंतर शिपाई खोलीला कुलूप मारून जातो.) हा काय चमत्कार! तो अवलिया फकीर या ठिकाणीं येतांच चित्रासारखा माझ्यासमोर येऊन उभा राहिला, व एक अक्षरही तोंडावाटे न काढतां मुकाट्यानं निघून चालता झाला. जातांना मात्र त्यानं आपली मुद्रा विलक्षण करून मानेला हिंसडा देऊन ही एक अंगठी माझ्या आंगावर फेंकून दिली. पण ती टाकून निमुटपणें निघून जाण्याचा त्याचा उद्देश काय असावा, हें अजून माझ्या लक्षांत येत नाहीं. मघांपासून एकसारखा विचार करून पहातों; पण व्यर्थ!

पद—(दरसन बिन अखिया.) या चालीवर.

बहु शंकित माझें मन जाहलें ॥ धृ० ॥ उद्भवुनीयां तर्क विलक्षण ॥ भ्रमित खरोखर हें बनलें ॥ १ ॥ 'कोठिल तो' कां ये स्थलिं आला' ॥ संतत चिंतनिं या बसलें ॥ २ ॥

पण यावरून हें खास ठरतं, कीं, माझ्या हितचिंतकां

पैकीं कुणाचा तरी गुप्त प्रयत्न आंतून जारीनं सुरू आहे; आणि माझा बंदिवास आतां फार थोडा उरला, हेंही खचीत! अंगठी टाकून मुकाट्यानं निघून जाण्याचा त्या फकीराचा उद्देश मिळून इतकाच असावा, कीं मला तिची ओळख पटून माझी सुटका करण्याकरतां कुणाचा तरी प्रयत्न सुरू आहे, हें समजून मीं निश्चिंत रहावं. आतां या अंगठीबद्दल विचार केला असतां असं मला पकं स्मरतं, कीं ही निदान दोन तीन वेळां तरी माझ्या नजरेखालून गेली आहे; परंतु अमक्याच ठिकाणीं अमुकच वेळीं, अमक्याच्याच बोटांत पाहिली, असं मात्र निश्चयानं सांगतां येत नाहीं. कांहीं असो. तिच्याविषयीं विचार करीत बसण्यांत कांहींच अर्थ नाहीं. अंगठी घेऊन येणारा सामान्य पुरुष नसून मुसलमान धर्मांतील पूज्य मानलेला एक अवलिया फकीर आहे; तेव्हां त्याच्या येण्याविषयीं संशय तर बिलकुल नको. कारण, असले हे लोक एखाद्या नीच कृत्यांत कधींही मन घालणारे नाहींत. एकूण ह्या कारागृहांतून माझी लवकरच सुटका होणार तर! (उभा राहतो व अंगठीकडे पाहून आनंदानें) गडे मुद्रिके!

दिंडी.

सिद्ध झालिस जिवलगे काय यातें ॥
आज बंदींतुनि मुक्त करायातें ॥
काय मज तूं नेशील सौख्य-धामीं ॥
असो, अंगुलि मम ठेवितों तुला मी ॥ १ ॥

(इतक्यांत खोलींतून गुप्त असलेल्या एका विवरांतून घोंगड्या पांघरलेले दोन असामी येतात. संभाजी त्यांस पाहून चपापतो.)

पहिला—महाराज, आपणांला आमच्याविषयीं मुळींच संशय येऊं देऊं नका. आह्मी आपली इथून सुटका करण्याकरतां या ठिकाणीं आलों आहोंत. ज्या वाटेनं आह्मी आलों त्याच वाटेनं आपणांला सुरक्षित स्थळीं नेऊन पोंचवितों. आपण आमच्या मागोमाग चलावं. पहाटेस आपण नेमलेल्या ठिकाणीं जाऊन पोहोंचूं. इथून निघण्यास मात्र आतां उशीर लावूं नका.

संभाजी—परंतु आपण कोण, कुठून आलांत, वगैरे समजून घेतल्याशिवाय तसं एकाएकीं मला करतां येत नाहीं. ह्मणून माझी खात्री पटण्यासारखी एखादी खूण असल्यास मला दाखवा; अथवा एखादी गोष्ट माहित असल्यास मला सांगून माझा संशय दूर करा.

दुसरा—(अगदीं हलक्या स्वरानें) सरकार, अजूनही आमच्याविषयीं आपल्याला संशय आहे? ऐका तर जो अवलियाफकीर नुकताच आपणांला या ठिकाणीं येऊन भेटला, त्याचे आह्मी गुप्त हेर असून त्यानंच आह्मांला या ठिकाणीं पाठविलं आहे. इथून निघाल्यावर आपण त्याच फकिराच्या मकाणीं जाल. तिथं गेल्यावर आपणांस एका निर्भयस्थळीं तो पाठवून देईल. तिथं आपण सुखानं विश्रांती घेत रहाल शहाजादी त्या ठिकाणीं येऊन आपणांस भेटेल. मग आपण तिचा भाऊ अकबरशहा, जो आपल्या बापाशीं सामना करण्यासाठीं भीमेच्या कांठीं तळ देऊन बसला आहे, त्यास जाऊन मिळाल. बादशहाची स्वारीही मोठ्या फौजेनिशीं आपल्या पुत्राला धरून नेण्याकरतां निघाली आहे, त्याची व अकबरशहाची गांठ पडली तर भीमेच्या कांठीं मोठा युद्धसंग्राम माजेल. आपणांलाही त्यास साह्य करावं लागेल. तोच शेवटीं आपल्या सर्व सुखाचं कारण होईल. महाराज, हे सर्व यत्न आपल्या शहाजादीचेच गुप्त रीतीनं चालले आहेत; आणि तिनंच अशी ही एकंदर व्यवस्था करून ठेवली आहे. आतां तर कांहीं संशय उरला नाहीं?

संभाजी—जें ऐकायचं होतं तें ऐकलं. आतां कसला संशय ! माझ्याकडून अगदीं उशीर नाहीं. निघा—(आनंदानें)

पद—(वाटे सर्वथा मुक्त.) या चालीवर.

झाले नष्ट मम क्लेश सारे ॥ ध्रु० ॥
प्रिय अंगुठिमुळें, सिद्धदर्शनबळें ॥
अतुल सांप्रत मला धैर्य चढलें ॥
कवण-भय नच अहा आज उरलें ॥ १ ॥

(तिघेजण चोरवाटेनें निघून जातात.)

चवथा अंक समाप्त.



अंक ५ वा.

(संभाजीराजा सिंहासनावर बसला आहे. सरदार व मानकरी लोक दोहोंबाजूंस बसले आहेत, तों पडदा उघडतो.)

(पडद्यांत स्तुतिपाठकाचा शब्द होतो.)

पद—(मुला सांग नृपतीस.) या चालीवर.

भूमिपाला तुझा विजय संतत असो ॥
चंचल श्री वसो नित्य गेहीं ॥ धृ० ॥
दक्ष तूं राहसी दीनजन-रक्षणीं ॥
आप्त तुजवांचुनि कोणि नाहीं ॥
पुत्रवत् पाळिशी तूं प्रजा ही ॥
तृप्त, जन—याचणें नाहिं कांहीं ॥ १ ॥

(वारांगनांचें नाचगाणें सुरू होतें.)

राजा—(ऐकून आनंदानें) प्रधानश्रेष्ठ, आज हे आनंदाचे दिवस येतील, हा नागरिक जनोत्सव मी आपल्या नेत्रांनीं पाहीन, व हा जयघोष ऐकून माझी समाधानवृत्ति होईल, असं स्वप्नांतही वाटलं नव्हतं; परंतु ज्या दुर्दैवानं कांहीं दिवसांमागं माझी एकसारखी पाठ

पुरविली होती, त्यानंच पहा या समयीं काय बहार उडवून दिली ती !

पद—(तस्करा हातीं.) या चालीवर.

बंदिं शिरक्यांच्या ॥ मजला टाकियलें ॥ तेथुनी मुक्त झणीं केलें ॥ वृद्ध फकिराच्या ॥ झोंपडींत नेलें ॥ रोषना रेसी भेटविलें ॥ शहाजाद्याला ॥ साह्या पाठविलें ॥ दिल्लिपतिला स्वाधिन केलें ॥ शेवटीं मातें ॥ राज्यासन दिधलें ॥ सुखाचे दिन हे दाखविले ॥ १ ॥

काय सांगूं ! शहाजादीच्या वचनांत गुंतल्यामुळें माझा नाइलाज झाला. नाहींपेक्षां, आमच्या सकल शत्रूंचा अधिपति जो अवरंगजेब बादशहा, याला यावज्जन्म मी बंदिखान्याचंच सुख दिलं असतं, इतकंच नाहीं, तर त्याच्या सर्वस्वाचा मी मालक झालों असतों, परंतु केवळ शहाजादीच्या विनंतीला मान देऊन—

साकी.

देश उत्तरेकडील केला सर्व नर्मदा नदिच्या ॥
अकबरशाहाच्या सल्लयानें स्वाधिन दिल्लिपतीच्या ॥
बंदमुक्त केलें ॥ राज्यासनिं त्या बैसविलें ॥ १ ॥

(द्वारपाळ येतो.)

द्वारपाळ—(मुजरा करून) सरकार, कांहीं कामाचे

कागद ह्मणून घेऊन बाहेर एक मनुष्य मत्रांपासून उभा आहे; तो सरकारची भेट घेऊं इच्छितो.

कलुशा—कांहीं नको. तूंच ते घेऊन ये इकडे. (द्वारपाळ आणून ते राजापाशीं नेतो.)

राजा—प्रधान, घ्या ते कागद, आणि पहा त्यांत काय आहे तें.

कलुशा—(ते कागद घेऊन फोडून पाहतो.)

जोत्याजी—(एकीकडे) त्या अनाथ प्रजेला राजा-जवळ आपलं दुःखाचं गाऱ्हाणं सांगायला आतां अशाच तऱ्हेचा मार्ग उरला आहे !

कलुशा—(कागद उलटे सुलटे पाहून) हें काय ? ' अनाथ प्रजेचें गाऱ्हाणं. ' यांत कांहीं अर्थ नाहीं. (फेंकून देतो) बरें, हें आणखी एक—(पाहून फेंकून देतो.) कोण हा त्रास ! या लोकांना किती वेळ सांगावं, कीं हांशील हांशील कलमं—तेवढीं मात्र लिहीत जावीं. असलं हें चऱ्हाट आह्माला नको आहे—(द्वारपाळास) अरे, अर्जदारांना जाऊन सांग, कीं अर्जाचें हें शुद्ध चऱ्हाट वळलं आहे; आणि तेही मुद्देसूद नसून पुरावारहित आहेत; सबब रद्द. (चंदी-

चंदावराकडील मोहरबंद केलेलें पत्र राजाच्या स्वाधीन करतो.)

जोत्याजी—(एकीकडे) असलीं महत्वाचीं प्रकरणं वाचतांनाच कबजी साहेब थकून जातात; तेव्हां त्यांचा उलगडा होऊन दाद लागणं तर एकीकडेच राहिलं! काय ही बेबंदशाई!!

राजा—(पत्र फोडून तें वाचून) प्रधान 'चंदी-चंदावराकडील किल्ल्यावर शत्रु चाल करून आले आहेत. कुमकेस कांहीं लोक पाठवा.' असं तेथील अधिकाऱ्यांनीं लिहिलं आहे. आपला कसा काय विचार?

कलुशा—(विचार करून) माझा विचार ह्मणाल तर ह्या लिहिण्याच्या अगदीं उलट आहे. त्यांना साफ या प्रमाणं ल्याहावं, कीं आमच्याकडून कुमकेस एकही मनुष्य मिळणार नाहीं. आह्मांला ते किल्ले नकोत आणि ही रिकामी पंचाइतही नको. हैं! आपले वडील शिवाजीमहाराज, यांनीं त्या रामदास स्वामींच्या नादीं लागून इतकं लांबवर राज्य वाढविलं, त्यांत त्यांचा काय हेतु असेल तो असो! बाकी मला

त्यांत काडीचाही अर्थ दिसत नाहीं! जितका व्याप तितका अधिक संताप मात्र करून घेतला. मी म्हणतों, वारंवार मोंगलांशीं लढाया करून लहानशा जमिनीच्या तुकड्याकरतां हजारों लोकांचे बळी विनाकारण पडावे, त्यापेक्षां त्यांच्याकडेसच तो गेलेला पत्करला. यामुळं होतं काय, कीं उभयपक्षांचेहि हेतु साधतात. एक,. किल्ले अचुक त्यांच्या घशांत जाऊन पडतात; आणि दुसरं, आपल्या पाठीमागची दगदग कमी होते.. शिवाय, सुरेख अंगठीवरील हिरकणीसारखं लहानसं राज्य झाल्यास बंदोबस्तही चांगला ठेवतां येतो.

जोत्याजी—(एकीकडे) काय पण अकलेचे तारे तुटले हे! अहाहा! जें राज्य जोडायला आमच्या थोरल्या महाराजांना जिवापाड श्रम करावे लागले, दुर्धर अशीं संकटं सोसावीं लागलीं, नानाप्रकारच्या युक्ति योजाव्या लागल्या, वेषांतरं करावीं लागलीं, तहान नाहीं, भूक नाहीं, याप्रमाणं रानीमाळ किंहो भटकत फिरावं लागलं आणि हजारों यवनांचे बळी या भूदेवतेला देऊन तिला संतुष्ट करावं लागलं, त्या ह्या त्यांच्या अति सायासानं संपादिलेल्या राज्याची हे दुष्ट कबजी प्रधानश्रेष्ठ, आज अशा रीतीनं विल्हेवाट लावीत आहेत! दुर्दैव त्या भूमिमातेचं

कीं, तिच्यापोटीं असले हे कालरूपी राक्षस निपजले आहेत! नृपचंद्रा, तूं काय करशील! त्या कलुशाराहूनं तुला ग्रासून टाकल्यामुळं तूं तेजोहीन झाला आहेस! तुझ्याकडे कांहीं दोष नाहीं. विनाश काल आला ह्मणजे विपरीत बुद्धि होते; हेंच खरं.

राजा—प्रधान, आपण ह्मणतां तें कांहीं अंशीं खरं आहे. अहो. त्या रामदासस्वामींचं गौडबंगाल तें—त्यांच्या तडाक्यांत आमचे हे भोळे सांब सांपडले! मग काय!!

कलुशा—अहो, त्या बैराग्यानंच तर हा इतका अनर्थ केला! त्याच्या आज्ञेवांचून महाराजांची काडीदेखील हालूं नये, असा प्रकार असे. त्याला सामिल तो थेरडा मोरोपंत पिंगळा. दोघांनीं मिळून राज्यांत मनसोक्त व्यवहार मांडले होते. त्या वेळीं महाराजांनीं तरी नीट पोक्तपणें विचार करायचा—पण तें कांहीं नाहीं. स्वामी सांगतील तें प्रमाण! त्यांनीं सांगितलं, 'शिवबा, आजपासून कुणीं कुणास जोहार करूं नये, रामराम करावा; तुमचा झेंडा भगवा असावा; आमच्याबरोबर आज बगलेला झोळी लावून दहा घरं भिक्षा मागावी;' महाराज काय, त्यांच्याच जादुविद्येनें घेरलेले, आणि त्यांत त्या मुख्य प्रधानजींची सल्ला—झाले लागलींच तयार!

केला रामराम सुरू! लागला निशाणाला भगवा झेंडा फडकायला! झाली तयारी स्वामीं बरोबर दहा घरं भिक्षा मागायची! अशा एक कीं दोंन गोष्टी सांगाव्यात! सारांश काय, कीं आपल्या भोळ्या सांबावर त्या जादुगार बैरागयानं आपला झगडा पूर्ण बसविला होता.

जोत्याजी—(एकीकडे) कर मूर्खा—त्या साधु पुरुषाची वाटेल तितकी हेलना कर; त्याला ढोंगी, जादुगार वाटेल तीं विशेषणं दे; परंतु शिवाजीमहाराजांचा उदय व्हायला ज्या गोसाव्याचीच सल्लामसलत त्यांच्या उपयोगीं पडली, महाराजांसारख्या थोरपुरुषांचा उद्धार करण्याकरतांच ज्यानं अवतार घेतला, ज्यानं लोककल्याणासाठींच आपला देह झिजविला, साधुवर्गांत जो शिरोमणी वसिष्ठ गुरुसारखा जो सर्वत्रांस पूज्य, त्या वैराग्यसंपन्न समर्थांच्या विमल कीर्तिला तुजसारख्या बदमाष मनुष्याच्या अवहेलनेनं लेशही बाध येणं नाहीं. अरे, तुला पशूला हिऱ्याची ओळख काय होय! तूं गारगोटीचीच परिक्षा करावीस.

(राजा कलुशास खूण करतो. वारांगनांचें नाचगाणें पुन्हां सुरू होतें. कांहीं वेळानें एक वृद्ध फकीर प्रवेश करतो.)

फकीर—(आश्चर्यानें चोहोंकडे पाहून) ओहो! कैसा अंधेर! कैसा जुलुम! क्या बादशाहत्का गरूर! राजा, मैं कौन हूं? मुजकुं पयछाना? बेवकुब् तुं जानता होगा, के मैं, महाराज अधिराज हुं; मगर ये सेखी अपने दिल्सें दूर कर. तेरे मुफ्थहोंसें दोस्तोंकी चापलोसीनें बादशाहत्को ऐसे कमूजार कर दिया है, के उस्के तबा होनेको देर नहीं लगेगी. तुम् तुमारी असूली हालूत बिल्कुल भूल गये हो तुम् थे कहां? तुमारा हाल क्या था? वो सब भूल दिया? जब् तुम् सिरकेके केदमें थे, व्हांसे तुम्को किस्नें बचाया? तेरे दुष्मनोंके साथ लढाई करनेकु कौन तयार हुवा था? शाजादी और उस्के भाई आखबरशाहकी सब् मेहेरबानीओंके फ्रामोज कर दिया! शाजादीकेसाथ तुम्नें ये इकूरार किया था, के अवरंगजेबके केदमेसें छुटकर तक्तपर बैठतेही तुज्कों रायगडमें लेजाउंगा; याद्व है? अबूं होषमें आव. अवरंगजेब बादशाहा बेशुमार फौज लेकर तुम्पर चढाई करके आता है इस्वास्ते अब् तुं अखबरशाहाको जाकर मिल, और उस्की मदत् लेकर अवरंगजेबका मुकाबला कर, और शाजादीका इकूरार पुरा कर. नहीं

तो खुदावंत करीम इसी बादशाहाके दस्तसें तुझे सजा करेगा. (रागानें पाय आपटीत निघून जातो.)

द्वारपाळ—कचेरी बरखास्त. (पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—संभाजीराजाचा महाल.

राजा—(चिंतातुर मुद्रेनें) कोण बरं असावा तो? (विचार करून) मी शिरक्यांच्या कैदेंत असतांना जो अवलिया–फकीर अंगठी टाकून मुकाट्यानं निघून गेला तो तर हा नसेल? कारण, इतरांच्यानं अशा रीतीनं मला दरडावून बोलण्याचं सामर्थ्य सहसा होणं नाहीं. तर मग निःसंशय हाच तो वृद्ध अवलियाफकीर; आणि हेंही मला आतां पक्कं स्मरूं लागलं आहे, कीं शहाजादीच्या सांगण्यावरून किल्ल्यांतील कैदखान्यांतून दोघां वेषांतर केलेल्या इसमांकडून माझी सुटका करविली, ती यानंच! पण त्या माझ्या हितचिंतकाचं माझ्याकडून कांहींच आगतस्वागत झालं नाहीं! मला तो उपदेशाच्या दोन गोष्टी सांगत असतां मी चकार शब्दही त्याच्याशीं बोललों नाहीं! आणि शेवटीं रागानं तो चडफडत निघून गेला, तरी दे-

खील मनांत कांहींएक विचार आला नाहीं! ही माझ्या-कडून केवढी मोठी चूक झाली!! असो, आतां तत्संबंधीं विचार करून काय फळ? कारण पश्चात्ताप—तो मागून व्हायचा! (विचार करून)

पद—(सार्थचि तें वदती.) या चालीवर.

वाग्विष जाळित या ॥ हृदया ॥ वमला जें तो सिद्ध अवलिया ॥ ध्रु ॥ या शरिराची लाहि करोनी ॥ त्यानें टाकियली कीं येक्षणिं ॥ सर्वांगीं तें विस्तृत होउनि ॥ दग्ध करिल ही वाटे काया ॥ १ ॥

बरं, इतकंही होऊन त्या सिद्धपुरुषाच्या कोपापासून उत्पन्न झालेला, या शरिराचा बाहेरून दाह करणारा अग्नि किंचित् कमी होतो न होतो तों, त्याजवर तेलाच्या धारा ओतण्यास ही पत्रिका तयारच आहे! (ह्मातांतील पत्र फेंकून देतो.) हींत अकबरशहा मला 'मी इराणांत निघून गेलों. यापुढं तुमचा आमचा कांहींएक संबंध नाहीं.' हें शेवटचं लिहिणं लिहितो! एकूण हीं सर्व माझे दुर्दिन जवळ आल्याचीं चिन्हं मला होत आहेत! हें जर खरं नाहीं ह्मणावं, तर असं हें मग कशाला घडून येतं!!

पद—कालंगडा—धुमाळी.

कारागृहवासांतुनि ज्यानें माझि मुक्तता केली ॥
युक्ति योजुनी मजला अंतीं रोषनार भेटविली ॥ ध्रु०॥
दिल्लिपतीची स्वारी मजशीं युद्ध कराया आली ॥
नच डगमगतां साह्य जयानें केलें मज त्याकालीं ॥
तो अकबर मम परम जिवाचा मित्र मला येवेळीं ॥
सोडुनि गेला काय करूं मी धृति माझी ती खचली॥१॥

(विचार करीत उभा राहतो. एसाजी येतो,)

एसाजी—(आपल्याशीं)

पद—(तोम् तननननवाजवि वेणू.) या चालीवर.

आति चिंताव्याकुल भूप दिसे ॥ निश्वासं कासया सोडितसे ॥ यासमर्थी भासे ॥ जाई दिनमणि—तेज लोपुनी क्षणिं येतां रजनी, त्यासरसें ॥ जैसें ॥ १ ॥

अहो, हा राजा कोणत्या तरी महत्संकटांत पडला आहे, ही कल्पना याच्या या चिंतातुर मुद्रेवरून सहज बांधतां येते. अथवा, याला विचारून आपला सर्व संशय फेडून टाकावा. पण नको. अशानं याचं दुःख उलटं दुणावल्यासारखं होणार आहे; आणि आपल्या बेताला अनुकूल असं उत्तर याच्याकडून मिळण्याचीही आशा नको मग. तर आपण आतां असंच

केलं पाहिजे. आमचा त्रिवर्गांचा झालेला बेत याला कळवितों, आणि वरचेवर याच्या ओंठांला साखर चोळून तिची गोडी एकदां याला लावूंन देतों; ह्मणजे आपोआप जिभेनं हा ती चाटायला लागेल, कीं आपलं काम झालंच फत्ते. (राजाजवळ जाऊन मुजरा करून) महाराजांचा सदा विजय असो. सरकार—

राजा—कोण? प्रियमित्र एसाजी? ये. तुझ्या येण्यानं तरी माझ्या मनाला कांहीं आनंद झाला तर होवो!

एसाजी—एक आनंदाचीच बातमी कळविण्याकरितां आलों आहें.

राजा—(उत्सुकतेनें) कोणती बरं ती?

एसाजी—गरीब तुळशीची सरकारांस विनंति आहे—

राजा—सांग. तिचं काय ह्मणणं आहे?

एसाजी—ऐकावं सरकार.

पद—(तकदीर हमारि.) या चालीवर.

" महाराज आज आपुलि ही दीन किंकरी ॥
हा हेतु अंतरीं धरूनि प्रार्थना करी ॥ धृ० ॥

अवरंगझेब बादशहासीं लढूनियां ॥
आति श्रांत जाहलां अहांत आपण प्रिया ॥
विश्रांति कशि न स्वप्निं आपणां ह्मणूनियां ॥
हे दोन दिवस जाऊं चला संगमेश्वरीं ॥ १ ॥"

राजा—एसाजी, माझ्याही मनांतून फार दिवसांपासून होतंच, कीं एखाद्या आराम स्थळीं जाऊन दोन दिवस विश्रांति घ्यावी—

एसाजी—(मध्येंच) तर मग महाराजांनीं मनांत आणलेला बेत कायम करून उद्यांचेउद्यां इथून निघण्याच्या तयारीला लागावं. सरकारच्या जिवाला सुख, तर सर्व गोष्टींचा आनंद आहे. ह्मणत्यातच, ' शीर सलामत तर पगड्या पंचवीस. ' तशांत

पद—(जो मम नयनचकोरा इंदु.) या चालीवर.

ऋतु वसंतानें यावेळीं ॥ असेल तेथें मजा उडविली ॥
फल, पुष्पांनीं तरुवर, वेली ॥ असतिल शोभविल्या ॥१॥
वनप्रियांच्या मंजुल गानीं ॥ असेल गेलें नगर भरोनी ॥
डुलत शुक, तो ध्वनि ऐकोनी ॥ असतिल राहियले ॥२॥
हवा तेथची फारच नामी ॥ तैसें जल तें काय कथूं मी॥
शुद्ध अमृतासमान स्वामी ॥ गोड अती आहे ॥ ३ ॥

अशा सर्व गोष्टींनीं पूरित असलेल्या रम्यस्थळीं कांहीं दिवस राहिल्यानं आपल्या मनाला किती सौख्य, किती

विश्रांति, केवढा आनंद वाटणार आहे! शिवाय, त्या ठिकाणीं आपले दोन तीन हवाशीर वाडे आहेतच. तेव्हां बरोबरच्या मंडळीस रहाण्यासकरण्याची मुळींच पंचाईत पडणार नाहीं. वाटेल त्या रीतीनं दोन दिवस चैनीनं घालवितां येतील. मात्र बरोबर लवाजमा घ्यायचा तो फारसा न घेतां शेलकीं वीस पंचवीस मनुष्यं घ्यावीं. कारण, जितकीं मनुष्यं अधिक, तितका आपल्याला त्रास अधिक होणार आहे. माझा आग्रह आहे, कीं महाराजांनीं चलावंच तिथं. (एकीकडे) कीं पहिले दिवशीं तुझा फडशा उडवून टाकूं.

राजा—तर माझा उद्यांच निघण्याचा बेत कायम. तुह्मी आपल्या तयारीला लागा.

एसाजी—(एकीकडे) अरे मूर्खा, तुझी तयारी करण्याकरतां आह्मी केव्हांचेच तयार होऊन बसलों आहोंत. मी सर्व तयारी केल्यावांचून उगाच नाहीं तुझ्या इथं आलों! तूं मात्र पसरून ठेवलेल्या जाळ्याकडे जायची आतां लवकर तयारी कर. (राजास) हा मी निघालोंच सरकार. (निघून जातो.)

राजा—(हळू हळू चालत)

साकी.

रम्य पुरी संगमेश्वरीं त्या हेतु जावयाचा तो ॥
एसाजीनें येउनि कथिला योग्य मलाही गमतो ॥
सखिला सांगाया ॥ जावें वाटतसे मनिं या ॥ धृ० ॥

(निघून जातो.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—येसूबाईचा महाल.

(येसूबाई चिंतातुर होऊन बसली आहे, शेजारीं दासी मुलांला खेळवीत आहे, अशीं दिसतात.)

दासी—(मुलाकडे पाहून) डोळे मिटले हँ—आतां हा खाऊ कोणाला हवा ? तुह्मांला हवा ना ?, तर मग या पाहूं इकडे. माझे छबकडे महाराजग बाई ! या —या—या. (मुलगा धांवत येतो. ती त्यास कडेवर घेऊन त्याचे मुके घेते व येसूबाईस) बाईसाहेब, आजच कां बरं आपण अशा चिंताक्रांत बसलां अहांत ?

येसूबाई—हें काय बाई तुझं विचारणं ? अग, हें माझं नेहमींचंच व्रत आहे ! सांग, कधीं मला तूं आनंदांत असतांना पाहिलं होतंस, ती तूं आज मला 'आजच कां बरं आपण अशा चिंताक्रांत बसलां आहांत'

ह्मणून विचारते आहेस? तुला मी याचं काय बरं उत्तर देऊं?

दासी—बाईसाहेब, आपण ह्मणतां तें सारं खरं. पण असं नेहमींच आपलं दुःख करून काय व्हायचं आहे? आणखी तर कांहीं नाहीं, पण मुठी सारखे डोळे मात्र सुजवून घ्यायचे! (मुलगा रडतोसें पाहून) अगबाई! इतक्यांत यांना रडायला काय झालं! यांनीं आपल्या आईचा शब्द ओळखला वाटतं! घ्या या आमच्या छोटे सरकारना घटकाभर. (त्यास देण्याचा आविर्भाव करून) काय बाई मौज तरी! असं ह्मटल्या बरोबर पहा कसे गप्प राहिले! लहान मुलाचा तरी आपल्या आईकडे किती ओढा असतो हा! घ्या यांना. (त्यास खालीं ठेवूं लागते इतक्यांत संभाजी येतो.)

राजा—(एकदम पुढें होऊन) नको, नको—दासी, इकडेच दे त्याला. कारण,

दिंडी.

आधिं दुःखानलिं तनू पोळलेली ॥
असे त्यांतचि ही शक्तिहीन झाली ॥
कोमलांगीं या तुझ्या स्वामिणीस ॥
असें करितां होतील फार क्लेश ॥ १ ॥

(दासी मुलाला खालीं ठेवते. तो त्यास उचलून घेतो.)

दासी—ते बालविण्यास महाराज समर्थ आहेत.

(निघून जाते. येसूबाई उठूं लागते.)

राजा—(तिच्याजवळ जाऊन) छे, छे, हें काय भलतंच !

पद—(ब्राह्मण कन्या.) या चालीवर.

आदर माझा करावया तूं नको उठूं सुंदरी ॥
बसली तेथ रहा क्षणभरी ॥ धृ० ॥
त्राण देहिं तव नाहीं कांहीं होशिल तूं घाबरी ॥
बसली तेथ रहा क्षणभरी ॥
तव सेवक हा तयार आहे तुज उठवीतों तरी ॥
धरुनी दोन्हि आपुल्या करीं ॥ १ ॥

(मुलाला खालीं ठेवून तिचा हात धरूं लागतो.)

येसूबाई—(दूर सरून) पुरे ह्मटलं हें साखरपाणी ! साध्याभोळ्या माणसाजवळ साधं भोळं बोलणं ह्मणजे त्याला तें समजतं. हीं असलीं शृंगारिक बोलणीं ज्यांना समजत असतील, त्यांच्याजवळ तशीं तीं बोलण्याचा उपयोग. माझ्यासारख्या भोळ्या बायकोनं यांत काय बरं समजावं ?

राजा—हें प्रेमाच्या कळवळ्याचं भाषण तर खरंच;

पण त्यांत थोडी रागाची झांक मारते ! ह्मणून ह्मणतों, कांहीं अपराध घडला असल्यास सांगावा. आह्मी क्षमा मागायला तयार आहोंत.

येसूबाई—(आश्चर्यानें) कायबाई मौज तरी ! मी का आपल्याला क्षमा करणार ? उलट माझ्याकडून एखादी चूक झाली असेल तर मलाच पदर पसरणं भाग आहे.

राजा—आज हें काय मनांत आणलं आहेस तूं ? एखादी नसती कुरापत काढून माझ्याशीं भांडण करण्याचा का तुझा विचार आहे ?

येसूबाई—झालं ! निष्कपट भावानं मी खरं खरं तें बोलल्यें, त्याचा हा इतका राग आला ! पण दुसरे कुठं खरोखरीचा अपमान झाला, तरी तो मुकाट्यानं सहन करायचा होत असतो. वर त्याचं आणखी उलट कौतुकच चाललेलं असतं- बरोबरच आहे. मला आणली आहे धरून नि त्या मेल्या सवतीनं घातली आहे भुरळ— जिनं माझ्या जन्माची माती करून टाकायचा विचार केला आहे, त्या अवदसेचा सत्यानास होवो.

राजा—बरं, एक झालं आणखी कुणाचा सत्यानास करायची इच्छा आहे ? आपली तोंडची हौस तरी पुरी होऊं द्या !

येसूबाई--त्या राक्षसांच्या एकेक कृतीची आठवण [झा]ली, कीं काळीज कसं चर्र होतं! असं वाटतं, ह्या [दे]ळेस कुठं तरी जाऊन प्राणत्याग करावा; अथवा, विष [ख]ाऊन डोळे मिटावे! पण ह्या माझ्या तान्हुल्याकडे [प]ाहिलं, कीं सगळे विचार जागच्या जागीं रहातात! [प्र]ाणनाथ! नकाहो त्या तुळशीच्या मोहनीजाळांत गुंतूं! [त]ी मोठी कपटी, खुनशी स्वभावाची बायको आहे! तिचं तें कापट्य, तें कृत्रीम सौंदर्य, ती साखरेची सुरी, [ते]ं लाघवी प्रेम, एखादे दिवशीं जिवाला अपाय करणार [आ]हे! तिचा भाऊ एसाजी, तोही त्याच तऱ्हेचं प्रेम [द]ाखवीत असतो. त्यांच्यावर आपण विश्वास ठेवूं नका. [त्]या बहीणभावंडांपासून दूर रहा. कारण, त्यांचा बाप [म]हिरोजी फर्जंद याला कुस्तींत मारल्या दिवसापासून त्या [द]ोघांचा स्वारीवरती डाव आहे! एकीकडे नेऊन आपला [घ]ात करण्याविषयींचे त्यांचे दुष्ट बेत चालले आहेत! [म्ह]णून म्हणतें, सावध व्हा, सावध व्हा! महाराज, आपण [अ]से गाफील राहूं नका. जगदंबे, आई कुलस्वामिणी! [तू]च आतां माझ्या सौभाग्याची पाठिराखी होऊन त्यांचं [रक्ष]ण कर! तुझ्यावांचून दुसरं कोण आहे!! (रडूं [ला]गते.)

राजा——(हंसून) काय हिंची ही चमत्कारिक समजूत ! हें त्या जोत्यानं तुझ्या मनांत भरवून दिलं असेल ! त्या मूर्खाला नाहीं अक्कल आणि तुलाही काय ह्मणावं आतां ! हें पहा, एखाद्याला नसता दोष लावणं चांगलं नाहीं. आणि त्यांत तुझ्यासारख्या विचारशील बायकोला तर हें मुळींच शोभत नाहीं. ह्या त्या पाजी जोत्याच्या निव्वळ गप्पा आहेत.

येसूबाई——कां त्या बिचाऱ्याला उगीच बोल लावावा ? यांत त्याचा काडीचाही दोष नाहीं. डोळे मिटले तरी हिशेब कांहीं नाहींसा होत नाहीं. हे माझ्या दैवाचे खेळ मी जाणून आहें ! प्राणनाथ, मामंजींच्या शुद्ध आचरणानं चार लोकांत उभारलेला त्यांच्या सत्कीर्तीचा झेंडा अशा वर्तनानं पडेल बरं——समूळ नाहींसा होईल——नांव नाहीं रहाणार त्याचं ! ह्मणून ह्मणतें, ती त्यांची कृति ध्यानांत आणावी. तें सद्गुरुप्रेम, ती प्रजाकार्यदक्षता, गाईब्राह्मणांचं संरक्षण, यवनांची रणयज्ञांत आहुति आणि एकपत्नीव्रत लक्षांत वागवून, आज कोण रोषनारसाहेब आल्या, ठेवा आणून इथं; उद्यां कोण्या कुणी अप्सराबाई येणार, लागा त्या तजविजीला; परवां कोण मिळणार, करा त्या ब्रह्मराक्षसाबरोबर खलब

असले हे चाळे करायचे बंद ठेवून, माझं ऐकायचं होईल तर त्या सर्वांपासून अगदीं दूर रहावं, आपलं कुलशील लक्षांत आणावं, धर्माची आस्था धरून नीतीनं राज्य चालवावं, आणि अशाच तऱ्हेचे जर कीर्तीचे धिंडवडे नाचवायचे असतील तर मग खुशाल राज्य हातीं येतांच जशी मामंजींच्या वेळच्या माणसांची राखरांगोळी करून टाकली, कोणांचे कडेलोट केले, कुणांला हत्तीच्यापायीं चिरडीवले, कुणांला चुन्याच्या भट्टींत जिवंत जाळून टाकलें, कुणांचीं डोकीं उडीवलीं, कुणांला भिंतींत चिणून मारलं तशी माझीही कांहीं तरी व्यवस्था लावून टाकावी, ह्मणजे मागची ही एक पिडा नाहींशी होईल. तसंच, तो जोत्याजी, तेंच काय तें एक तेवढं मामंजींच्या वेळचं नाक उरलं आहे, त्यालाही तीच गति द्यावी, ह्मणजे सारं आटपलं! मग त्या आवडत्या एसाजीला, त्या अप्सराबाईंना नि कुठला तो कनोजा ब्रह्मराक्षस जवळ आणून ठेविला आहे त्याला, पोटाशीं धरून खुशाल मौजा मारीत सुखानं राज्य करावं. मागं कांटा ह्मणून कांहीं राहणार नाहीं.

राजा—हें पहा, त्याबद्दल वाटेल तें तूं मला बोल. मागाच्या सपाट्यांत होऊन चुकलं, त्याचं आतां काय? बरोबर ह्मणशील तर माझ्या मनांत असं कांहीं नव्हतं.

परंतु झाली गोष्ट—तिला आतां उपाय नाहीं. (कांहीं वेळ थांबून) हो, पण नाहीं ह्मणायला एक आहे.

येसूबाई—मला आहे का सांगण्यासारखा ?

राजा—हो, हो. व: ती कामगिरी तर मी आपल्याकडेसच सोंपविणार !

येसूबाई—अशी काय ती उपायाची कामगिरी ?

राजा—(पलंगावर बसून) क्षणभर अशीं पलंगावर बसूं ह्मणजे बसल्या बसल्या सांगायला ठीक पडेल.

येसूबाई—जशी मर्जी. ही मी बसलें. (बसते.) सांगावं आतां काय तें ?

राजा—कशामुळं हें माझंच मला कळत नाहीं; बाकी खरं ह्मणशील तर अलिकडे चित्त अगदीं बावरल्या सारखं झालं आहे. कांहीं करायला घ्या, त्यावर बिलकूल मन लागत नाहीं. ह्मणून जिवाला कांहीं करमणुक वाटेल अशा स्थळीं जाऊन दोन दिवस राहण्याचा बेत केला आहे.

येसूबाई—आणि मागं राज्याचा बंदोबस्त ?

राजा—तुझ्यासारख्या चतुर माणसाकडे. असं कर; आमचं हें नवीन कारभारीमंडळ तुला जर अयोग्य वाटत असेल, तर तें काढून त्याच्या जागीं राजकार्यदक्ष असे कारभारी ठेव; स्वत: राज्यकारभार पहा; शिक्का मोर्तब

ारे तूंच करीत जा; आणखी बंदोबस्त तो कसला? तूं या' असं ह्मटल्याखेरीज शपथेला आह्मी या राज्याचं र्शनं घ्यायलाही इकडे येत नाहीं आतां तरी झालं कीं ाहीं.

येसूबाई—बायकांच्या हातून असे राज्याचे बंदोबस्त ोते तर पुरुष कशाला पाहिजे होते मग? बायकांनीं राज्यं ालविलेलीं माझ्या नाहीं कुठं ऐकण्यांत!

राजा—तुझ्या ऐकण्यांत नसेल कदाचित्. बाकी स्त्रि-यांनीं राज्यं चालविल्याबद्दलचे इतिहास पुष्कळ आहेत.

येसूबाई—बरं अशी ही व्यवस्था लावून आपण कुठं जायचं ह्मणतां?

राजा—

पद—मांड—दादरा.

हे दोन दिवस जातों आह्मि संगमेश्वरीं ॥ ध्रु० ॥
या दक्षिणप्रांतिं नसे स्थल तयापरी ॥
मृगयेतें योग्य तेंच खचित सुंदरी ॥ १ ॥

मात्र इतकंच सांगणं आहे, कीं मुलाला नीट जपा ह्मणजे झालं.

येसूबाई—त्या संगमेश्वरींच जाण्यावांचून इतकं काय

अडलं आहे ? शिकार खेळायला इतर ठिकाणं नाहींत का ? साफ सांगतें, तिथं कांहीं जायचं नाहीं.

राजा—आह्मीही आपल्याला निक्षून सांगतों, कीं तिथं गेल्याशिवाय आह्मांला रहायचं नाहीं.

येसूबाई—तर मग खुशाल जावं. इथं कुणाचीही आडकाठी नाहीं. इकडे मौजा मारायला होत असेल कुणाचा प्रतिबंध; ह्मणून त्या तुळशीला, त्या एशाला आणि त्या राक्षसाला तिथं घेऊन जाणं होत आहे. हा सगळा बेत, शिकारीचं उगीच तें निमित्त कशाला पाहिजे ?

राजा—हें पहा, ज्या त्या कामांत नेहमीं तूं अशाच रीतीनं माझा हिरमोड करीत असतेस; असा अनुभव असतांही हरएक गोष्ट तुला मी कळवितों, हा केवळ माझाच अविचार आहे. तर आतां तुझ्या संमतीची मला मुळींच जरूर नाहीं. माझा मी मुखत्यार आहें. एक वेळ ठरलेला बेत कालत्रयीं फिरायचा नाहीं, हा मी निघालों पहा. (पलंगा वरून उठूं लागतो.)

येसूबाई—(त्याच्या आड येऊन) आपला बेत कालत्रयीं न फिरो. जावं आपण. मी रहावून घेईन, एवढं माझं भाग्य आहे कुठं! पण प्रिया, माझी एक प्रार्थना आपण ऐकावीच. (त्याच्या गळ्यांत हात टाकून)

पद—(अरसिक किति हा शेला.) या चालीवर.

ही या पद्माची दासी ॥ त्या देशीं आपुल्या न्या सेवेसीं ॥ ध्रु० ॥ राहुं तुझांविण कैसी ॥ दिनरजनी होइल दुःसह मजसीं ॥ या वस्त्राभरणांसीं ॥ मी लेवुनि सखया दावुं कुणासीं ॥ ह्मणुनि विनंती ऐसी ॥ त्या देशीं आपुल्या न्या सेवेसीं ॥ १ ॥

राजा—लाडके, हें काय बरं ? तूं असा हा भलताच हट्ट धरून माझ्या जाण्याला विनाकारण अडथळा करूं नकोस. आह्मी बरोबर काय तीं शेलकीं वीस पंचवीस मनुष्यं घेणार आहोंत. दुसरं कोणी नाहीं. तिथं तुला बरोबर घेऊन जाणं ह्मणजे अगदीं अप्रशस्त होणार आहे. शिकारीचं ठिकाण तें. त्या ठिकाणीं येऊन काय करणार तूं?

येसूबाई—जायचंना आपल्याला ? जावं ! (वर पाहून) कुलस्वामिणी ! त्या दुष्टांच्या बाजारांतून माझ्या महाराजांना सुखरूप परत आण ! त्यांना सर्वकाळ सावध असूं दे ! आणि त्या बरोबर जाणाऱ्या यमदूतांच्या दुष्ट अंतःकरणावर सुविचाराची शिळा ठेव ! हेंच तुझ्यापाशीं हात जोडून माझं त्रिवार मागणं आहे ! ! (इतक्यांत कोंबडा आरवलेला ऐकूं येतो.)

राजा—(ऐकून) काय ? पहाटचा समय झाला ? (पलंगावरून उतरून पाहून) होय.

पद—बिभास—दादरा.

शशिवदने पहा पहा ॥ अस्ताचलिं शशधर हा ॥
जातो तत्तेज महा ॥ नष्ट होत तें ॥ १ ॥
निशा लुप्त जाहलि हे ॥ शीत समीरण वाहे ॥
पक्षीगण करिताहे ॥ नाद ऐक तो ॥ २ ॥

(निघून जातात.)

पांचवा अंक समाप्त.

अंक ६ वा.

स्थळ—संगमेश्वर, एक वाडा.

(जोत्याजी येतो.)

जोत्याजी—संगमेश्वरीं आल्यादिवसापासून मी पहातों त्या बहीणभांवंडांच्या वृत्तींत बरीच चलबिचलझाल्यासारखी दिसत आहे! महाराजांपाशीं त्यांचं बसणं उठणंही आतां फार क्वचित प्रसंगीं आढळून येतं. आणि कालच्या दिवशीं तर एक चमत्कारिक गोष्ट माझ्या कानीं आली आहे; कीं त्या तकरीबखानाच्या व तुळशीच्या वारंवार भेटी होऊन महाराजांच्या घाताविषयींच्या त्यांच्या गुप्त मसलती सुरू

आंहेत! इकडे आमच्या राजेसाहेबांकडे पाहिलं, तर ते आपले खुशाल त्या कलुशासह ऐषआरामांत पडून राहिले आंहेत. तेव्हां आतां करावं कसं? ही गोष्ट त्यांच्या कानांवर घालावी ह्मणतों, तर आपण सांगितलेलं त्यांना बिल्कुल खरं वाटत नाहीं. बरं न सांगतांही आतां परिणाम नाहीं. कारण, माझ्यासारख्या निमकहलाल चाकराचं पहिलं काम हें, कीं आपल्या धन्याला वेळेवर सावध करावं—तें तर यावेळीं मला बजावलंच पाहिजे. असो. मर्जी पाहून आज नाहीं, केव्हांतरी—पण ही गोष्ट त्यांच्या कानीं घालांवी; मग त्यांस सावध राहण्याची बुद्धि देऊन आमची लज्जा रक्षण करणार भवानी समर्थ आहे! (निघून जातो)

प्रवेश २ रा.

स्थळ—संगमेश्वर येथील एकांत जागा.

(चिंतातुर मुद्रा झाली आहे अशी तुळशी येते.)

तुळशी—

पद—(मन माझें भडकुनि.) या चालीवर.

मज कांहीं सुचतहि नाहीं आतां करूं यत्न मी कैसी ॥
मत्कार्याच्या या सिद्धिस योजूं कवण्या युक्तीसी ॥धृ०॥
मंत्रानें कवण्या मोडुनि टाकूं मी त्या भूपासीं ॥
बिनतोड कल्पना सुचलि पाहिजे यासमयीं मजसीं ॥१॥

(विचार करते व आनंदानें टाळी वाजवून) वाहवा! किती नामी युक्ति यावेळीं सुचली तरी ही!

(चाल--सदर)

राजाच्याजवळीं राहूं द्यावें नच त्या जोत्यासीं ॥
युक्तीनें त्याला दूर नेउनी साधिन कार्यासीं ॥ २ ॥

नाहीं तर एखादा अमली पदार्थ त्याच्या जेवणांत टाकून त्याला बेशुद्ध करून टाकावा! हो, ही सोपी युक्ति आहे! ठरली तर ही. पण दादा अजून कां आला नाहीं? त्याला यावेळीं मीं बोलावलं होतं तसंच त्या खानालाही सांगून ठेवलं होतं त्याचाही अजून ठिकाण नाहीं, हें काय? (इकडे तिकडे पाहून) अरे व: !

दिंडी.

खरा माझा जो लोकिं साह्यकारी ॥
मला होतां ज्या दुःख होत भारी ॥
फार उत्सुक आमुच्या वैरि-घाता ॥
येथ माझा तो येत असे भ्राता ॥ १ ॥

(एसाजी येतो.)

एसाजी—ताई, मग तुझा कसा काय बेत ठरला सांग?

तुळशी—आणखी कसलेरे बेत करायचे? कालच्या

दिवशीं झालेला बेत कायम. पण तकरीबखान यावेळीं येता तर बरं होतं.

एसाजी—खानाची स्वारी बहुधा इतक्यांत येई-लशी वाटते. (पाहून) ही स्वारी आलीच पहा. (तकरीबखान येतो.)

तकरीब०—बाईसाहेब, आपके हुकम्के माफक् हम् आयगे. अब् बोलो क्या फर्मातेहो.

तुळशी—हुकुम कसला हो त्यांत? आपले साथी-दार तयार असले ह्मणजे झालं! आपली सर्व तयारी आहेना ?

तकरीब—हम् सब् तयार है.

तुळशी—झालं तर मग! काल ठरलेल्या बेताप्रमाणं व्यवस्था लावायची! दादानं, आणि आपल्या साथी-दारांसह आपण, तीनसांजा वाड्याच्या एका खोलींत लपून रहायचं; सर्वांची सामसूम होऊन राजालाही गाढ निद्रा लागली, असं पाहून हळूच उठून दिवाण-खान्याचं दार उघडून तुह्मांला आंत घ्यायचं;. नंतर एकानं पुढं होऊन राजाच्या उरांत जांबिया भोंसकून आपलं काम तडीस न्यायचं; दुसरं काय? हं ह्मणतां निकाल!

जंबिया भोंसकण्याचं काम मात्र दादासाहेबांनीं पत्करलं पाहिजे—

एसाजी—पण ही मसलत बिन बोभाट उडाली पाहिजे.. नाहीं तर या गोष्टीचा कांहीं गलबला बिलबला झाला, तर आयतेच वाघाच्या पिंजऱ्यांत सांपडूं!

तुळशी—हा वेड्या! अरे सर्व झोंपी गेल्यावर हें काम उरकून घ्यायचं!

तकरीब—ये तो सब् ठीक है. लेकिन् वो जोत्याजीका क्या इलाज? उस्का बंदोबस्त आव्वलहीसे करना चाहिये. वो बडा हिमती अदमी है. और हम सबसे जादा चालाख! देखो, जिस् बखत् पन्हाळगडपर शाजादी और संभाजी दोनो थे; किल्ला चारों तरफसें घेरा हुवा थां; और उस् बखत् उन् दोनोंकेसिवाय भीतर कुई तिसरा नहीं था; और संभाजी हमारे कबजेमें आया हुवा था; लेकिन् उस् बखत् वो बदमाष नोकरनें किसी तऱ्हा अंदर चला गया, और अपने राजाको निकालके लेगया; उस्का मुजकु पत्ताही नही लगा. इस्वास्ते हम् कुच् करनेकु जाये, और उधर कुच् होजाय! उस् बखत् जोत्याजी उधर बिलकुल नहीं होना चाहिये. अब उस्कु

स् वखत् व्हांसे दूर रखनेकी कोईनाकोई तदबीर जरूर निकालना चाहिये.

एसाजी—हो, खरंच ताई. तसं केल्यावांचून आलं काम साधायचं नाहीं. त्यांत पुन्हां तो दिवाणखान्याच्या समोर जी खोली आहे, तींत निजत असतो. तो एकाएकीं जागा झाला आणि आमच्यापुढं येऊन उभा राहिला, ह्मणजे मग—

पद—(लावणीच्या चालीवर.)

युक्ती योजावी त्यासमयीं सांग मला कोणती ॥
सांपडतां गे तैशा रात्रीं त्या जोत्या-हातीं ॥ धृ० ॥
संभाजीला जागृत करुनी, तो आणिक भूपती ॥
खानासह या मद्देहाची करितिल कीं माती ॥ १ ॥

तुळशी—हात्तीच्या! या तुझ्या शंकेचं समाधान करणारी युक्ति मीं मघांच योजून ठेवली आहे!

पद—(नंदगृहाच्याजवळ.) या चालीवर.

पदार्थ अमली घालवितें मी जेवणांत आजी ॥ नृपांच्या ॥ धृ० ॥ पडेल पडल्याजागिं अचेतन ॥ वदेल वाचे शब्दहि एक न ॥ भय कसलें मग तुह्मि इंतुकेजण ॥ करिं सुरी मारा ॥ नृपाच्या ॥ १ ॥

तकरीब०—वः! बहोत अच्छा!

एसाजी—पण ताई, नेहमीं त्याच्याजवळ असणारीं हत्यारं कांहीं युक्तीनं काढून घेशील, तर हा बेत फारच नामी जुळेल!

तुळशी—आतां मात्र तुझ्या अकलेची कमाल झाली! कसल्यारे तुझ्या या चमत्कारिक शंका? अरे, एकवेळ तो अमलाच्या गुंगींत पडून राहिला, कीं शेंकडों हत्यारं जरी त्याच्यापाशीं असलीं, तरी त्यांचा त्याला कांहींएक उपयोग होणं नाहीं. हें बघ, भावीसुखाची इच्छा असेल तर तसं ह्मणून सिंहासारखा छातीवर बसायला तयार हो; आणि तें नको असेल, तर तसं ह्मणून भागूबाई सारख्या हातांत बांगड्या भरून तुला वाटेल तिथं निघून जा—

एसाजी—ताई, ही आह्मीं कंमर बांधली. सूर्यास्त झाल्याबरोबर तुझ्या नेमलेल्या ठिकाणीं आह्मी ठेवलेलेच समज. राजाच्या उरांत जंबीया भोंसकण्याचें काम हा एसाजी करणार—तुझी तयारी मात्र असूं दे.

तुळशी—माझ्याकडून तयारी—तुह्मी मात्र संभाळा.

तकरीब०—(उठून) खुदा करे तुमारी मुराद पूरी हो जाय. (दोघे जातात.)

तुळशी—(आनंदानें) एकून हें नाटक आज इतक्या रंगाला आणून मी पोहोंचीवलें! आतां फारच थोडा भाग

उरला आहे; तो करून दाखवून माझ्या स्वर्गस्थ तातांची नि माझ्या प्राणनाथांची इच्छा पूर्ण करून आज मी आपली प्रतिज्ञा पार पाडून त्यांची उतराई होणार ! !

कंठ चरचर चिरुनि मारिन शिव-सुता त्या निश्चयें ॥
कीं वधावी खाटिकें जशि सौरभेयी निर्दयें ॥
येसुबाई धायिधायि त्याचि रडविन अंगना ॥
सत्य हें नच होय तर मम पितर भोगुत यातना ॥१॥

(निघून जाते.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—राजाचा महाल.

(राजा व जोत्याजी येतात.)

राजा—जोत्याजी, कालचा प्रसंग मोठा कठीण होता. तो, तूं होतास ह्मणूनच टळला गेला. नाहींपेक्षां, त्यावेळीं आपलीं पुरीं शंभर वर्षं भरलीं होतीं. बरं, तुझं लक्ष तिकडे एकाएकीं कसं गेलं ? तूं जागा होतास कीं काय.?

जोत्याजी—काल दुपारपासूनच मला कांहीं चमत्कारिक भावना होत होत्या. त्या बहीणभावंडांच्या वृत्तीमध्यें कांहीं विशेष चलबिचल दिसल्यामुळं माझ्या मनाला एकसारखी हुरहुर लागून राहिली होती; ह्मणून

सांप्रत तर ती एखाद्या चिडीवलेल्या सर्पिणीप्रमाणं अगदीं खवळून गेली असेल.

राजा—छे, छे. जोत्याजी, तिच्याविषयीं तर मुळींच संशय घेऊं नकोस. आजपर्यंतच्या तिच्या एकंदर वर्तनावरून आणि आजच्या बोलण्याच्या रोंखावरून माझी बालंबाल खात्री होऊन गेली आहे, कीं या गोष्टींत तिचं आंग मुळींच नाहीं. हें कृत्य त्या कृतघ्न एशाचंच. तेंच कशाला—ती या बेताला अनुकूल असल्यावर—

पद—(मलिन वस्त्र परिधान.) या चालीवर.

बेत आपुला फसला ह्मणुनी दुःख तिला होतें॥खरोखर॥
कोमेजुनि गेलेलें आनन-कुसुम तरी दिसतें ॥ ध्रु० ॥
यमसदनातें पाठविलें मीं त्या एसाजीतें ॥ तियेच्या ॥
याविषयीं उद्गारहि कांहीं मुखांतुनी निघते ॥ १ ॥

जोत्याजी—परंतु ज्यांना पुढील कार्य साधायचं असतं ते अशाच तऱ्हेचं नाटकी प्रेम दाखवीत असतात. आपल्या पायाला खडा रुतला, कीं लागलंच त्यांच्या डोळ्यांला पाणी येतं; आपण जरा नजरेआड झालों कीं लागलाच त्यांचा जीव अगदीं कावराबावरा होतो; एखादे-वेळीं त्यांना मुर्च्छाही येते, असे चाळे करावे लागतात, तेव्हां कुठं कामं साधतात. त्या मासल्याचं प्रेम त्या तुळशीचं आहे.

राजा—हें तूं कशावरून ह्मणतोस ?

जोत्याजी—तिनं काल रात्रीं केलेल्या धाडसावरून—

राजा—असं तें धाडस कोणतं बरं ?

जोत्याजी—दिवाणखान्याचं दार उघडून मारेकऱ्यांस आंत घेतांना तिला मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलं आणि जंबीयाचा नेम छातीच्या मध्यभागीं नेमका बसावा ह्मणून नेणबत्ती हातीं धरून ती उशाशीं उभी होती, हें सरकारनीं स्वत: नजरेनं पाहिलं आहे. जास्त पुरावा पाहिजे असेल तर कालच्या दंग्यांत मी पकडून ठेवलेल्या मारेकऱ्याच्या चौकशीअंतीं मिळेलच. आणि—

राजा—(रागीट मुद्रेनें पाहून) बस्स कर आतां; हा तुझा गैरसमज आहे. तूं ह्मणतोस तसा तिचा वाईट हेतु नसून, मारेकऱ्यांस पाहतांच भिऊन, दिवा लावून मला सावध करावं ह्मणून माझ्या उशाशीं ती उभी होती. तसंच, मारेकऱ्यांस आंत तिनं घेतलं नसून, बाहेर दरवाज्यापाशीं काय गडबड आहे, हें पहाण्याकरतां ह्मणून दिवाणखान्याचं दार तिनं उघडलं; तों धक्काबुक्की करून हे चोरटे आंत शिरले. असा हा खरा प्रकार असतां उगीच एखाद्यावर नसतं बालंट घ्यायचं ?

जोत्याजी—(निरुत्तर होऊन उभा राहतो.)

राजा—बरं जोत्याजी,

पद.—पिलु—धुमाळी.

मानिशी लटकी ॥ मजवरी प्रीति जी करी, तुळशि सुंदरी ॥ ध्रु० ॥ आजवरी परि तूं जी करिशी ॥ नसेल ती तव ममता तैशी ॥ कशावरुनि वद कीं ॥ १ ॥

जोत्याजी—(हात जोडून) धनीसाहेबा पुढं बोलण्याची माझी ताकत नाहीं. तथापि, या कोडग्या चाकराचं अजून शेवटचं मागणं उरलं आहे—

राजा—झालं! पुन्हां तुझं आपलं तें रडगाणं आहेच सुरू! इतका वेळ आह्मीं जी बडबड केली, ती व्यर्थ एकूण! जोत्याजी, या तुझ्या स्वभावाला काय ह्मणावं बरं? कळूंदे एकदां तुझीं अशीं कितीशीं मागणीं उरलीं आहेत तीं!

जोत्याजी—ते मोंगल महाद्वेषी आहेत! त्यांचा आपल्यावर पुरा डोळा आहे! एखादे दिवशीं जिवाला ते दगा करतील! कारण, तुळशीबरोबर अवरंगझेब बादशहाच्या कित्येक टेहळे लोकांच्या गुप्त मसलती सुरू आहेत!

राजा—(रागानें) चिंता नाहीं—त्या मोंगलांचं हनन करण्यासाठींच या संभाजीचं जनन आहे. तो त्यांची मुळींच पर्वा करीत नाहीं. जा—असल्या नाहीं नाहीं

त्या गप्पा सांगायला माझ्यापुढं आतां क्षणभरही उभां राहूं नकोस. त्या मोंगलांचे मोठे दिमाख सांगायला आला आहे इथं—आणि ह्मणे, तुळशीच्या नि त्यांच्या गुप्त मसलती सुरू आहेत—खबरदार पुन्हां असले शब्द उच्चारशील तर.

जोत्याजी—(हिर्मुसलें तोंड करून आंत जातो.)

राजा—(विचार करीत बसला असतां एक पत्र घेऊन विचारांत गर्क झालेला जोत्याजी येतो. त्यास) जोत्याजी, कसल्या विचारांत गर्क होऊन गेला आहेस ? आण पाहूं इकडे काय आहे तें.

जोत्याजी—(पत्र राजाजवळ देऊन चिंतातुर मुद्रेनें दूर उभा राहतो.)

राजा—(पत्र वाचून) जोत्याजी, या पत्रांत तुझा मुलगा गणोजी, यानं याप्रमाणं तुला लिहिलं आहे:— '.आज सात आठ दिवस झाले, मातोश्री आई तापामुळं फार हैराण आहे. तिचा आतां एका घटकेचाहीं नेम नाहीं. जेवीत असलां तर हात धुवायला इथं या. तरच तिची भेट होईल. नाहींपेक्षां, हें पत्र हीच तिची शेवटची भेट, असं समजावं.' मग कसं काय ? मला वाटतं, तूं याचवेळेस रात्रीचा दिवस करून कोल्हापुरास जा.

जोत्याजी—(हात जोडून) जशी धनीसाहेबांची आज्ञा. परंतु—

राजा—(मनांत) ही ब्याद जाईल तर बरी. (उघड) परंतु बिरंतु कांहीं नको–या घटकेस इथून निघ.

जोत्याजी—(एकीकडे) काय करूं! अजून माझं मन थाऱ्यावर येत नाहीं! दोहींकडून त्याची सारखी ओढाताण चालली आहे! एकीकडून स्वनार्यामोह मला 'रहा' ह्मणून सांगत नाहीं; आणि दुसरीकडून स्वामिकार्यनिष्ठा मला जायला अनुमोदन देत नाहीं! (उघड) जायचीच आज्ञा होत आहे, तर जातों—पण सरकारनीं आपल्या स्वतःला फार संभाळावं व मोठ्या हुषारीनं रहावं; कारण, हा सर्व क्रूर पशूंचा बाजार आहे!

राजा—(हंसून) हँ! काय मोठ्या उपदेशाच्या गोष्टी सांगत आहे!

जोत्याजी—आई अंबाभवानी, त्रिपुरसुंदरी हे आदिदेवि! माझ्या धन्याला तसं वागण्याला तूंच बुद्धि दे, आणि जशी शिवाजी महाराजांना अनेक संकटांतून पार पाडून त्यांची पाठिराखी होऊन राहिलीस, तशी यांचीही हो; हेंच तुझ्यापाशीं हात जोडून माझं मागणें आहे! (राजाच्या पायांवर डोकें ठेवून निघून जातो.)

राजा—(विचार करून) आज कां बरं माझ्या मनाला एकसारखी हुरहुर लागली आहे? डावा डोळा लवतं आहे! वामबाहु एकसारखा स्फुरण पावत आहे! हें काय दुश्चिन्ह असावं कांहीं कळत नाहीं! (इकडे तिकडे फिरून चोहोंकडे पाहून). अरे! हें काय!!

पद—झंपा प्रबंध.

पाहते मजकडे कां हि टवकारुनी ॥
रजनि विक्राळ हें रूप धरुनी ॥ धृ० ॥
पक्षिगण हे करिति, कर्कश स्वन अती ॥
आज कां वाटते भीति या मनिं ॥
कवण गोष्टीकडे, चित्त हें बापुडें ॥
नाहिं लागत पडे थोर चिंतनिं ॥ १ ॥

आतां शयनमंदिराकडे चला, म्हणजे त्या ठिकाणीं गेल्यानं थोडीबहुत तरी विश्रांति मिळेल. (जातो.)

प्रवेश ४ था

स्थळ—शयनमंदीर.

(राजा मंचकावर निद्रिस्त आहे, तुळशीनें शुभ्र वस्त्र परिधान केलें आहे; कच्छ घातला आहे; केश मोकळे सोडले आहेत; मंचकापासून कांहीं अंतरावर उभी आहे, असे दिसतात.)

तुळशी—(हर्षानें) माझ्या त्या पत्रानं तर काय मजा उडवून दिली ! मी मी ह्मणणारांच्या अकलेची त्यानं अगदीं माती करून टाकली ! तो मात्रागमनी जोत्या, राजापाशीं नेहमीं आपल्या हुशारीची मोठी फुशारकी मारीत असे पण माझं बनावट पत्र पाहतांच त्याची अकल कशी तेव्हांच गुंग होऊन गेली ! अहाहा !

पद—(बहुत छळियलें.) या चालीवर.

रिपु वधावया ॥ झालें सिद्ध समयिं या ॥ धृ० ॥
ऊरिं मारुनियां जंबीया ॥ प्रिय नाथा, ताता,
आतां, आतां माझिया बंधुला ॥ तोषवाया,
गेले स्वर्गी अबलेला मज त्यजुनियां ॥ १ ॥

(कांहीं वेळ विचार करून) तुळशी, विचार कसला करीत आहेस ? हो पुढं आतां. अग तुझ्या साथीदारां-शिवाय इथं दुसरं कुणी नाहीं. भिऊं नको. शस्त्रा, यावेळीं बाहेर नीघ कसं ! (पोटांत खोंवलेला जंबिया बाहेर काढते व त्याकडे पाहून) गड्या,

पद—(ऐसी होरी.) या चालीवर.

वधिशिल का तूं आजी ॥ शस्त्रा, नृपती तो संभाजी ॥ ॥ धृ० ॥ फोडुनि कारे ऊर तयाचा ॥ पूर्ण सख्या करिशिल ती ॥ स्वर्गांतिल त्या मम आत्मांच्या ॥ वसते आस मनीं जी ॥ १ ॥

छे, माझी पुरी खात्री आहे कीं, तूं कदापि मागं हटणार नाहींस. हँ, तो पहा–निद्रेनं मोहून टाकल्यामुळं मंचकावर राजा कसा अस्ताव्यस्त होऊन पडला आहे. मार- आपला बाण आतां नेमका जाऊन सोड–(धांवत जाऊन जंबीया खुपसण्याकरतां हात उगारते, तों तो हातांतून खालीं पडतो.) अरेरे ! हें काय !

पद.—(मन्नेत्र गुंतले) या चालीवर.

दुश्चिन्ह जाहलें ॥ शस्त्र पडलें ॥ हातिचें कसें ॥
नच आयु संपलें ॥ काय झालें ॥ म्हणुनि हें असें ॥
कर बांई कांपती हे ॥ ऊर माझा उडत आहे ॥ १ ॥

अथवा, असं झालं, यांत नवल काय आहे ! कारण,

साकी.

स्त्री असुनी मी झालें आहें समरधीर वीरासीं ॥
मध्यरात्रि या सिद्धलढाया, हरिणि हरीशीं जैसी ॥ १ ॥

पण नाहीं माझ्या उरांत भरलेली धडकी कायम आहे! माझे हात अजून कांपताहेत! (पडलेलें शस्त्र उचलून) तर इथूनच या शस्त्राचा मी नेम धरूं का ? (थांबून) पण नको—पुन्हां तें पडलं नि हा मेला जागा झाला तर—(इतक्यांत राजा चळवळूं लागतो.) अगबाई! जागा झाला वाटतं! (जंबीया लपविते.)

राजा—(झोंपेंत बरळतो) या—या—दुष्ट यव-नांनो, असे माझ्यासमोर या. लपूं नका. मी एकटा आहें, तरी तुमची किंचित्‌ही पर्वा मला वाटत नाहीं: पुढं या—कीं मारतों—तुमच्या नरडीचा घोंट घेतों.

तुळशी—(किंचित् धीरानें) नाहीं झोंपेंत बरळला हा. (प्रेमासक्त होऊन त्याच्याकडे निरखून पाहून) अहाहा!

पद—(मना तळमळसी) या चालीवर.

मंचकावरती ॥ पहुडली ॥ मंचकावरती ॥ पूर्ण जी
ठसलि या चित्तीं ॥ मनोहर मूर्ति ॥ धृ० ॥
हा बलसागर नरवर बाई ॥ निद्रावश
असतांना पाही ॥ काय वधूं या हातीं ॥

नाहींग बाई, अशा रीतीनं माझ्या प्रियाचा मी घात करणार! जिवलगा—(त्याचें चुंबन घ्यावयास जाते, इतक्यांत पडद्यांत शब्द होतो.)

'हा दुष्टे—प्रतिज्ञाभंग! प्रतिज्ञाभंग!
सावध हो—राजाच्या उरांत जंबीया
मार—आणि आपली प्रतिज्ञा शेवटास ने.'

(ऐकून चोहींकडे पाहते.) झालें सावध बरं मी-तसंच करतें आतां (जंबीया नीट धरून) निद्रे, आ-णखी थोडावेळ अशीच स्थीर रहा. इंद्रियांनों, तुमचे

व्यापार किंचित्काल पर्यंत असेच बंद ठेवा. राजा असाच घोरत पडला रहा. आतां अक्षयीं तुला सुखानं झोंप घेऊं देतें झाला आटपलां—नृपाला, इकडचा तुझा संबंध आतां तुटला बरं! लोकहो, हा पहा—या लोकींचा तुमचा नृपसूर्य अस्ताचलीं जात असल्यामुळं चोहांकडे अंधार पडूं लागला! सच्छीले, सुपतिव्रते, नृपांगने अग येसूबाई! हा पहा—तुझ्या या सौभाग्यमंदिरावर या निर्दय स्त्रीनं घाला घालून तुला वैधव्यसमुद्रांत लोटून दिलं! दशदिशानों, हे चंद्रा, हे तारागणहो, तुह्मी साक्ष अहांत, कीं अन्यायानं मी हें रत्न आज या जगांतून नाहींसं करीत नाहीं; तर—

सवाई—(रामासि अनुकूल असती) या चालीवर.

जन्म दिलें मजलागिं जयें मम, मारियला प्रिय तात किं यानें ॥ सर्वहि भार जयावरती मम, मारियला प्रिय नाथ किं यानें ॥ आवडता मज प्राण जसा मम, मारियला प्रिय बंधु किं यानें॥भूपतिचा ह्मणुनी करितें वध, हें अथवा, महि ही तरि जाणे ॥ १ ॥

(धांवत जाऊन राजाच्या उरांत जंबीया मारते. राजा एकदम धडपडत उठून जोरानें तिचें नरडें दाबून धरतो. ती पळूं पाहते. तो तिला हिसड्याबरोबर

जमिनीवर आदळितो. ती ' अईईई ' ह्मणून गतप्राण होते. राजा, छातींत वार लागल्यामुळें बाजूला घेरी येऊन पडतो तों शेजारच्या खोलींत दडून बसलेली तकरीबखानादि मंडळी येऊन राजास तेथेंच कैद करतात व कलुशास पकडण्याकरतां निघून जातात. पडदा पडतो.)

सहावा अंक समाप्त.

अंक ७ वा.

स्थळ—जंगल.

(जोत्याजी येतो.)

जोत्याजी—महाराजांपासून मला दूर करण्यासाठीं त्या दुष्टांनीं काय युक्ति लढविली पहा ! माझ्या नांवाचं एक बनावट पत्र तयार करून तें माझ्या नेहमीं बसण्या उठण्याच्या जागीं टाकून दिलं. पत्रांतील मजकुर तरी किती सयुक्तिक लिहिला होता, कीं तो वाचून माझी अक्कलच गुंग होऊन जावी ! महाराजांनींही मला

तावडतोब निघून जा ह्मणून सांगितलं. घरीं जाऊन पाहतों तों बायको आजारी वगैरे कांहीं नसून नेहमीं प्रमाणं मला दिसली. त्याचवेळीं त्यांचं कौटाळ माझ्या लक्षांत येऊन चुकलं; आणि सरकारच्या जिवाला दगा करण्यासाठींच त्या दुष्टांनीं मला त्यांच्यापासून दूर नेलं अशी माझी खात्री झाली. मग त्याच पावलीं तिथून माघारा फिरलों; व परमेश्वरावर हवाला ठेवून हा रस्ता इथपर्यंत मीं मोठ्या जलदीनं कापला. आतां हा प्रवास फारच थोडा उरला आहे, तो संपून धन्याचं कुशलवृत्त मला समजो, ह्मणजे झालं! (कांहीं चालून व पाहून) हा समोरून घोडा फेंकीत कोण येत आहे बरं? हा मनुष्य संगमेश्वराकडून आलासा वाटतो. तर तेथील कची हाकिकत याला विचारून पहावी. याला ती ठाऊक असेल. अरे, ह्यानं तर माझ्यासमोर येऊन आपला घोडा थांबविला! जातीनें मोंगल असून, याच्या एकंदुर पेहरावावरून कुणा राजाच्या पदरचा हा मनुष्य दिसतो. तर आपणही सावधपणां राखून याच्याशीं बोललं पाहिजे. (स्वारास) कांहो मियासाहेब, आपण कोण, कुठून आलांत व कुठं जातां अहां, एवढं मला कृपा करून सांगाल काय? (ऐकून) काय ह्मणतां? आपण अवरंगझेब बादशहाचे जासूद आहांत, आणि

संगमेश्वराहून निघून आपली स्वारी तुळापुरीं चालली आहे! तर मग आपणांला संगमेश्वराकडील कांहीं वर्तमान ठाऊक असेलच! मेहरबानी करून सांगावं तेवढं मला. (ऐकतो) कसं? कसं? संभाजीराजा व त्याचा प्रधान कलुशा, हे दोघे तकरीबखानाच्या स्वाधीन झाले; त्यांना तुळापुरास घेऊन जाण्याकरतां याच रस्त्यानं ते निघाले आहेत; बहुधा संध्या काळचे सुमारास या ठिकाणीं येऊन पोहोंचतील; असं ह्मणता काय? ठीक आहे. जावं आपण. मला जें ऐकायचं होतं, तें ऐकलं मीं! रामराम. (स्वार गेल्यावर) दुर्दैवा! काय केलंस हें! आपला तडाका शेवटीं त्या राजाला दाखविलासना तूं? राजा! काय तुझी स्थिति झाली ही! तुझा शेवटीं हा असा परिणाम व्हावा काय! अहाहा! ज्या गोष्टीचं मला भय वाटत होतं, तीच माझ्या प्रत्ययास आली! असो. आतां दुःखांत सुख एवढंच, कीं माझ्या धन्याच्या जिवाला अजूनपावेतों कांहीं धोका नाहीं. तेही याच रस्त्यानं यायला निघाले आहेत. तेव्हां आपणे त्यांच्या पाळतीवर इथं जवळच कुठं बसून आजची रात्र कशी तरी पार पाडावी. दिवसा मग पाहतां येईल. उद्यां मी माझ्या धन्याची शेवटची कामगिरी बजावणार, आणि त्या मुसंड्यानां आजपर्यंत या आंगीं कसलेली

शिपायगिरी मी त्यावेळीं दाखविणार! त्यांत परमेश्वर काय यश देईल तें देवो! (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—जंगल.

(मोंगल लोकांनीं कैद केलेला संभाजीराजा व कलुशा कबजी दिसतो.)

राजा—(दुःखानें) प्रारब्धा!

पद—ललत—धमार.

शेवटीं का लिहिलि होति हि स्थिति मदीय प्राक्तनीं ॥
यवनिं मजला धरुनि न्यावें कीं स्वराज्यीं येउनी ॥ ध्रु० ॥
येइ अथवा, नष्ट तें रवि-तेज होतां, यामिनी ॥
दैव फिरतां आलि कुदशा भोगणें मजलागुनी ॥ १ ॥

प्रिय तात, अविचारानं आपली जी मीं अवज्ञा, केली त्यायोगानं—

पद.—असावरी—त्रिवट.

बोल खरे झाले तव ते ॥ कीं 'अवचित ते यवन धरोनी ॥ एक दिनीं बघ नेतिल तूतें ॥ ध्रु० ॥ तेव्हां तुज या मद्वचनाची ॥ पूर्ण स्मृतिरे होइल साची' ॥ मज आठवतें ॥ १ ॥

अहाहा! काय माझी दशा ही! आणि ती मी दुर्बळ ह्मणून नव्हे; तर—

दिंडी.

जिच्याठायीं विश्वास ठेविला मीं ॥
प्राण किंबहुना अर्पिले जिला मीं ॥
जिच्यासाठीं भार्येस गांजियेली ॥
तुळशिनें त्या अशि दशा माझि केली ॥ १ ॥

त्या मायावी राक्षसीविषयीं माझा परम विश्वासू नोकर जोत्याजी क्षणोक्षणीं मला इशारा देत असतां, त्याकडे मीं दुर्लक्ष करून त्याला वाटेला लावावा; परंतु त्या सर्व गोष्टी आज माझ्या अनुभवास आल्या! यावरून हा माझ्या प्रारब्धाचा दोष तर ठरत नाहींच; परंतु केवळ दुर्व्यसनासक्त व कामांध होऊन दूरदृष्टी आणि सारासार विचार यांजपासून मी पराङ्मुख झाल्यामुळं—

साकी.

बोधामृत मज पाजित असतां तात, झुगारुनि दिधलें ॥
सावध करितां जोत्याजीही वच त्याचें नायकिलें ॥
सांगत होति सखी ॥ तिसही मीं निंदियलें कीं ॥ धृ० ॥

माझा जोत्याजी यावेळीं कुठं बरं असेल! (विचार करतो.)

(पडद्यांत शब्द होतो.)

"राजा, हा तुझा निमकहलाल चाकर हें जग सोडून चालला रे आतां ! कारण, जंगलांतून मोंगल लोक तुझा मेणा घेऊन जात आहेत, ही बातमी लागतांच–धन्याची शेवटची कामगिरी बजवावी म्हणून—छपून बसून ज्यानं बाणांच्या वर्षावानं तकरीबखानाच्या टोळीची दाणादाण उडवून दिली, त्या ह्या जोत्याजीचे–हातघाईत कुणाचा भाला अकस्मात् छातींत शिरून—पंचप्राण व्याकुळ होत आहेत ! ! त्याचा हा अखेरचा मुजरा घे !"

(कपाळावर हात मारून) अरेरे ! माझ्या जिवलगाची काय दुर्दशा झाली ही !

पद—(सुकालीं भूमी.) या चालीवर.

आलें मरण तया अंतीं ॥ रिपुवर यवनाच्या हातीं ॥ ॥ ध्रु० ॥ माझ्यासाठीं अमुल्य अपुला ॥ प्राण जयानें अर्पण केला ॥ तो जिवलग मम गेला गेला ॥ मजला तीच गती ॥ रिपुवर यवनांच्या हातीं ॥ १ ॥

(कलुशास) सचीव कलुशा, या अवरंगझेब बादशहाच्या तडाक्यांत आपल्या हिंदुत्वाला व स्वातंत्र्याला आपण खास मुकणार; परंतु आतां जिवंत राहण्याची दे-

खील आशा नको ! 'संगमेश्वरीं त्या तुळशीच्या नादानं जाऊं नका' ह्मणून वारंवार राणी सांगत असतां, तिला मी धिःकार करून आलों; परंतु—

श्लोक.—(हारिणीवृत्त)

'यवनपतिनें संभाजीतें तुळापुरिं मारिलें' ॥
स्थिति मम अशी झालेली ही जरी तिजला कळे ॥
तरि गमतसे ऐसें मातें खरोखर तत्क्षणीं ॥
त्यजिल अपुल्या प्राणांतें ती न राहिल या जनीं ॥ १ ॥

(कांहीं वेळ स्तब्ध राहून दुःखाचा सुस्कारा टाकून)

साकी.

नाहिं सखे तुज शब्द सुखाचा आजवरी म्यां दिधला ॥
आणि शेवटीं कृतघ्न झालों, सांभाळी तव बाळा ॥
पाळि नेम आपुला ॥ स्मरुनी शिव–रणयज्ञाला ॥ धृ० ॥

कांते ! या स्थळीं आणि अशा प्रसंगीं यापेक्षां माझ्यानं तुला अधिक कांहीं सांगवत नाहीं; परंतु हेंच हात जोडून तुझ्यापाशीं शेवटचं मागणं मागतों, कीं आजपर्यंत तुझ्या संबंधानं मीं केलेल्या अपराधांची मला क्षमा कर ! सखे—

(इकडे तिकडे पाहून) हारे दैवा ! इथं राणी नसून मी एकटाच भ्रमांत बडबडतों आहें ! असो. हे अनिलदेवते !

तूंच यावेळीं प्रसन्न होऊन हा माझा निरोप माझ्या प्रिय कांतेला कळीवशील तर तुझे महदुपकार होतील. देवते, तिला असं सांग, कीं—

पद —कालंगडा—दादरा.

त्या क्रूर यवन-हातिं मला मरण पातलें ॥ ऐकुनि ही दुष्ट निधन-मात सत्शिले ॥ धृ० ॥ मजवरिच्या प्रेमानें ॥ सोडुनि तें प्रिय तान्हें ॥ नको करूं सहगमना ॥ गति न-यामुळें ॥ १ ॥ साहस हें करिशि जरि ॥ शिव ताता स्वर्गपुरीं ॥ होईल बहु दुःख, अह्मां ॥ गति न यामुळें ॥ २ ॥

कारण, गोब्राह्मण—प्रतिपालार्थ यवनांचा उच्छेद करण्याकरतां त्यांनीं ज्या रणयज्ञास आरंभ केला, त्याची अद्यापि समाप्ति व्हायची राहिली आहे; तर तूं आपल्या बाळाचं संरक्षण कर; आणि त्याला भारतीशिक्षणं देऊन रणयज्ञ सुरू ठेव. झाला—माझा हा एवढाच शेवटचा निरोप ! (तकरीबखान येतो, त्यास) कां तकरीबखान, आह्मांला धरून आणल्याची बातमी तुह्मी स्वतःच बादशहाला देऊन आलां वाटतं ?

तकरीब०—संभाजी, आप दख्खनके राजे है, और दरबारमें आपकी पुरीपुरी इजत होवे, इसलिये

बादशाहा सलामत्की खिद्मतमें आरज करनेकु गयाथा; के अब् दरबारमें तश्रीफ लाते हो, ये मैं कहकर आया.

राजा—तर ही तुमची आमच्यावर मोठी मेहरबानी समजायची !

तकरीब०—(मनांत) उस्केसाथ ऐसाही कावा करना चाहिये. खैं कैसाहीं हो, ये शेरका बच्चा है. ह्यांतक् उस्को ले आया. वैसेही बांते नरमीं और आद्जी आद्जीसे उस्को व्हांतक् लेजाना चाहिये. उस्को दरबारमें लेजाना मौतकी हावाले करना है. लेकिन् ये दरबारमें पहोंच जावे, तो अपने सिरसे फरज आदा हो गया! (उघड) राजासाहेब, इसमें मेहरबानी कायकी ? हम् आपनी नौकरी बजाकर आये. अभी हम्को दरबारमें जानेका है. व्हां बादशाहा आपके इंतेजारमें है.

राजा—गफलतीनं ज्यावेळीं तुमच्या हस्तगत झालों त्याच वेळीं पुढचा परिणाम लक्षांत आणून आह्मीं आपलं अस्तित्व जगांतून काढून टाकलं आहे! त्या अर्थीं आतां आह्मांला कोणच्याही तऱ्हेची भीति राहिली नाहीं. चलावं.—

तकरीब०—महाराज आप अपनी जानसे क्युं फ- य्यांज हुये है? दरबारमें आपकी बेइजती दगा या फरेब कुच् नहीं होवेगी. अगर बादशाहाका हुकुम् मंजूर करोगे, तो उस्को आपकी बडी मदत् हो जायगी.

राजा—बादशाहांचं काय ह्मणणं आहे, तें तकरीब-खान, तुह्मांला कांहीं कळलं आहे का?

तकरीब०—नहीं राजेसाहेब.

राजा०—परंतु काय अदमास असावा असं तुह्मांला वाटतं?

तकरीब०—मुझे मालुम् नहीं है, के बादशाहा क्या सवाल करेंगे. थोडा जो कुच् के मालुमं है, वो मैं अर्ज नहीं कर सखता.

राजा—तुह्मांला सांगतां न येऊं द्या, परंतु तुमच्या एकंदर भाषणावरून मला तें समजून चुकलं, आणि त्याचा निकालही मण मीं करून ठेवला आहे—.

तकरीब०—ये बादशाही दरबार—और, इस् रस्तेसें चलो.

राजा—ठीक आहे. (कांहीं वेळ चिंतन करून श्वास सोडून) व: !

जिच्याठायीं विश्वास ठेविला मीं ॥

प्राण किंबहुना—(ही मागील दिंडी ह्मणतो.)

(भालदार पुकारतो. बादशहा दरबारांत रोषनार व अमीर उमराव यांसह बसलेला दिसतो. तकरीबखान संभाजीरावास व कलुशास आंत घेऊन जातो. अवरंगझेब संभाजीचा आदरसत्कार करतो.)

अवरंगझेब—(संभाजीकडे एकसारखें कांहीं वेळ पाहून) वझीर, ये दख्खनके शेरका बच्चा संभाजी हाजिर है.

वझीर—शेरका बच्चा तो जरूर है; लेकिन् अपनें उस्को पिंजरेमें बंद कर दिया !

अवरंग०—देखो वझीर, संभाजीकी शकल बहोत अच्छी नजर आती है !

वझीर—हुजूर, उस्की सूरतहीके सबबूसें हिंदु लोग उस्को देवता मानते है.

अवरंग०—आजतक जो गुन्हा उस्नें हमारे कियेहै, वो उस्की शकलही देखकर माफ करनेको जी चाहाता है.

रोषनार—(आपल्याशीं) इस् बातसें ऐसा मालुम् होता है, के बादशाहा उस्को जरूर माफ करेंगे. इसें मुज्को बहोत तसल्ली हो गयी ! !

वझीर—या अल्ला ! जो अपने मुसलमानी महजद्का दुष्मन् है; जिन्नें अपने वाल्दि्के पिछे हमारे तमाम मुल्खमें लूटमार किया; ऐसे काफरको माफ करना ? तोबा ! तोबा ! !

रोषनार—(आपल्याशीं) इस्की बातोंसें मेरा दिल बेजार हो गया !

अवरंग०—संभाजी राजे ?

राजा—(उभा राहून लवून) दिल्लीपति—

अवरंग०—तुम्नें जो कसूर कीये है, वो सब् हमारा दिल् माफ करने चाहाता है !

रोषनार—(आपल्याशीं) या खुदा ! अभी मै इसूलिये लाख रुपया खैरात करुंगी !

अवरंग०—लेकिन् हमारी एक शर्त है.

रोषनार—(आपल्याशीं) अब् फिर खत्रा हुवा !

राजा—(आपल्याशीं) या दुर्दैवाचे खेळ अजून राहिलेच आहेत एकूण !

पद (अति कोपयुक्त होय परि.) या चालीवर.

मज नकळे हा यवनपती शर्त कोणती ॥ धृ० ॥
कथितो या समयिं तरी ॥ बहु तरंग वरचेवरी ॥
येती मम हृदयांतरिं ॥ काढो भलती न वाणि ती ॥१॥

(उघड) सांगावी. मान्य करण्यासारखी असेल तर मी कबूल आहें.

रोषनार—(आपल्याशीं) इसें औरबी मेरा दिल् तूट गया ! !

अवरंग०—तुम् दीनइस्लाम कबूल करो.

राजा—(आश्चर्यानें) छे ! बादशहा—

पद—भैरवी—त्रिताल.

विपरीत वाणी ऐसी ॥ न रुचे ॥ वदतां आपण कैसी ॥ ॥ धृ० ॥ अपमानीतिल या योगें कीं ॥ जन या लोकीं मजसी ॥ न रुचे० ॥ १ ॥

वझीर—देखो, तुम् बादशाही दरबारमें हो. खबरदार, अदबीसें बात करो.

राजा—यावेळीं मी देहभानावर नाहीं! तुमचा महंमुदी धर्म वाईट असो वा चांगला असो. त्याविषयीं मला या ठिकाणीं बोलणं नाहीं; परंतु ज्या धर्मावर माझी अत्यंत प्रीति, ज्या धर्मांत आजपर्यंत मी वाढलों व ज्याच्यासारखा श्रेष्ठ धर्म दुसरा कोणताच या जगांत मला वाटत नाहीं, त्याचा त्याग करून तुमच्या महंमदी धर्माचा स्वीकार करावा; असं—बादशाह झाला ह्मणून काय झालं—त्यानीं या शिवाजीमहाराजांच्या पुत्राला सांगावं! आणि तें या संभाजीनं मुकाट्यानं ऐकून घ्यावं? (संतापानें लाल होतो.)

अवरंग०—ये अकलमंद! नाहाक् फत्तरसें काहेकु सीर फोडता है! खुदाकी दीन दौलतकु किसुवास्ते रद् करता है? होषमें आव—

राजा—आग लाव तुझ्या त्या संपत्तीला! इतक्यासाठींच मला गुन्हे माफ करीत असशील, त्यापेक्षां ते न झाले तरी बेहेत्तर आहे; परंतु—

साकी.

श्वानासम तव दारिं पडावें, भक्षुनि अभक्ष भक्ष्या ॥
अनुचित ऐसें कर्म करूं का, मरण बरें त्यापेक्षां ॥
विपरित हें वदसी ॥ राजा, भीति तुला न कशी ॥ ध्रु० ॥

जिवंत राहून, 'संभाजी मुसलमान झाला' अशीं अक्षरं लोकांच्या तोंडून ह्मणून घेण्यापेक्षां, "धर्माभिमान राखण्याकरतां यवनांस आपला प्राण त्यानं बळी दिला, असं ह्मणून घेणं मला अधिक इष्ट वाटतं! अरे, ज्याला आपल्या प्राणाचीही तिळमात्र पर्वा वाटत नाहीं, तो हा संभाजी, शस्त्रांना भिऊन केवळ राज्याच्या आशेनं तुझ्या अमंगल धर्माचा स्वीकार करील काय? (क्रोधयुक्त बादशहाकडे पाहतो.)

अवरंग०—(सामोपचारानें) संभाजी, अगर तुम् हमारा पाक मज़्हब् मुसल्मानी इख़्त्यार करोगे, तो तुमारा अच्छा होगा. राज कायम् रहेगा, और जान बचेगी.

राजा—अरे जा—धर्मभ्रष्ट होऊन इहलोकीं अपकीर्ति आणि परलोकीं नर्कवास संपादन करणारा हा संभाजी नाहीं. त्या नीच मुसलमानी धर्माची विनाकारण मला प्रतिष्ठा कां सांगतो आहेस? तुला पाहिजे असेल तर माझ्या धर्मांत ये. त्या आमच्या हिंदु धर्मासारखा श्रेष्ठ धर्म अन्य कोणताच नाहीं. त्याला धक्का न लागतां, तुझ्या करतां निराळी कांहीं तरी सोय करून देतों. अथवा, हें तुला पसंत नसेल तर ही तुझी प्रिय मुलगी रोषनार हिला माझ्या स्वाधीन कर—

औरंग०—(क्रोधानें) मारो संभाजीको—देखते क्या—देर मत् करो.

राजा—(पुढें होऊन) हा घ्या माझा प्राण—(सरदार लोक संभाजीराजावर व कलुशावर वार करतात दोघे गतप्राण होऊन पडतात. रोषनार घाबरून मोठ्यानें किंकाळी फोडून संभाजीराजाच्या प्रेतावर बेशुद्ध होऊन पडते. बादशहाचे कांहीं लोक तिला तेथून उचलून घेऊन जातात. पडदा पडतो.)

सातवा अंक समाप्त.

ईशस्तवन.

पद —(ईश्वरी, जयदे, जयदेवी श्रीअंबे.) या चालीवर.

माधवा, सुखवा, वसुदेवात्मज देवा, धांवा, पावा ॥
दीनबांधवा, वर द्यावा, सकल दानवांतका ॥ ध्रु० ॥
श्रीरंगा, भयभंगा, ईश्वरा अगा ॥ दीन० ॥ १ ॥
दुष्ट व्यसनसंगभंग ॥ होउनियां संतसंग ॥
नित्य घडो प्रीति जडो ॥ अज्ञ कामुकां ॥ दीन० ॥२॥
अघहरणा, सुखसदना, उरविं दुरिततिमिर
न बल, नाहिं कोण त्यां ॥ नीतिमान् , होऊं दे,
भाग्यवान् , अखिल विश्वचालका ॥ दीन० ॥ ३ ॥
कमलानयनाऽरामा ॥ मोरेश्वरसुत आत्मारामा ॥
पाव, ठाव देइं बालका ॥ दीन ॥ ४ ॥

संगीत व प्रोज नाटकें.

विक्रीस तयार.

किर्लोस्कर संगीत मंडळीनीं प्रयोग करून लोकप्रिय झालेलीं.

संगीत सौभद्र	१२ आणे.
,, शाकुंतल	१२ ,,
,, रामराज्यवियोग अंक १ ते ३	१२ ,,
,, मृच्छकटिक	१२ ,,
,, शारदा	१ रु.
,, वीरतनय	१ ,,
,, शापसंभ्रम	१ ,,
,, मूकनायक	१ ,,

पाटणकर कृत.

,, सत्यविजय	१ रु.
,, विक्रमशशिकला	१२ आ.
,, युवतिविजय	१२ ,,
,, वसंतचंद्रिका	१२ ,,
,, सीमंतिनी	१० ,,
,, कर्कशादमन	१२ ,,

डोंगरे कृत.

,, रंगी नायकीण	....	४ आ.
,, इंद्रसभा	....	४ ,,

शाहूनगरवासी नाटक मंडळीनीं प्रयोग करून लोकप्रिय झालेलीं गद्य नाटकें.

राणाभीमदेव	....	८ आणे
पानपतचामोकबला	....	८ ,,
मानाजीराव	....	१२ ,,
झुंजारराव	....	१२ ,,
फाल्गुनराव	....	८ ,,
दुर्गानाटक	....	८ ,,
बाजी देशपांडे	....	१२ ,,
श्री तुकाराम	....	१२ ,,
प्रणयविवाह	....	८ ,,
श्री रामदास	....	८ ,,

हीं व यांशिवाय नाना प्रकारचीं नाटकें, कथानकें कादंबऱ्या, निबंध, गोष्टींचीं पुस्तकें, शालोपयोगी पुस्तकें वगैरे खालील पत्त्यावर विकत मिळतील.

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक.

मोतीबाजार–मुंबई.